म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. नं. २६५

# Kashmir Guide

# काश्मीर

काश्मीरांतील मनोरम देखावे, हवापाणी, लोकस्थिति, उद्योगधंदे, भूगोल, इतिहास, राज्यव्यवस्था, इ. माहितीसह सचित्र वर्णन

लेखक
बाळकृष्ण श्रीधर कोलटकर,
पुस्तकाचे पाठीवर दिलेल्या १८ पुस्तकांचा कर्ता
३१४ सदाशिव पेठ, पुणें नं. २

REFBK-0005209

किंमत ८ आणे

४२०८
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७०००

# प्रस्तावना

काश्मीर हें हिंदुस्थानचें नंदनवन तें पाहण्याची पुष्कळांना इच्छा असणें स्वाभाविक आहे. पण आपल्या येथून चौदाशें मैल आगगाडीचा रस्ता व पुढें २०० मैल सडक इतका हा लांबचा प्रवास आहे. पूर्वी मोटारी नव्हत्या तेव्हां हे २०० मैल टांग्यानें जावें लागे. तेव्हां पांच सहा दिवस मोडत. खर्च व त्रासही पुष्कळ सोसावा लागे. आतां मोटारी निघाल्यापासून एक दोन दिवस लागतात, व माणसी १० एक रुपये भाडें पडतें, म्हणून आतां पुष्कळांना तिकडे जाणें सुलभ झालें आहे.

केव्हां जावें, कसें जावें, कोठें उतरावें, काय पहावें, वगैरेची समग्र माहिती, काश्मीर प्रवासावर मासिकांतून बरेच लेख आले आहेत व त्या- पैकीं कांहींनीं ते पुस्तकरूपानें छापले आहेत, पण त्यांतून मिळत नाहींत, कोणी ८ दिवसांत तर कोणी १५ दिवसांत घाईघाईनें प्रवास करून जें काय थोडें पाहिलें त्याचेंच तेवढें वर्णन करितो. त्यांतही कोणी गुरुमहा- राज भेटले, तर कोणी टांगेवाल्याची बाचाबाची झाली याची माहिती देतो, तर कोणी जंगलाच्या अधिकाऱ्याची गांठ पडली, तर कोणी सत्यनाराय- णाचा प्रसाद मिळाला असे आत्मवृत्तपर भाकड कथांनीं ते लेख भरलेले आहेत.

रा. रामचंद्र भिकाजी गोखले यांचे एक काश्मीरवर स्वतंत्र पुस्तक आहे पण त्यांतही स्वतःच्याच सफरीचें वर्णन विशेष आहे व तें फार जुनें म्हणजे ४० वर्षांच्या मागचें पुस्तक आहे. जिज्ञासूला हवी ती माहिती ह्या कोणत्याही लेखांतून मिळत नाहीं.

मी, माझे मुलगे, मुलगी, नातू, अशी ५।७ मंडळी जाऊन हौस बोट करून राहिलों होतों. व या पुस्तकांत वर्णन केलेलीं बहुतेक स्थळें आम्ही हिंडून पाहिलीं व जीं आम्हांस पाहणें शक्य झालें नाहीं त्याबद्दल चौकशी करून काश्मीरसंबंधीं बरीचशी माहिती या पुस्तकांत दिली आहे. यांत चित्रेंही घातलीं आहेत. माझा नातू यानें बरोबर कॅमेरा घेतला होता व त्यानें पुष्कळ स्थळांचे फोटो घेतले होते. त्यांपैकीं कांहीं यांत घातले आहेत.

जे कोणी तिकडे जाऊं इच्छितील व जे जातील त्यांना हें पुस्तक मार्ग- दर्शक व उपयुक्त होईल व इतरांसही हें काश्मीरवर्णन वाचून करमणूक होईल अशी उमेद आहे.

—लेखक

# अनुक्रमणिका


| भाग | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | हिंदुस्थानांतील प्रेक्षणीय स्थळांचें वर्गीकरण | १ – ३ |
| २ | हवा पाणी (काश्मीरचें) | ३ – ४ |
| ३ | योग्य काळ व सोयी (काश्मिरांत जाऊन राहण्यास) | ४ – ९ |
| ४ | मुम्बईहून रावळपिंडीस जाण्याचे मार्ग | ९–१० |
| ५ | रावळपिंडीहून श्रीनगर रस्ता | ११–१६ |
| ६ | श्रीनगरांतील प्रेक्षणीय स्थळें | १६–२७ |
| ७ | काश्मीरच्या पूर्वेतर भागांतील प्रेक्षणीय स्थळें | २८–३२ |
| ८ | पूर्व ,, ,, | ३२–४० |
| ९ | श्रीनगर ते जम्मू रस्ता | ४०–४३ |
| १० | काश्मीरी लोकांचे आचार विचार | ४३–४५ |
| ११ | ,, उद्योगधंदे व कारखानें | ४५–५० |
| १२ | काश्मीरचा भूगोल. | ५०–५६ |
| १३ | ,, इतिहास | ५६–५९ |
| १४ | ,, ची राज्यव्यवस्था | ५९–६० |
| १५ | ,, वर येणाऱ्या आपत्ती | ६०–६२ |



प्रकाशक

**पां. म. भागवत,** बी. ए. एल्एल्. बी.

मौज प्रिंटिंग ब्यूरो, गिरगांव, मुंबई नं. ४.

मुद्रक

**शंकर रामचंद्र दाते,** बी. ए.

अ. वि. गृहाचा–लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव पेठ, पुणें.

REFBK-0005209

# काश्मीर

## भाग १

## हिंदुस्थानांतील प्रेक्षणीय स्थळांचें वर्गीकरण

"बहुरत्ना वसुधरा" अशी ही आपली भरतभूमि आहे. युरोप, अमेरिका वगैरे खंडांत एक एका देशांत एखादें दुसरें मनोहर सृष्टिसौंदर्याचें ठिकाण असतें. आफ्रिकेमध्यें ॲमेझोनचा धबधबा, अमेरिकेंतील पनामाचा कालवा, ईजिप्तमधील मनोरे, इटलींतील व्हेनिस शहर, फ्रान्सचें पॅरीस, चीनचा तट असें एखादें दुसरें ठिकाण प्रेक्षणीय असतें. पण आपल्या ह्या भरत-खंडांत अशीं किती तरी नयनमनोहर स्थलें आहेत व तीं पाहण्याकरितां दूरदूरचे देशांतून प्रवासी लोक मुद्दाम येतात.

नाटकांत जसें शाकुंतल नाटक, त्यांत चवथा अंक, त्यांतील पुन्हां चार श्लोक हे जसे उत्तम मानतात, त्याप्रमाणें पृथ्वीत सृष्टिसौंदर्याचें आगर म्हणजे हिंदुस्थान; त्यांत खालील पहिल्या प्रकारांत दिलेली पांच स्थळें, व त्या पांच स्थळांत काश्मीर हें प्रमुख आहे.

ज्याप्रमाणें तार्‍यांचे त्यांच्या तेजावरून सात प्रकार करितात त्याच-प्रमाणें हिंदुस्थानांतील सृष्टिसौंदर्याचीं जीं अनेक स्थळें आहेत त्यांचेहि कांहीं प्रकार करितां येतील.

### १ ला प्रकार

१ अति उच्च जो हिमालय पर्वत, ज्याच्या तोडीचा सर्व त्रिभुवनांत दुसरा पर्वत नाहीं, त्याच्या पायथ्याशी असलेलें **काश्मीर**.

२ दिल्ली येथील **कुतुबमिनार** व लोखंडी लाट. कुतुबमिनार सात मजली आहे व तो फार सुदर आहे. दिल्ली येथें आणखी पुष्कळ सुंदर स्थळें आहेत.

३ आग्र्याचा **ताजमहाल** —याच्या सारखी, इतकी सुबक, नक्षीदार दुसरी इमारत सांपडणें कठीण.

४ **कैलास लेणें**—वेरूळच्या लेण्यांपैकी हें लेणें पाहिलें म्हणजे मानव कृतीचें कौतुक वाटतें. हें लेणें नसून हें मंदिरच बांधून काढलें आहे असा भास होतो. खडक फोडतांना एक कपरीहि उडू न देतां त्या लेण्यावर जें नकशीचें काम घडलें आहे तें फारच अप्रतिम आहे.

५ **गिरसप्प्याचा धबधबा**---ॲमेझोन नदीचा धबधब्याचा प्रवाह गिरसप्याचे धबधब्याचे प्रवाहापेक्षां मोठा आहे. पण तो धबधबा इतका उंच नाहीं. गिरसप्याच्या धबधब्याची उंची हजार फूट आहे, व त्यांतील राजा धबधबा जो आहे त्याकडे नजर लाविली म्हणजे मन एकाग्र होऊन जातें, त्या धबधब्याचें पाणी खालीं खडकावर पडून तेथें त्याच्या आघातानें १००–१२५ फुटांचा खड्डा झाला आहे. तेथें राजा धबधब्याशिवाय आणखीहि चार पांच धबधबे आहेत.

हीं पांच स्थळें–कांहीं नैसर्गिक व कांहीं मनुष्यकृत–पाहून काय ही भारतमाता असलीं हीं सुदर रत्नें प्रसवली आहे, असें वाटतें. या पांच स्थळांना जगांत दुसरी तोड नाहीं.

२ ऱ्या, ३ ऱ्या प्रकारांत दिलेलीं स्थळें हीं सामान्य आहेत. तरी पण सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें तींहि प्रेक्षणीय आहेत.

### २ रा प्रकार

१ अमृतसर येथील सुवर्णमंदिर.
२ हरिद्वार येथील नदीचा देखावा.
३ हिंदुस्थानचें पॅरीस शहर जें जयपूर.
४ अजिंठाचीं लेणीं.
५ दौलताबादचा किल्ला.
६ गोकाकचा धबधबा.
७ विजापूरचा गोलघुमट.
८ हम्पी येथील (Ruins) नासधूस झालेल्या इमारती.
९ सक्कर येथील धरण.
१० जबलपूर जवळील मारबल रॉक्स्.
११ मद्रास इलाख्यांतील मदुरा वगैरे ठिकाणचे गोपूर.
१२ जमशेटपूरचा टाटाचा लोखंडाचा कारखाना.
१३ राणीगंज किंवा असनसोल येथील कोळशाच्या खाणी.
१४ म्हैसूर संस्थानांतील कोलार येथील सोन्याच्या खाणीं.
१५ फत्तेपूर शिकरी.

### ३ रा प्रकार

१ तक्षशिला येथील भूमिगत शहर.
२ लक्ष्मण झोला.
३ लखनौ येथील मुसलमानी कारकीर्दीतील इमारती.
४ अहमदाबाद " " " ,

५ सांची येथील स्तूप.
६ भोपाळ येथील तलाव.
७ अजमीर येथील तलाव व त्याच्यावरील मंडप व पुष्करतीर्थ, जवळील वाळूचे डोंगर.
८ द्वारका बेट.
९ गिरनार पर्वत.
१० सिमला, दार्जिलिंग, मसुरी, नैनीताल, अबूचा पहाड, उटकमंड, महाबळेश्वर वगैरे हवेचीं उंच ठिकाणें.
११ ग्वालेर, इंदोर, बडोदें, हैद्राबाद, म्हैसूर वगैरे राजधानीचीं शहरें व तेथील राजवाडे.
१२ मुंबई, कलकत्ता वगैरे इलाख्यांचीं मुख्य शहरें.
१३ किल्ले—रायगड, लोहगड, सिंहगड, तोरणा, विजापूर, झांशी, ग्वालेर वगैरे.
१४ लेणीं—घारापुरी, कार्ला, बदामी, कनेरी वगैरे.
१५ बारा ज्योतिर्लिंगें—पैकीं कांहीं फारच प्रेक्षणीय आहेत.
अशीं आणखी किती तरी रमणीय स्थळें आहेत.

---

## भाग २

## हवापाणी (काश्मीरचें)

आग्रा, दिल्ली, कैलास लेणें, गिरसप्पाचा धबधबा हीं जगमान्य स्थळें सौंदर्यानें पूर्ण भरलेलीं आहेत, व तीं एकदां दोनदां फार झालें तर चारदां पाहिलीं कीं संपलें; पण काश्मीरची गोष्ट याहून निराळी आहे. तें सृष्टिसौंदर्यपूर्ण तर आहेच, शिवाय येथील हवा व पाणी उत्कृष्ट असल्यामुळें तेथें लोक कैक दिवस जाऊन राहतात. तिथली हवा इतकी उत्तम आहे कीं, कशाहि प्रकारचा रोगी असो, तो आसन्नमरण झालेला जरी असला तरी काश्मीरांत जाऊन कांहीं दिवस राहिला म्हणजे तो पूर्ववत् खडखडीत बरा होतो.

रिन्स साहेब आपल्या ग्रंथांत म्हणतात कीं, येथील हवापाणी इतकें उत्तम आहे की, ज्या स्त्रियांना त्यांच्या प्रकृतींत कांहीं विकार असल्यामुळें गर्भधारणा होत नव्हती, त्या काश्मीरांत कांहीं महिने जाऊन राहिल्यानंतर त्यांची प्रकृति चांगली सुधारून त्यांना मुलेंबाळें झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. येथील पाणी हिमालय पर्वतावरील बर्फ वितळून नद्या, नाल्यावाटें खालीं येत असल्या-

मुळें स्फटिकाप्रमाणें स्वच्छ, थंड व अमृतासारखें गोड व लोहमिश्रित असल्यामुळें पौष्टिक आहे. शिवाय येथें द्राक्षासारखीं उत्तम, स्वादिष्ट फळें व केशर हीं उत्पन्न होतात येथें उत्तम शाली, रेशमी कापड, गालिचे, कापडावरील व सोन्यारुप्याच्या भांड्यांवरील नक्षीकाम, अशा प्रकारच्या सर्व सुंदर **गोष्टी** तयार होतात.

चोहों बाजूंनीं बर्फानें आच्छादित असलेलीं ज्यांचीं शिखरें अशा त्या पर्वतराजीमध्यें काश्मीर म्हणजे जशी मोत्याच्या हारांत पांच शोभावी तशीच याची शोभा आहे. चिनार, सेफेदा, भूर्जकल, देवदार, अक्रोड यांसारखे मोठमोठे वृक्ष ज्याच्या मैदानावर व डोंगरावर उभे आहेत; जेथें सदोदित पाऊस पडल्यामुळें जिकडे तिकडे जणूं काय गालिचाच पसरला आहे अशी जेथें हिरवळ, जेथें द्राक्ष, बदाम, आक्रोडसारखीं स्वादिष्ट फळें; गुलाब, मोतिया, कमळें, यांसारखीं सुवासिक व दृष्टिमनोहर फुलें; सर्पाकृति नागमोडी होऊन काश्मीरभर वाहत जाणारी जेथली जेहलम नदी; जिच्या कांठीं श्रीनगर येथे दुथडी दोन दोन तीन तीन मजली सुंदर इमारती; ज्याच्या प्रवाहांतून हौशी लोक शिकाऱ्यांत बसून इतस्ततः हवा खात फिरत आहेत व उद्योगी लोक पोटासाठीं नावांतून माल वाहून नेत आहेत, ज्या नदीवर एक दोन मैलांच्या अंतर्गतच सात पूल आहेत; जेथें निशाद, शालिमार, अच्छाबलासारख्या जगद्विख्यात बागा; ज्या प्रदेशांत वीरनाग, अनंत नागासारखे कित्येक झरे, गुलमर्ग, टंगमर्ग, सोनमर्ग सारखे मर्ग म्हणजे हवेचीं पठारें, वुलर, मानसवल, अंचर, दलयासारखीं सरोवरें व जेथें अशीं पवित्र स्थानें आहेत की, ज्यांच्या दर्शनाकरितां पाऊस, गारा, बर्फ, डोंगर, नद्या, नाले, यांना न जुमानतां उपाशी तापाशी चालत जाऊन ज्याच्या दर्शनानें पावन होऊन मोक्षास जावें या हेतूनें यात्रेकरू जातात अशी अमरनाथासारखीं पवित्र देवस्थानें; जेथील माणसें म्हणजे स्वर्गांतील गंधर्व व अप्सराच काश्मीरांत उतरलीं आहेत की काय अशी सुंदर, असे हें काश्मीर पाहून जन्माचें सार्थक करण्याची कोणास आतुरता नसेल?

---

## भाग ३

## योग्य काळ व सोयी ( काश्मीरांत जाऊन राहण्यास )

नव्हेंबर ते मार्च काश्मीरमध्यें जिकडे तिकडे बर्फच बर्फ असतें. तेव्हां तेथील हवा अति थंड असल्यामुळें तेथील रहिवाशांना सुद्धां ती असह्य होते; तेव्हां बाहेरून तेथें जाणें अनिष्टच आहे. तेथील रहिवाशीसुद्धां कांहीं एक

ब्राह्मणेतरास बोटवाल्यांनीं (मुसलमानांनीं) स्वयंपाक केलेला चालत असेल तर मग कसलीच अडचण नाहीं. हवा तर ते स्वयंपाक आपल्या चुलीवर करतील किंवा निराळ्या चुलीवर करतील.

---

# भाग ४ था

## मुंबईहून रावळपिंडीस जाण्याचे मार्ग

मुंबईहून काश्मीरला जावयाचें म्हणजे रावळपिंडी किंवा जम्मूपर्यंत आगगाडीनें जावें लागतें व मग तेथून काश्मीरची राजधानी श्रीनगर येथें मोटारनें जावें लागतें. मूबईहून रावळपिंडीस जाण्याला ४ मार्ग आहेत. १ला मार्ग—बी. बी. सी. आय. रेल्वेनें अहमदाबादेवरून दिल्लीला जावें, व मग नॉर्थ वेस्टर्न रेल्वेनें रावळपिंडीला अगर जम्मूला जावें. या मार्गानें दिल्ली८४९मैल+दिल्ली ते रावळपिंडी ५२९ मैल = १३७८ मैल+१९८ रावळपिंडी ते श्रीनगर = १५७६ मैल. २ रा मार्ग—बी. बी. सी. आय. रेल्वेनेंच पण हा मुंबईहून बडोद, रतलाम, नागपाडा, दिल्ली असा आहे. या मार्गाने दिल्ली ८६५ मैल आहे. या मार्गानें वाटेंत फारशीं प्रसिद्ध स्थळें नाहींत. पण मेलगाडी ह्या मार्गानें जाते, तेव्हां घाईनें ज्यांना काश्मीरला जावयाचें असेल, त्यांनीं ह्या मार्गानें फ्रांटीअर मेलनें जावें. याला थर्डक्लास नाहीं. ३ रा मार्ग—जी. आय. पी. नें. हा मार्ग भुसावळ, इटारशी, वरून दिल्लीला जातो, दिल्ली मुंबईहून त्या मार्गानें ९५७ मैल आहे. त्यापैकीं कोणत्याहि मार्गानें गेलें तरी थर्डक्लासचें भाडें रु. १८–६–० पडतें. पण रिटर्न तिकिट थर्डक्लासचें मिळत नाहीं. सेकंडक्लासचें भाडें रु. ६२–९–० आहे व रिटर्न तिकिटाचें भाडें रु. ९८–१३–० आहे व हें रिटर्न तिकीट सहा महिने चालतें. ४ था मार्ग—मुंबईहून आगबोटीनें कराचीस जावें व तेथून नॉर्थ वेस्टर्न रेल्वेनें रावळपिंडीस जावें. सवड असेल तर वाटेंतील क्षेत्रें व प्रेक्षणीय स्थळें पहात पहात एका मार्गानें जावें व दुसऱ्या मार्गानें यावें.

१ ल्या मार्गानें गेलें म्हणजे वाटेंत खालील स्थळें लागतात:—कनेरी लेणी, सुरत, भडोच, बडोदें येथील सुंदर इमारती, डाकोर येथील प्रसिद्ध देवालय, (आनंद फाटयानें जाऊन यावें), अहमदाबाद येथील मुसलमान अमदानींतील इमारती (येथून काठेवाडांत शिरून) राजकोट, जुनागड (गिरनार पर्वत), वेरावळ, सोरटी सोमनाथ येथील ज्योतिर्लिंग, पोरबंदर, द्वारका (दोन्ही), जामनगर-वरून मेहसाणाला बी. बी. सी. आय. ला मिळावें व तेथून सिदपूरला येऊन

मातृगया करावी व मग अबूरोडला उतरून अबूच्या पहाडला जावें.व तेथील शोभा पाहून तेथून ५ मैलांवर असलेलें जैन लोकांचें प्रसिद्ध जैनमंदिर पाहून परत येऊन आगागाडींत बसून मारवाड जंक्शनवर उतरून जोधपूरला जाऊन यावें. नंतर अजमीरला उतरून अजमीर–खांडवा फाटचानें छत्तीसगड व उदेपूर पाहून येऊन अजमीरास पुष्करतीर्थांत स्नान करून जयपूर (हिंदुस्थानचें पॅरीस) पाहून दिल्लीस यावें. येथील कुतुबमिनार वगैरे उत्तम इमारती पाहून दिल्लीहून अमृतसरला जावें व येथील सुंदर सुवर्णमंदिर पाहून लाहोरास जावें व येथील मोठमोठ्या इमारती पाहून रावळपिंडीस यावें. रावळपिंडीहून प्रथम टक्सीसला जाऊन तेथील पाँपी शहराप्रमाणें तें शहर भूमिगत झालें आहे तें पहावें, व पेशावर–नॉर्थवेस्ट प्रॉव्हिन्सची राजधानी–पाहून परत रावळपिंडीस येऊन मग मोटारनें श्रीनगरला जावें. २रा मार्ग–घाई असेल तर दुसऱ्या मार्गानें जावें. त्या मार्गानें वाटेंत पहाण्यासारखें फारसें नाहीं व तसा अवकाशहि नसतो. ३ रा मार्ग—त्या वाटेनें नाशिक, त्र्यंबक, जळगांवाहून अजंठा लेणीं, भोपाळ, झांशी, ग्वालेर, आग्रा, मथुरा, दिल्ली हीं पहातां येतील. ४ था मार्ग—सिंधमधून कराची, सक्करबॅरेज, हैद्राबाद, हैद्राबादेहून क्वेटा (बलुचिस्थानची राजधानी) वगैरे सिंधमधील स्थळें पाहतां येतील. १ ल्या मार्गानें जावें व ४ थ्या मार्गानें किंवा ३ ऱ्या मार्गानें यावें किंवा जसें जमेल तसें, ह्या मार्गापैकीं एका मार्गानें जावें व दुसऱ्या मार्गानें यावें म्हणजे बरींच क्षेत्रें व प्रेक्षणीय स्थळें पहातां येतील.

श्रीनगरला जाण्याला दोन मुख्य मार्ग आहेत. १ रावळपिंडीकडून व २ रा जम्मूकडून. दोन्ही मार्ग प्रेक्षणीय आहेत. म्हणून रावळपिंडी रस्त्यानें जावें व जम्मू रस्त्यानें परतावें. रावळपिंडी येथें ५।६ मोटारीच्या कंपन्या आहेत,पैकीं एक्स्प्रेस मोटार कंपनी ४३ एडवर्ड रावळपिंडी या कंपनीचें श्रीनगर येथें पहिल्या पुलाजवळ गुरुद्वार धर्मशाळा आहे तेथें तिचें ऑफिस आहे व मोटारीचा स्टँडहि तेथेंच आहे. व जम्मूलाहि तिचें ऑफिस व स्टँड आहे.

रावळपिंडीहून सकाळीं मोटारी व लॉरी निघतात. सबंध मोटार केली तर १०० रुपये भाडें पडतें. लॉरीला १५० रु. पडतात किंवा माणसीं १०।१५ रु. पडतात. दर कमजास्त होतो. उतारूंच्या संख्येवर तो अवलंबून असतो. मोटारीनें एका दिवसांतसुद्धां श्रीनगरला जातां येतें. लॉरीनें दोन दिवस लागतात. रावळपिंडी ते श्रीनगर अंतर १९८ मैल आहे. रात्रीं मोटार किंवा लॉरी चालविण्याला मनाई आहे. वाटेंत जातांना मरी पाहून जावयाचें असेल तर –कारण मरीला रस्ता सोडून २।३ मैल आंत जावें लागतें–तसा आगाऊ ठराव करावा लागतो. मरींत निदान पिंडी पॉइंट पाहण्यासारखा आहे.

७०००
म.प्र. ९३८
६-४-३४

# भाग ५ वा

## रावळपिंडी ते श्रीनगर रस्ता ( मरीवरून )

| नंबर | गांव | मागील गांवापासून अंतर | उंची | सोयी |
|---|---|---|---|---|
| १ | रावळपिंडी | ० | १६५० | सर्व सोयी |
| २ | सतरा मैल | १७ | २००० | टोल नाकें |
| ३ | ट्रेट | ९ | ४००० | पो. ता. डाक बंगला. |
| ४ | मरी (चि. गल्ली) | १४ | ६५०० | ” |
| ५ | फूगवाडी | १४ | ३००० | ” |
| ६ | कोहला | १४ | २००० | ” धर्मशाळा दस्तूरी |
| ७ | दुलई | ११ | २२०० | डाक बंगला |
| ८ | डोमेल | १० | २३०० | पो. ता. डा. दस्तुरी |
| ९ | गडी | १४ | २७५० | ” ” |
| १० | चिनारी | १६ | ३५०० | ” ” |
| ११ | उरी | १८ | ४४०० | पो. ता. डा. |
| १२ | रामपूर | १३ | ४९०० | पो. |
| १३ | बारामुल्ला | १६ | ५२०० | ” ” ” रे. हा. |
| १४ | पाटण | १६ | ५२०० | ” ” |
| १५ | श्रीनगर | १८ | ५२०० | सर्व सोयी |

रावळपिडी येथून निघालें म्हणजे वाटेनें शिशव्याचीं व बाभळीचीं झाडें लागतात. १४ मैल रस्ता साधारण सपाटीचा असल्यामुळें गाडी झपाट्यानें जातें. १४ व्या मैलावर **बारको** गांव लागतें व जरा पुढें गेलें म्हणजे सतरा मैल गांव येतें. सतरा मैल हें गांव रावळपिंडीपासून बरोबर सतराव्या मैलावर आहे, म्हणून ह्या गांवाला हें नांव पडलें असावें. येथें रस्त्यावर एका फाटकवजा लोखंडी अडसरानें रस्ता अडविलेला असतो. दर माणशीं दस्तुरी सहा आणे आहे ती दिली म्हणजे अडसर वर उचलला जातो व रस्ता मोकळा होतो. येथून साधारण चढण लागते. सभोंवतालची टेकाडें बोडकीच आहेत. पुढें **छत्तर** गांव येतें. येथून चढाव सारखा कठीण होत जातो व बाजूनें उंच उंच पर्वत दिसूं लागतात व जिकडे तिकडे दाट झाडीं व हिरवें रान लागतें. येथें ओढ्याच्या कांठी सुंदर बाग आहे, पुढें वाटेवर शाळिग्राम पूल लागतो. हा ओलांडून जरा पुढें गेलें म्हणजे **ट्रेड** येतें. येथें एक डाक बंगला व रस्त्यावरच एक पुष्करणी आहे. येथें मोटारी थांबतात, मोटारीला पाणी घेतात व चाकावर पाणी मारतात. पुढे चढण जास्त जास्तच कठीण होऊं लागते.

व रस्त्याला वळणेंहि फारच लागतात. व वाटेनें पाईन व देवदारची उंच उंच झाडें लागतात. हीं झाडें सरळ सोटासारखीं उंचच उंच असतात व त्यांची पानें बारीक असतात. त्यांमुळें तीं सुरूसारखीं दिसतात. पण सुरूचें झाड इतकें उंच वाढत नाहीं. वाटेनें पाण्याचें झरेहि पुष्कळ लागतात व त्यांचें पाणी स्वच्छ व गार असतें. पुढें वाटेंत **चारापाणी** खेडें लागतें, चढाव सारखा चढतच असतो. एक चढाव संपला कीं दुसरा चढाव येतो. असें हें सारखें चाललेलें असतें. पुढें वाटेंत **घोडगल्ली** लागते. येथें बाजारपेठ आहे व एक टॉवर असून त्यावर घड्याळ बसविलेलें आहे. येथें पाण्याचे झरेहि पुष्कळ आहेत. पुढें **सनिबेन** लागतें व पुढें दोन मैल गेलें म्हणजे **मरी** येते. मसुरीप्रमाणें मरीहि पुष्कळ टेकड्या टेकड्यांनीं झालेली आहे व त्यावर बंगले बांधलेले आहेत. येथील हवा उन्हाळ्यांत फार थंड असते म्हणून पंजाबमधील साहेब लोक उन्हाळ्यांत येथें येऊन राहतात. येथील सर्वांत उंच ठिकाणची उंची ७५०० फूट आहे. असें जरी आहे तरी पंजाब सरकारचें उन्हाळ्याचें ठाणें मरी येथें नाही, कारण सिमला हें पंजाबांतच आहे व त्याची उंची ८५०० फूट आहे, तें मरीपेक्षां जास्त थंड आहे म्हणून पंजाब सरकार उन्हाळ्यांत सिमला येथें जाऊन राहतात. मरी येथील पिंडी पॉईंट पासून रावळपिंडीपर्यंत एकसारखा सुंदर देखावा दिसतो.

मरीहून श्रीनगरच्या रस्त्याला लागल्यावर **चिकागल्ली** लागते. तेथें मोठा बाजार भरतो. हें रावळपिंडी ते श्रीनगर रस्त्यावरील सर्वांत उंच ठिकाण आहे. येथून हिमालयाचे उंच उंच पर्वत दृष्टीच्या टप्प्यांत येतात. इकडे बाराहि महिने थोडा थोडा पाऊस पडत असल्यामुळें उन्हाळ्याच्या दिवसांत सुद्धां हिरवेंगार रान होतें, झाडेंझुडपेंच दृष्टीस पडतात. शिवाय उन्हाळ्यांत बर्फ वितळत असल्यामुळें नद्यानाले पाण्यानें तुडुंब भरून वाहत असतात. येथून सारखा उतार सुरू होतो व आपण आतां खोल खोल जातों आहों असें वाटतें. उकाड्यामुळें जीव गुदमरतो. रस्त्याला वळणेंहि फार आहेत. चिकागल्लीपासून १५ मैल चालून गेल्यावर उजव्या हाताला खोल दरींत **जेहलम** नदी दिसूं लागते. व पुढें ती सारखी रस्त्याचे कांठानें वहात येते. जसजसें पुढें जावें तसतशी ती अधिक स्पष्ट दिसूं लागते व वेगानें वाहत असल्यामुळें तिचा खळखळ असा आवाज कानी येतो. डाव्या अंगाला उंच उंच पर्वत व उजव्या अंगाला खोल दरीतून जेहलम नदीचें जोरानें वहाणें हा देखावा फार रम्य वाटतो. नंतर **कोहला** येतें. येथें नदीवर लोंबता पूल आहे. पुलाच्या अलीकडे ब्रिटिश हद्द संपते, व पलीकडे काश्मीर संस्थानची हद्द सुरू होते. एका अंगाला नदी व दुसऱ्या अंगाला पर्वत या

दोन्हींच्या मध्यें पर्वताच्या कांठच्या अंगाला रस्ता खोदून काढला आहे व त्यावरच कोहला हें खेडेगांव वसविलें आहे. इकडे डोंगरांत घरें बांधण्याची अशी एक तऱ्हा पाहण्यांत येते कीं, डोंगराची बाजू हीच एक भिंत धरावयाची, व पुढें दोन खांब उभारून त्यावर तुळया टाकून खोली बनवावयाची. येथील सर्व घरें देवदारी लांकडाचींच बांधलेलीं आहेत. येथें पुन्हां कर घेतात, तो माणशीं बारा आणे, पैकीं सहा आणे ब्रिटिश सरकारचे व सहा आणे काश्मीर संस्थानचे. कोहला समुद्रसपाटीपासून २००० फूट उंच आहे. म्हणजे चिकागल्लीपासून ४५०० फूट खोल आपण आलों असें वाटतें. येथून श्रीनगर १३२ मैल आहे. हा मैलाचा दगड काश्मीरच्या बाजूला पुलाच्या त्या शेवटाला आहे. येथून पुढें जाऊं लागलों म्हणजे नदी, रस्त्याच्या डाव्या अंगाला येते. येथून पुन्हां चढण सुरू होते. चढत चढत सात मैल गेलें म्हणजे **छत्तरगांव** लागतें

येथें थोडी सपाटी असल्यामुळें खुलासा वाटतो, नाहींतर आतांपर्यंत एका अंगाला डोंगर व दुसऱ्या अंगाला दरी या दोहोंच्या चिळणींतून रस्ता आलेला होता. येथें एक सुंदर पाण्याचा झरा तीन फूट उंच नळाच्या तोंडांतून वाहतो, पुढें चालूं लागलें म्हणजे **दुलई** गांव येतें. पुढें चढत असतांना वाटेंत तीन लहान लहान **बोगदे** लागतात. दुलईहून दहा मैलांवर डोमेल येतें. (दोनमेळ येथें दोन नद्यांचा झेलम व किसनगंगा यांचा संगम आहे म्हणून हें नांव पडलें आहे. ) येथें मरीवरून येणारा रस्ता व दुसरा अफताबादवरून येणारा रस्ता अशा दोन रस्त्यांचा संगम येथें होतो. अफताबादच्या रस्त्यावर झेलम नदीवर डोमेल येथें लोंबता पूल आहे. येथें रस्त्यावर अडसर असतो. येथें डॉक्टर तपासणी होते व उतारूंची नांवें टिपून घेतात व सामानाचीहि तपासणी होते. नवीन मालावर कर घेण्यांत येतो. शिवाय प्रत्येक मोटारीमागें १० रु. कर आहे. पुलांच्या दोन्ही बाजूला नदीवर लहान लहान घाट बांधलेले आहेत, यामुळें येथील देखावा मनोहर आहे. पुढें वनश्रीची शोभा पहात पहात १४ मैल गेलें म्हणजे **गडी** येते. मोटारीनें एका दिवसांत प्रवास करतां येतो. पण लॉरीनें आलें तर येथें मुक्काम पडतो. येथें एक डाक बंगला आहे, त्यांत राहण्याची व जेवण्याची चांगली सोय आहे. युरोपियन अथवा हिंदूच्या जेवणाची सोय आहे. हिंदूकरितां आचारी काश्मीरी ब्राह्मण आहे. तो दोन्ही तऱ्हेच्या म्हणजे मांसाहाऱ्यांकरितां व शाकाहाऱ्यांकरितां स्वयंपाक करितो. आपणांस जसें हवें तसें आगाऊ सांगावें लागतें. ऊन पाण्यानें आंघोळ करावयाची असेल तर त्याकरितां माणशीं चार आणे द्यावे लागतात. रहदारी बंगल्याला लागून नदी लागते व त्यावर वर सांगितलेला लोंबता पूल

आहे. इकडे हे असे लोंबते पूल पुष्कळ आहेत. पाण्याच्या ओघांत दळणाच्या पाणचक्क्या इकडे जागोजाग बसविलेल्या दृष्टीस पडतात. कोहल्यापासून वर जसजसें आपण येत जातों तसतसा हा देखावा जास्त जास्तच खुलून दिसूं लागतो व हवेंत थंडावाहि चांगला भासूं लागतो. दृष्टिसमोर बर्फाच्छादित पर्वतांचीं शिखरें एकसारखीं दृष्टीस पडतात. पाण्याचे पाट मारखे वाहत असतात. जागोजाग झरे भेटतात. नाना प्रकारचीं झाडें, हिरवींगार शेतेंहि लागतात. झाडांना फुलांचे बहार आलेले असतात. व चढणीमुळें मोटारहि फार जलद जाऊं शकत नाहीं म्हणून या सर्व सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेण्यास थोडा अवसर मिळतो. पूर्वी टांग्यानें जेव्हां लोक जात असत, तेव्हां याहीपेक्षां जास्त बहार वाटत असावी. येथून पुढें जाऊं लागलों म्हणजे रस्त्याला फार वळणें आहेत व त्यामुळें नदी रस्त्यापासून दूर होते. पण पाण्याचे धवधवे जरा जास्त प्रमाणांत लागतात. असे सोळा मैल गेलें म्हणजे **चिनारी** गांव लागते. येथें चिनार वृक्ष फार आहेत म्हणून हें नांव पडलें असावें. येथें लहान बाजार भरतो. येथें नदी रस्त्याजवळ येते व नदीच्या पलीकडे जुन्या राजवाड्याचा अवशेष दृष्टीस पडतो. येथून एक मैलावर वाटेंत एक धबधबा लागतो. रस्ता वळणें घेत घेत १८ मैल आपण गेलों म्हणजे **उरी** येते. येथें जेहलम स्टेशनापासून येणारा रस्ता या रस्त्याला येऊन मिळतो. येथेंहि गडीप्रमाणें जेवणाखाणाची सोय आहे. डोमेलपासून उरीपर्यंत जे पर्वत आहेत ते सर्व वाळूच्या दगडाचे आहेत. विजापूर जिल्ह्यांत बागलकोटाकडे असेच दगड आहेत. यांचा रंग पिवळसर, जांभळा, पिगट असा असतो. या पर्वतावर देवदाराचीं झाडें पुष्कळ आहेत. कोहल्यापासून ७७ व्या मैलांवर **मोहरा** येथें नदीचे कांठीं विजेचा कारखाना आहे. सहा मैल उंचावरून नळानें पाणी आणून तें मोहरा येथें ४०० फूट उंचावरून पडतें. व त्याच्या वेगानें चाकें चालून वीज उत्पन्न करतात. या विजेचा पुरवठा श्रीनगर, बारामुल्ला, उरी, रामपूर, पाटण, चोपूर, गुलमर्ग या गांवाला होतो. शिवाय रेशमाचा कारखाना व तांदूळ कांडण्याच्या गिरण्या या विजेच्या योगानें चालतात. काश्मीरांत वीज फार स्वस्त आहे. दर दिव्यामागें महिन्याला १२ आणे घेतात. येथून पुढें **रामपूर** येतें. येथें थोडी सपाटी आहे. भाताची हिरवींगार शेतें येथें दृष्टीस पडतात. तरीपण अजून चढण चढतच असतो, व दऱ्यावर दऱ्या येत असतात. व नदी दऱ्यांतून उडी घेत असते. या तिच्या ओघाचा असा उपयोग करून घेतात कीं, बारामुल्ला येथें नदीत लांकडाचे ओंडे त्यांवर नांव नंबर घालून सोडतात. ते पाण्याच्या ओघानें खालीं वाहात वाहात जाऊन खालीं जेहलम स्टेशनावर अडवून धरले जातात



मुसलमान-जोडपें



मार्तंड देवालय

व तेथून ते काढून घेऊन जिकडे रवाना करावयाचे असतात तिकडे आगगाडींतून रवाना केले जातात. बारामुल्ला ते जेहलम साधारण अंतर २०० मैल आहे. इतकी वाहतूक वांचते असा हा या नदीचा उपयोग करून घेतात. रामपुरापासून सोळा मैलांवर **बारामुल्ला** शहर येतें. बारामुल्ला हा वराहमुल या शब्दाचा अपभ्रंश झाला आहे. श्रीविष्णूचा तिसरा अवतार जो वराह तो विष्णूनें येथें धारण केला अशी कथा आहे. येथून थोड्या अंतरावर राम, सीता व लक्ष्मण यांचीं कुंडें आहेत. बारामुल्ला हें काश्मीरांत शिरण्याचें मुख्य नाकें असल्यामुळें त्याला द्वारपति किंवा काश्मीरची वेस असें म्हणतात. गडी, उरी वगैरे ठिकाणाप्रमाणें येथेंहि राहण्या-जेवणाची सोय आहे. बारामुल्ला शहर जेहलमच्या दोन्ही तीरांवर वसलेलें आहे. इकडून तिकडे जाण्याकरितां लांकडी पूल आहे. हा गांव मोठा असून व्यापाराची मोठी पेठ आहे. या गांवचे एका बाजूस जेहलम नदी व बाकीच्या तिन्ही बाजूस सफेदा (पापलर) वगैरे मोठमोठ्या वृक्षांची दाट झाडी आहे. त्यामुळें गांवाला मोठी शोभा आली आहे. बारामुल्लापासून पुढें सपाटी लागते. नदीचें पाणी संथ आहे. त्यामुळें येथून पाण्यांत नावा चालतात. श्रीनगरला येथून जाण्याला दोन मार्ग आहेत. (१) पाण्यांतून नावेनें, (२) सडकेनें. नावेनें गेलें तर सहा मैल गेलें म्हणजे ती नदी **उलर** सरोवरांतून निघत असल्यामुळें उलर सरोवरांतून प्रवास करावा लागतो. हें सरोवर सर्व हिंदुस्थानांत मोठें आहे. त्याचा परिघ ३० मैल आहे. हें सरोवर जातांना किंवा येतांना किंवा श्रीनगराहून बोटीनें मुद्दाम येऊन यांतून प्रवास करून जावें. पाण्यांतून प्रवास करणें यांत मोठी मौज असते.

रस्त्यानें बारामुल्लाहून श्रीनगर ३४ मैल आहे. वाट सपाट आहे. दोन्ही बाजूस सफेदा (पापलर) झाडें लागतात. हीं झाडें सरळच सरळ ७५-१०० फूट उंच वाढतात. व त्यांना आडव्या फांद्या फुटत नाहींत तर त्यांच्या फांद्या सरळ वर जातात. आणि त्या झाडाच्या बुध्यापासून १०-१५ फुटांपर्यंत मुळींच नसतात. यामुळें हीं झाडें जवळ जवळ लावितात. यांची साल पांढरी असते, म्हणून यांना सफेदा म्हणतात. या रस्त्याच्या दोन्ही अंगाला हीं झाडें सारखीं लाविलेलीं आहेत. म्हणून जणूं काय शिपायांची रांगच उभी केली आहे असा भास होतो. बारामुल्लापासून १७ मैलांवर **पाटण** खेडें लागतें. येथें हिंदूंचीं काळ्या दगडाची देवळें जमिनींत खोदून काढलेलीं पाहण्यांत येतात. येथें चिनार वृक्षाखालीं तंबू ठोकून त्यांत लोक राहतात. रस्त्यानें दुतर्फा भाताचीं पुष्कळ शेतें लागतात. असें पुढें जात जात गेलों म्हणजे काश्मीरची राजधानी **श्रीनगर** येतें.

इकडे डोंगरावर अतिवृष्टि होते, त्यामुळें डोंगराचे कडे तुटून ते रस्त्यावर येऊन पडतात. त्यामुळें रस्ते बंद होतात, किंवा केव्हां केव्हां नद्यांवरील पूल नादुरुस्त होतात. व त्यांवर काम चाललें असलें म्हणजे रस्ता बंद होतो. पण रस्त्यांवरील पडलेले दगड काढून झाले म्हणजे पुलाचें दुरुस्तीचें काम चालू असतांना तीन दिवसांनीं एक दिवस मोटारीला जाण्याकरितां रस्ता खुला करितात; पण दगड वगैरे पडल्यामुळें जर अजिबात रस्ता बंद झाला असेल तर अफताबादेवरून दुसरा रस्ता आहे. तो या रस्त्याला डोमेल येथें येऊन मिळतो. अफताबादेला रावळपिंडीहून जावें लागतें. अफताबाद ते मनशेरा १६ मैल; मनशेरा ते गडीहबीबुल्ला १८ मैल; गडीहबीबुल्ला ते मजफरबाद १४ मैल; मजफरबाद ते डोमेल १ मैल; डोमेल ते श्रीनगर ११४मैल.

## भाग ६ वा
## श्रीनगर येथील प्रेक्षणीय स्थळें

**शंकराचार्य टेकडी**—श्रीनगरला आल्याबरोबर तात्पुरतें कोठेंहि राहिल्यावर प्रथम बघावयाचें ठिकाण शंकराचार्यांची टेकडी होय. येथें शंकराचार्यांचा मंडनमिश्रनाच्या पत्नीशीं संवाद झाला म्हणून या टेकडीला शंकराचार्यांची टेकडी हें नांव पडलें असावें. म्हैसूरची जशी चामुंडीची टेकडी,देवास येथील देवीची टेकडी किंवा औंध येथील यमाईची टेकडी त्याप्रमाणें ही टेकडी दिसते. पण ही टेकडी फार उंच आहे. समुद्रसपाटीपासून ६००० फुटांपेक्षांहि वर आहे आणि श्रीनगरापासून १००० फूट उंच आहे.

ही टेकडी १ ल्या पुलापासून १॥ मैलावर आहे. चालत जावें अगर टांग्यानें जावें. टेकडीच्या पायथ्याचा परिघ ५ मैल आहे. ही टेकडी शंकूच्या आकाराची आहे. म्हणजे वर वर निमुळती होत गेली आहे. या टेकडीच्या शिखरावर शंकराचें मंदिर आहे; हें देऊळ अशोक राजाचा पुत्र जलोक यानें इ. स. पूर्वी २२० व्या वर्षीं बुद्धाच्या अवशेषाकरितां बांधलें. याचा आतां मागमूसहि राहिला नाहीं. पुढें सहाव्या शतकांत गोपादित्य राजा राज्य करीत असतां त्यानें तें पुन्हां बांधलें पण मुसलमानांच्या कारकीर्दींत त्याचा विध्वंस झाला. पुढें तें हिंदु राजानें पुन्हां बांधलें. टेकडीवर चढण्याला तीन बाजूंनीं रस्ते आहेत. त्यांतील दुर्गानाग मंदिराच्या वाटेनें बहुतकरून लोक जातात. चढणीचा रस्ता अरुंद पण चांगला बांधलेल्यासारखा आहे. चढतांना सर्व बाजूंची शोभा दृग्गोचर होते. कांहींसें वर आलों म्हणजे एक चिनारचें झाड लागतें. असें चढत चढत माथ्यावर गेलों म्हणजे सपाट जमीन येते. इच्या ईशान्येस शंकराचें देऊळ आहे.

हें देऊळ हिरवट काळसर दगडांचें आहे. पण आंतील पिंडी काळचा दगडाची आहे. तिची उंची तीन फूट आहे. देवळाच्या सभोंवार दगडी तट आहे. या तटावरून सभोंवतालची शोभा अवर्णनीय दिसते. उत्तरेस व दक्षिणेस डोंगराच्या अनेक रांगा बर्फानें आच्छादित अशा शिखरांनीं फारच शोभायमान दिसतात. श्रीनगर शहर, त्यांतील हिरव्यागार बागा, नागमोडी जेहलम नदी, उजव्या हाताला भव्य दल सरोवर, अशी ही शोभा फारच नयनमनोहर आहे. या मंदिराचे शिखरावर रात्रींचे विजेचे दिवे लावतात व या दिव्यांच्या सभोंवार प्रकाश फेकणारे परिवर्तक (Reflectors) बसविलेले असल्यामुळें रात्रीं जिकडे तिकडे प्रकाश दिसतो व रात्रीं प्रवाशास हा दिवा मार्गदर्शक होतो.

देवळावर उभें राहिलें म्हणजे नदीच्या पलीकडच्या तीरावर १ रेशमाचा कारखाना, २ धंदेशिक्षणाची शाळा, ३ लालमंडी, ४ हॉस्पिटल, ५ परेडग्राउंड, ६ राजवाडा व सुवर्णमंदिर हीं दिसतात. अलीकडल्या तीरावर १ सोनारबाग, २ मुनशीबाग, ३ क्लब, ४ रेसिडेंटचा बंगला, ५ नदीच्या कांठची दुकानांची रांग, ६ हारीसिंग बाग, ७ पोलोग्राउंड, ८ न्यूड हॉटेल, ९ कॉलेज व हायस्कूल, १० चिनारबाग, ११ हरिपर्वत, १२ जुम्मामशिद, १३ शहामदन मशिद दिसतात.

उत्तरेकडे तोंड करून उभें राहिलें म्हणजे दल सरोवर व त्याच्या सभोंवतालच्या बागा नजरेस येतात.

श्रीनगरास आल्याबरोबर शंकराचार्यांची टेकडी प्रथम पाहण्याचा उद्देश हा आहे कीं, श्रीनगरांत जें जें पाहावयाचें आहे त्याची स्थूल कल्पना या टेकडीवरून येते. मग तीं ठिकाणें प्रत्यक्ष हळु हळू पहावींत.

त्या टेकडीच्या चतुःसीमा—पूर्वेस गोपकर रस्ता, बदामाची बाग, कॅन्टोन्मेंट. दक्षिणेस दुर्गानागाचें मंदिर, मिशन हॉस्पिटलची सडक, पश्चिमेस मिशन हॉस्पिटल, ड्रुगजल खेडें, उत्तरेस घाग्रीबल खेडें व दल सरोवर गोपकर रस्ता—हा मुनशीबागेच्या वायव्य कोपऱ्यांत सुरुं होतो, किंवा दल सरोवराला जाण्याची जी सडक आहे त्यावरून हा रस्ता फुटून पूर्वेकडे जातो. हा शंकराचार्य टेकडीच्या आग्नेय दिशेला आहे. शंकराचार्य टेकडीहून खालीं उतरून पूर्वेकडील अंगाला जावें, म्हणजे हा रस्ता लागतो. या रस्त्यावर अलीकडे पुष्कळ बंगले बांधले आहेत. श्रीनगरला हवा खाण्याकरितां जे लोक येतात त्यांपैकीं कांहीं या रस्त्यावरील बंगल्यांत राहूं लागले आहेत. या रस्त्याच्या खालच्या अंगास बदामाची बाग आहे. तिच्या पलीकडे कॅन्टोन्मेंटच्या इमारतींची रांग आहे. हा रस्ता हळु हळू चढत जातो व त्याच्या

शेवटीं सरकारी गोपकर राजवाडा आहे. तो उंचावर असल्यामुळें तेथून दल सरोवराचा देखावा सुंदर दिसतो.

**प्यारिमहाल**—हा रस्त्याच्या खालच्या अंगावर जवळच थिड नांवाचें खेडें आहे त्याच्या रस्त्यावर हा महाल आहे. या महालाला चश्माशाहीवरून रस्ता आहे. हा महाल १७ व्या शतकांत मुसलमान राजांनीं ज्योतिषाचे वेध घेण्याकरितां बांधला. पण त्यांपैकीं आतां कांहीं एक खूण राहिली नाहीं. आतां हा अगदीं मोडकळीस आला आहे. त्यांत भुतें, साप, किरडू नांदतात, असा लोकांचा समज आहे.

**सोनारबाग**—ही बाग गोपकर रस्त्याच्या खालीं जुम्मू रस्त्यावर आहे. ती १ ल्या पुलापासून २॥ मैलांवर आहे. यांत एक सुंदर मंदिर आहे, व नदीवर एक घाट आहे.

**मुनशीबाग**—सोनारबागेला लागूनच अलीकडे मुनशीबाग आहे. या बागेचें क्षेत्रफळ १ चौरस मैल आहे. यांत चिनारचीं झाडें अनंत आहेत. या झाडांखालीं तंबू देऊन लोक राहतात.

**क्लब**—मुनशीबागेच्या अलीकडे साहेब लोकांचा क्लब आहे. त्याच्यापुढें नदीचे कांठीं एक मंडप घातला आहे. तेथून नदीची शोभा फार रम्य दिसते.

**रेसिडेंटचा बंगला**—क्लबच्या अलीकडे रेसिडेंटसाहेबांचा बंगला आहे.

**पोस्ट व तार ऑफिस**—या रेसिडेंटच्या बंगल्याच्या बरेंच अलीकडे ब्रिटिश सरकारचें पोष्ट व तार ऑफिस आहे. बाकी सर्वत्र संस्थानांत संस्थानचीं पोष्ट व तार ऑफिसें आहेत व तीं पुष्कळ आहेत.

**कोटीबाग**—पोष्टाला लागूनच कोटीबाग आहे. आतां फक्त बागेचें नांव राहिलें आहे. त्या ठिकाणीं सर्व दुकानें झालीं आहेत. तीं सर्व युरोपियन थाटावर आहेत. एका अंगाला दुकानें, मध्यें सडक व दुसऱ्या अंगाला नदी असा हा देखावा रम्य दिसतो. या सडकेनें बहुत लोक फिरावयास जातात.

**पोलोग्राउंड**—कोटीबागेच्या मागल्या अंगाला पोलोग्राऊंड आहे.

**न्यूडोज हॉटेल**—त्याच्यामागें न्यूडोज हॉटेल आहे. हें फार मोठें हॉटेल आहे. यांत २०० वर लोक राहण्याची सोय केली आहे. त्याच्यामागें प्रताप कॉलेज व हायस्कूल आहेत.

**चिनारबाग**—याच्यामागें चिनारबाग आहे. हा बाग दल सरोवर व झेलम नदी यांना जोडणारा जो स्कुंटी कदल नाला किंवा चिनारनाला याच्या डाव्या किनाऱ्यावर आहे. यांत चिनारचीं झाडें विपुल आहेत. या नाल्यांत बोट हाऊसमध्यें लोक फार राहतात. त्यामुळें बोटीचा व चिनार झाडांचा असे दोन्ही फायदे त्यांना होतात.

**रेशमाचा कारखाना**—१ ल्या पुलापासून एक मैलावर नदीच्या पलीकडे रामबाग रस्त्यावर रेशमाचा कारखाना आहे. तो पाहण्याकरितां परवानगी लागते. त्याकरितां अर्ज करावा लागतो. तो डायरेक्टर सिल्क फॅक्टरी, श्रीनगर, यांजकडे करावा लागतो व त्या अर्जांत ज्यांना जावयाचें असेल त्यांचीं नांवें, त्यांचीं राहावयाचीं ठिकाणें व त्यांचा श्रीनगर येथील पत्ता द्यावा लागतो. परवानगी आली म्हणजे त्या परवानगींत जो दिवस नमूद केला असेल त्या दिवशीं १२ ते १ च्या दरम्यान जावें लागतें. सोमवार, बुधवार व शनिवार याच दिवशीं हा कारखाना दाखविण्यांत येतो. हा कारखाना सर्व जगांत मोठा आहे. म्हैसूरलाहि एक कारखाना आहे. पण तो इतका मोठा नाहीं. याच संस्थांत जम्मूला एक कारखाना आहे. श्रीनगर येथील कारखान्यांत दरसाल १५००० मण रेशीम तयार होतें. खेड्यांपाड्यांतील लोकांस किड्यांचें बीं वांटण्यांत येतें व तुतीचीं झाडें खेड्यापाड्यांत पुष्कळ आहेत. अंड्यांतून सुरवंट बाहेर आलें म्हणजे त्यांना तीं पानें घालून त्यांची वाढ करितात व त्यांनीं कोश तयार केले म्हणजे ते सरकारी अधिकाऱ्यांना विकतात. मग सरकारी अधिकाऱ्यांमार्फत ते कोश या कारखान्यांत येतात. येथें आल्यावर त्यांतून रेशमाचा धागा काढून त्याचे पिळे तयार करितात. धागा काढून पिळे तयार करणें एवढेंच काम या कारखान्यांत चालतें. पण हें फार मोठ्या प्रमाणावर चालतें. हे पिळे कारखानदार विकत घेतात व त्यांपासून रेशमी कापड तयार करितात.

**धंदेशिक्षणशाळा**—हा कारखाना हॉस्पिटल व रेशमाचा कारखाना यांच्या दरम्यान आहे. येथें काश्मीरी विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण देण्यांत येतें. सुतारकाम, मातीचें काम, धातूचें काम, टोपल्या करणें, चित्रें काढणें वगैरे धंदे येथें शिकविले जातात. ही शाळा पाहण्यासारखी आहे.

**पदार्थ संग्रहालय**—हें पदार्थसंग्रहालय लाल मंडींत राहण्याकरितां म्हणून बंगला बांधला होता त्यांत आहे. गुरुवारशिवाय तें रोज १० ते ५ उघडें असतें. या पदार्थसंग्रहालयाचा विशेष हा आहे कीं, यांत काश्मीरांत उत्पन्न होणारे तेवढेच पदार्थ ठेविले आहेत. पदार्थसंग्रहांत शिरल्याबरोबर प्रथम बाहेरील व्हरंड्यांत (पडवींत) लढाईचीं हत्यारें ठेविलीं आहेत. व त्या व्हरंड्याच्या भिंतीवर राजपुरुषांचीं चित्रें काढिलीं आहेत. राणा रणजितसिंग, गुलाबसिंग, रामसिंग, रणवीरसिंग, प्रतापसिंग या राजांचीं तीं आहेत.

१ ल्या दालनांत काश्मीरांत सांपडणाऱ्या मेलेल्या पक्षांमध्यें पेंढे भरून ठेलेव आहेत. २ ऱ्या दालनांत काश्मीरी शाली आहेत. त्या निरनिराळ्या

कारकीर्दीत झालेल्या ठेवल्या आहेत. जसें मोंगल, डोंगरा, शीख यांच्या वेळच्या निरनिराळ्या शाली आहेत. त्या कपाटांतून ठेवल्या आहेत. एका कपाटांत एका मोठ्या शालीवर सर्व श्रीनगराचा नकाशा काढून ठेवला आहे. तो फारच चांगला साधला आहे. ३ऱ्या दालनांत लांकडावर नक्षीकाम खोदलेले नमुने ठेवले आहेत. काश्मीरांतील विजेचा कारखान्याचा एक लांकडी नमुना करून ठेवला आहे. गायनवादनाचीं यंत्रें आहेत. औषधसंग्रह बाटल्यांत घालून त्यांवर त्यांचे उपयोग नोंदून ठेवले आहेत. ४थ्या दालनांत बुद्धाच्या पुतळ्याचे नमुने, नाणीं, वगैरे ठेविलीं आहेत. ५ व्या दालनांत कापडावर नकशीकाम करून त्याचे नमुने ठेवले आहेत ६ व्या दालनांत भूगर्भांतील खनिज पदार्थ व वनस्पति यांचे नमुने ठेवले आहेत. ७ व्या दालनांत काश्मीरांतील लोकांचे नमुने, त्यांना पोषाख घालून ठेवले आहेत. ते जम्मूचा डोंगरी, काश्मीरी पंडित व त्याची बायको, यारकंडी मनुष्य, स्कार्डी मनुष्य, काश्मीरी गवळी, कोष्टी, धोबी असे हे नमुने आहेत.

**हॉस्पिटल**—लाल मंडीच्या अलीकडे सरकारी इस्पितळ आहे.

**राजवाडा**—नदीच्या पलीकडच्या तीरावर १ ल्या पुलाजवळ राजवाडा आहे. महाराज येथें असले म्हणजे हा बघण्यास मिळत नाहीं, नसले म्हणजे परवानगी काढून बघण्यास मिळतो. ह्या राजवाड्यांत एक सुवर्णमंदिर आहे. तें बघावयास परवानगी लागत नाहीं.

पहिल्या पुलाजवळ शिकारा करून त्यांतून नदीच्या ओघानें गेलें म्हणजे खालील स्थळें पाहण्यास सांपडतात.

**रघुनाथमंदिर**—दुसऱ्या पुलाच्या व तिसऱ्या पुलाच्या दरम्यान ह्या मंदिराच्या पायऱ्या घाटासारख्या नदीवर आहेत. शिकाऱ्यांतून येथें उतरून हें मंदिर पहावें. श्रीनगरांत हें सर्वांत मोठें मंदिर आहे. त्यांत मोठीं दालनें आहेत. त्यांतून मोठमोठ्या पंडितांचीं धर्मावर प्रवचनें होत असत. काशीपेक्षांहि पूर्वी येथें संस्कृत विद्येला महत्त्व होतें. पण काळाच्या ओघांत काश्मीरांत जिकडे तिकडे मुसलमानी अंमल झाला व त्यावेळीं बहुतेक पंडित बाटले गेले. त्यामुळें ह्या विद्येचा लोप झाला. ४ थ्या पुलाच्या पलीकडे डाव्या हाताला एक मोठी दगडी **पठार** नांवाची मशीद आहे. ही नूरजहान राणीनें बांधविली. ६ व्या पुलाच्या पलीकडे डाव्या आंगाला बायकांचें मिशनरी इस्पितळ आहे.

**यारकंदीसरई**—ही ६ व्या पुलाजवळ डाव्या हाताला आहे. यारकंदीहून जे व्यापारी श्रीनगरला व्यापाराला येतात, त्यांना ह्या सरईंतच राहिलें पाहिजे असा कायदा आहे. व त्यांनीं यारकंदहून आणलेले गालीचे, सोनें, रुपें वगैरे पदार्थांचा बाजार येथेंच केला पाहिजे.

५२०८

**छत्तरबलवेअर**—७ व्या पुलाच्या पलीकडे हें आहे. हें १९१५ सालीं बांधलें गेलें. हें ४४३ फूट लांब आहे. त्यानें झेलम नदींत पाण्याची उंची ६ फूट ज्यास्त राहूं शकते. त्यामुळें उन्हाळ्याच्या व थंडीच्या दिवसांत जेव्हां पाणी कमी होतें तेंव्हांहि येथपर्यंत नदींत बोटी चालूं शकतात. या नदींत ५०×१५ आकाराच्या बोटी चालूं शकतात. हें वेअर पावसाळ्यांत खालीं करितात व वरून पाणी जातें पण उन्हाळ्यांत तें वर करून पाणी अडविलें जातें. उन्हाळ्यांतहि दर आठवड्याला एकदां हें खालीं करून तुंबलेंलें पाणी सोडून देतात. म्हणजे तें नासून जात नाहीं. हें वेअर म्हणजे बंधाराच आहे पण त्यांत तो वर खालीं करण्याची सोय आहे.

आतां येथपर्यंत नदीच्या डाव्या हातच्या इमारती पाहिल्या. उजव्या हातच्या पाहण्याकरितां शिकारा परतवावा व ५ व्या पुलाच्या अलीकडे शिकाऱ्यांतून उतरावें व शिकारा सोडून द्यावा.

**शहाहमदन**—ही भव्य मुसलमानी इमारत लांकडी आहे. ही १४ व्या शतकांत बांधली गेली. ही काली नांवाच्या देवळाचा विध्वंस करून त्याच्याच सामानानें बांधली म्हणतात. हिंदू लोक अजूनहि ह्या ठिकाणीं कालीची पूजा करितात. या इमारतीच्या भिंती आंतल्या बाजूनें १६ बाजूंच्या रंगीत आकृतींनीं मढविलेल्या आहेत. व प्रत्येकाच्या मधोमध आरबी भाषेंत नांवें आहेत. खांब फार मोठे आहेत. त्यांवर व तक्तपोशीवर चांगला रंग दिला आहे.

**महाराज गंज**—शहामादन मशिदीजवळच महाराज गंज नांवाची मोठी पेठ आहे. हिंदुस्थानचा तिबेट, यारकंद या देशांशीं मोठा व्यापार येथें चालतो. ही पेठ १९२९ त जळाली होती. पुन्हां दुरुस्त केली गेली.

**जुम्मा मशीद**—शहामादन व महाराजगंज या दोन ठिकाणच्या दरम्यान पण जरा आंत गेलें म्हणजे जुम्मा मशीद लागते. तारा पीर नांवाच्या हिंदू राजानें प्रथम ६६९ मध्यें येथें देऊळ बांधलें. १४ व्या शतकांत सुलतान अलेक्झांडरनें त्याचें मशिदींत रूपांतर केलें, तेव्हांपासून ही इमारत अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पुष्कळ वेळां पडली. प्रथम १४७९ त जळली. ती पुन्हां बांधली गेली. मग दुसऱ्यांदा जहांगीरच्या कारकीर्दींत १६१९ मध्यें पुन्हां अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडली. पण ती पुढें लवकरच बांधली गेली. पण पुन्हां आग लागली. मग १६७४ त औरंगजेबाच्या कारकीर्दींत पुन्हां बांधली गेली. तीच आंता आहे. १८९३ त काश्मीरच्या महाराजांनीं १२०,००० रु. देऊन तिची दुरुस्ती केली. पुन्हां १९१२ मध्यें त्याच्या दुरुस्तीकरितां ४०००० रु. दिले. या मशिदीनें ४०० चौरस फूट जागा व्यापिली आहे. सभों-

वार उंच भिंती आहेत. पूर्व, दक्षिण व उत्तर या बाजूला भव्य व सुंदर दरवाजे आहेत. व त्याच्या वर मनोरे आहेत. आंत गेल्यावर मोठमोठालीं दालनें व खांबच खांब दृष्टीस पडतात. हे एकंदर ३७८ खांब आहेत. ज्या भागा–वर मनोरे आहेत त्याच्या खालचे खांब ७० फूट उंच आहेत. व त्यांचा घेर ६। फूट आहे. या मशिदींत ३३३३३ लोक नमाज पडू शकतात. एका मिनिटांत १ लक्ष वेळां अल्ला व अकबर म्हणू शकतात.

**हरिपर्वत**—हा पर्वत पाहण्याला परवानगी आगाऊ काढावी लागते. ती मोतमिद दरबार यांजकडे मिळते. या पर्वतावरून पहांटे ४ वाजतां व दुपारीं १२ वाजतां व रात्रीं १० वाजतां तोफ उडविण्यांत येते. हा पर्वत ५० फूट उंच आहे. म्हणजे शंकर पर्वतापेक्षां पुष्कळ लहान आहे. याच्या सभोंवतीं पर्वतीइतका उंच तट आहे. हा तट अकबर बादशहानें १५८६ त बांधला. त्याची लांबी ३ मैल आहे. व उंची २८ फूट आहे. त्याला बांध-ण्याला एक कोट रुपये लागले. त्या टेकडीवर आटा महमदखान यानें १८१२ त किल्ला बांधला. आंत कांहीं जुन्या व पडक्या इमारती, एक कोरडें तळें व काली देवीचें एक देऊळ हीं आहेत. या टेकडीच्या मध्यें दक्षिण अंगाला दोन मशिदी व मकदम शहांचें पवित्र ठिकाण आहे. दुष्काळ, पटकी अशा आपत्तीं-च्या वेळीं मुसलमान लोक येथें जाऊन आपत्ति नाहींशी व्हावी म्हणून प्रार्थना करितात व एक एक घागर पाणी खालून आणून या तलावांत ओततात. पूर्वेच्या अंगाला एक पोखरिबल नांवाचें कुंड आहे व अमरकाल नांवाचें मंदिर आहे. पर्वताच्या दक्षिण व उत्तर बाजूला बदामाच्या मोठमोठ्या बागा आहेत.

या पर्वताच्या पूर्वेला पायथ्याशीं मोठा तुरुंग आहे. त्यांत एक छापखाना आहे. या तुरुंगांत कागद, गालीचे व खादीचें कापड तयार होतें. चीफ मेडिकल ऑफिसरच्या परवानगीनें हें सर्व बघण्यास मिळतें. जवळच वेड्यांचें व महारोग्यांचें इस्पितळ आहे.

## बागा

मुसलमानांनीं हिंदुस्थानावर अनेक स्वाऱ्या करून हिंदुस्थान जिंकून घेतलें. यांत त्यांचे शौर्याचे गुण दिसून येतात पण हिंदु लोक संख्येनें बहुत असून–सुद्धां ते जिंकले गेले याला ते शौर्यादि गुणामध्यें कमी होते हें कारण नव्हे. तर त्यांच्यांत जो मोठा दुर्गुण म्हणजे आपसांत कलह हें मुख्य कारण आहे. अजूनसुद्धां राजकीय, सामाजिक व धार्मिक वगैरे प्रत्येक बाबतींत एकमेकांचा छत्तिसाचा आंकडा आहे. हें द्वैत जेव्हां नष्ट होईल तेव्हां हिंदूंना आपल्या राष्ट्राचें स्वामित्व प्राप्त होईल.

इंग्रजांचें राज्य आज १५० व  येथें चालू आहे पण येथें चिरकाल टिकून राहील अशी त्यांनीं एकहि इमारत बांधली नाहीं. तेंच मुसलमानी राजांकडे पहा. त्यांनीं दिल्ली, आग्रा, लखनौ, अहमदाबाद, विजापूर वगैरे ठिकाणीं अशा प्रचंड इमारती बांधून ठेवल्या आहेत कीं, त्यांची डागडुजी फारशी न करतां त्या आज कित्येक वर्षें झालीं तरी जशाच्या तशा आहेत. मुसलमानी राजांसारखे विलासी राजे सर्व जगांत कोठें सांपडावयाचे नाहीत. जहांगीर बादशहा व त्याची राणी नूरजहान यांनीं आपल्या विलासाकरितां व चैनीकरितां अनेक बागा काश्मीरांत बांधल्या. मोंगल बादशहांनीं काश्मीर मध्यें एकंदर ७७० बागा बांधल्या आहेत. यावरून ते किती विलासी व हौशी होते हें दिसून येतें.

**निषातबाग**— निषात, शालिमार व चश्माईनशाई ह्या बागा दल सरोवराचे कांठीं असल्यामुळें शिकाऱ्यांवरून दल सरोवरांतून जातां येतें. किंवा सडकेनें टांग्यानें अगर मोटारीनें जातां येतें. शिकाऱ्याला अगर टांग्याला २॥–३ रुपये पडतात व त्यांत ३।४ माणसें बसूं शकतात. आपली हौसबोट असेल तर तिला शिकारा असतोच त्यांतून जावें. श्रीनगरांत सर्व बागांत जी उत्तम बाग निषातबाग इच्या तोडीची जगांत दुसरी बाग नाहीं, असें सर्व जगभर प्रवास करणारे प्रवासी सांगतात. निषात म्हणजे आनंद–निषात-बाग म्हणजे आनंदोद्यान होय. ही बाग नूरजहानचा भाऊ आसफखान यानें नूरजहानकरितां १६३० च्या सुमारास बांधली. हिची लांबी ५९५ यार्ड व रुंदी ३६० यार्ड आहे. बागेसभोंवतीं १३ फूट उंचीचा तट आहे. या बागेंत शिरण्यापूर्वी दरवाजाच्या बाहेर तटाला लागून पटांगण आहे. तेथें चिनारचीं झाडें पुष्कळ आहेत. येथेंच टांगे, मोटारी येऊन उभ्या राहतात. मेवामिठाईचीं दुकानेंहि पुष्कळ आहेत. या पटांगणाला लागूनच दल सरोवराचा भाग आलेला आहे. त्यांत शिकारे उभे राहतात. आंत गेलें म्हणजे नदीचा घाट जसा एका पटांगणावर दुसरे चढतें पटांगण त्याप्रमाणें १० चढत्या पटांगणाची ही बाग आहे. अगदी वरलीं तीन पटांगण फार उंच म्हणजे १६।१७ फूट उंचीचीं आहेत. प्रत्येक पटांगणांत बरोबर मध्यावर एक एक पुष्करणी आहे. व सर्व पुष्करण्या १३ फूट रुंद व ८ इंच खोल अशा पाटांनीं जोडल्या आहेत. प्रत्येक पुष्करणींत व पाटांत अनेक कारंजें आहेत. व ते सर्व बहुतेक एका रेषेंत आहेत. या कारंज्यांची संख्या १००–१२५ भरेल. एका पटांगणांतून खालच्या पटांगणांत पाणी धबधब्याच्या रूपानें पडतें. या बागेला पाणी हारवन नांवाच्या तलावांतून पाटानें आणून सोडलें आहे. तें प्रत्येक रविवारीं सोडतात. म्हणून त्याच दिवशीं सर्व कारंजीं

उडत असतात. बाकीच्या दिवशीं पाण्याचा पुरवठा अगदीं थोडा असल्यामुळें कारंजीं उडूं शकत नाहींत. म्हणून ही बाग बघायला येणारे लोक रविवारींच येतात.या बगीच्यांत दोन दुमजली बंगले आहेत.एक आरंभाच्या चौथऱ्यावर व दुसरा शेवटच्या चौथऱ्यावर. या बंगल्यातील लांकडी काम नकशीचें आहे. खालचा बंगला ६०–५० फुटांचा आहे. व या बंगल्याच्या मधोमध एक चौरस पुष्करणी आहे. तिची प्रत्येक बाजू १४ फूट लांब आहे. या पुष्करणीची खोली ३ फूट आहे. या बंगल्यांत बसण्याकरितां बाकें ठेविलीं असतात. या बंगल्यांतून बागेचा देखावा फारच रमणीय दिसतो. या बागेची रचना अशी आहे कीं, बागेच्या पाठीमागें महादेव पर्वत, पुढें दल सरोवर, मध्यें हा सुंदर बाग असा हा मनोहर देखावा पाहिला म्हणजे मनुष्य देहभान विसरून जातो. जगांत या तोडीचा दुसरा बाग नाहीं, याची प्रचीती येऊन मन प्रसन्न होतें व काश्मीरांत आल्याचें व इतका खर्च केल्याचें सार्थक वाटतें.

पुष्करणींतून कालवे काढून पाणी सर्व बागभर खेळविलें आहे. कालव्याच्या कांठावरून जाण्याकरितां पक्का फरसबंदीचा रस्ता केला आहे. बागेंत सर्वत्र हिरवळ लावून त्यामध्यें जागोजाग निरनिराळ्या रंगांचीं फुलझाडें लाविलीं आहेत. लोकांना बसण्याकरितां मधून मधून बाकें टाकिलीं आहेत व दगडाचे चौथरे बांधले आहेत. शिवाय उंच उंच अनेक चिनार वृक्ष आहेत. दर रविवारीं व एरव्हींहि पुष्कळ लोक फराळाचें आणून या वृक्षांखालीं बसून मौज करतात.

**शालीमार बाग**—शालीमारचा अर्थ प्रेमउद्यान असा आहे. ही बाग जहांगिर बादशहानें १६१९ त बांधली. निषातबाग जशी दल सरोवराच्या कांठीं आहे तशी ही नाहीं. दल सरोवरांतून एक मैल कालवा काढून आणला आहे व त्यांत ह्या बागेंतील पाणी सोडलें आहे. या कालव्याची रुंदी १२ यार्ड आहे. कांहीं लोक दल सरोवरांतून, कालव्यांतून शिकाऱ्यानें येतात. कोणी रस्त्यानें टांग्यांतून अगर मोटारींनें येतात. कालव्याच्या कांठीं चिनार, सायप्रस वगैरे झाडांची छाया आहे.त्याखालीं टांगे, मोटारी उभ्या राहतात. या बागेची लांबी ५९० यार्ड व रुंदी वरल्या आंगाला २६७ आहे व खालीं २०७ यार्ड आहे. या बागेभोंवतीं १० फूट उंचीचा तट आहे. या बागेंत निषातबागेपेक्षां पटांगणें कमी आहेत. तीं चारच आहेत. प्रत्येक पटांगणाच्यामध्यें हौद असून त्यांत पुष्कळ कारंजीं आहेत. हे हौद १८ इंच खोल व ९ ते १४ यार्ड रुंदीच्या पाटानें एकमेकांस जोडले आहेत. हौद व पाट यांच्या सभोंवार काळा रंग दिलेल्या चुनखडीच्या फत्तरानें पायवाटा केल्या आहेत. एका पटांगणांतून दुसऱ्या पटांगणांत पाणी धबधब्यानें पडतें. अगदीं वरल्या

पटांगणावर मंडप बांधला आहे. त्याची लांबी रुंदी ६५ फूट आहे. त्याचे खांब काळ्या संगमरवरी दगडाचे आहेत. व त्यावर नकशी खोदली आहे. या मंडपाच्या सभोंवार पाण्याचा हौद आहे,त्याची लांबी रुंदी १६६ फूट आहे, खोली ३॥ फूट आहे. त्यांत १४० कारंजीं आहेत. ह्या बागेंत हिरवळ असून त्यांत गुलाब वगैरे सुंदर फुलांचीं झाडें आहेत. कांहीं फुलझाडें इतकीं लहान आहेत कीं, त्यांचे दांडे हिरवळींतच गडप झालेले असतात. फक्त फुलेंच तेवढीं वर दिसतात. त्यामुळें या हिरवळीवर कोणी फुलें टाकलीं आहेत कीं काय असा भास होतो. या बागेंत चिनार वृक्ष पुष्कळ आहेत. या बागेलाहि पाणी हरवान सरोवरांतून आणलें आहे. व तें दर रविवारीं जास्त सोडतात. त्यामुळें ह्या बागेंत कारंजीं त्या दिवशीं चालू असतात. एरव्हींच्या दिवशीं कारंजाची मौज पहावयास सांपडत नाहीं. या बागेंतहि फराळाचें नेऊन लोक चैन करतात.

**चष्मानशाही** —ही बाग शहाजहान बादशहानें १६३२ मध्यें बांधवली. या बागेंतहि चढतीं पटांगणें आहेत. पण तीं तीनच आहेत. या बागेंत एक मोठा झरा आहे. चष्मान म्हणजे झरा. चष्मानशाही म्हणजे बादशाही झरा.या झऱ्याच्या तिन्ही बाजूला लांकडी दोन मजली इमारती आहेत. खालच्या मजल्यावर बसण्याकरितां ओटे बांधले आहेत. झऱ्यांतून पाणी मांडीभर उंच उडतें. झऱ्याच्या तोंडावर एक उलटें नरसाळे (फनेल) बसविलें आहे.त्यामुळें झऱ्यांतून पाणी उलटचा हंडीसारखें निघालेलें दिसतें व तें खालीं एक कुंड बांधलें आहे त्यांत पडतें. हें पाणी बर्फ वितळून त्याचें झालेलें असतें, म्हणून फार गार व मधुर लागतें. हें पाणी फार पाचक आहे म्हणतात; म्हणून या बागेंत कांहीं प्रवासी मुद्दाम तंबू देऊन राहतात. एका अमेरिकन प्रवाशानें असें म्हटलें आहे कीं, जगांत असें पाचक पाणी दुसरें नाहीं.

**हरवान सरोवर**—या सरोवराच्या तिन्ही बाजूंना गगनचुंबित पर्वत आहेत व चवथ्या म्हणजे दक्षिण बाजूला बंधारा बांधून सरोवर केलें आहे. तिन्ही बाजूंचे पर्वत इतके उंच आहेत कीं, उन्हाळ्यांत सुद्धां त्यांच्यावर बर्फ दृष्टीस पडतें. उन्हानें बर्फ वितळून त्याचें झालेलें पाणी पर्वतावरून खाली येऊन या सरोवरांत सांठतें. म्हणून तें फार थंड व स्वच्छ असतें. या सरोवरांतून नळ काढून शहरांत पाणी नेलें आहे व याच सरोवरांतून पाटांनी शालीमार व निषातबागांना पाण्याचा पुरवठा होतो. बंधाऱ्याच्या कांठावर निरनिराळ्या गुलाबांचीं कलमें लाविलीं आहेत त्यांना वचक्याएवढीं फुलें येतात. तलावाचें क्षेत्रफळ १००० चौरस यार्ड आहे व खोली ३० फूट आहे.

**दल सरोवर**— युरोपांत जसें स्वित्झर्लंड तसें काश्मीरांत दल सरोवर मनोहर आहे. या सरोवरांत हौसबोटीतून लोक राहतात. याच्याच कांठीं निषात, शालीमार, चष्मानशाही इत्यादि प्रसिद्ध बागा आहेत. या सरोवराच्या एका अंगाला महादेव पर्वत व दुसऱ्या अंगाला श्रीनगर शहर आहे. याचा आकार लंब गोल आहे. लांबी ५ मैल व रुंदी २॥ मैल आहे. क्षेत्रफळ १२॥ चौरस मैल आहे. या सरोवराचे तीन भाग पडतात. १ नगीन बाग सरोवर– हें रणबारी व निषातबाग यांमध्यें आहे. २ मोठें दल सरोवर–यांतच रूप लंका बेट आहे. हें निषातबाग व शालीमार बाग यांच्यामध्यें आहे. ३ लहान दल सरोवर–हें निषातबाग व शंकराचार्य टेकडी यांच्यामध्यें आहे. मोठें व धाकटें दल सरोवर यांच्यांत एक कच्चा रस्ता आहे व त्यावर पूल बांधला आहे. त्याच्या खालून शिकारे जाऊं शकतात. या रस्त्याबद्दल एक मजेदार आख्यायिका आहे. येथील लोकांना या सरोवरांत जवळचा रस्ता हवा होता. तो बांधण्याकरितां पुष्कळ प्रयत्न झाले पण ते सिद्धीस गेले नाहींत. तेव्हां तेथें एक साधू आला होता. त्याला लोकांनीं रस्ता कोठें करावा म्हणून विचारिलें. तेव्हां त्यानें एक साप आणला व जेथें आतां रस्ता आहे तेथें पसरला. त्या मार्गावर मग लोकांनीं रस्ता बांधला. सरोवराचा मध्यभाग स्वच्छ व खोल आहे तो इतका कीं खालचा तळसुद्धां दिसतो. मधून मधून कमळें, लव्हाळे, गवतें व तरत्या बागा आहेत. या बागा तयार करतांना पाण्यांत वाढणारीं झाडें पृष्ठभागापासून दोन फुटावर कापतात. त्यामुळें त्यांचा तळाशीं संबंध तुटतो व मग हीं झाडें जरा जवळ आवळून त्याचे दोन यार्ड रुंदीचे व लांबच लांब वाफे तयार करितात व त्यावर शेजारच्या झाडाचा गवतपाला टाकतात व मग एक मातीचा पातळ थर पसरतात व त्यावर मग कलंगडीं, काकड्या, टोमॅटो व फुलझाडें वगैरे लावतात. या सरोवराला पाण्याचा पुरवठा सभोंवार महादेव पर्वताची रांग आहे त्यांतून वाहून येणारे ओढे, नाले, झरे यांनीं होतो. व दल सरोवरांतील पाणी दल दरवाज्यानें बाहेर पडतें. व तेथून तें चिनार नाल्यानें जेहलम नदीला जाऊन मिळतें. दल सरोवरांत शिरलें कीं सर्व देखावा रमणीय आहे. चोहोंकडे उंच उंच हिरवे डोंगर व त्यांचीं बर्फाच्छादित शिखरें, सरोवरांत कमळाचीं पसरलेलीं पानें, लव्हाळे वगैरे दुसऱ्या पानवेली, तत्सम बागा, तलावांत एकरूप लंकांचें बेट, हाऊस बोटींतून राहिलेले लोक, सहल करण्याकरितां फिरणारे शिकारे, क़ांठीं–निषातबाग, चष्मानशाही, शालीमारबाग अशा बागा, एका अंगाला शंकर पर्वत तर दुसऱ्या अंगाला हरिपर्वत हा सर्व देखावा फारच रमणीय आहे.

**रणवारी** —हें एक मोठें खेडें दल दरवाजापासून दल सरोवराच्या एका नाल्यावर एका मैलावर आहे. येथें हिंदूंचीं दोन देवळें आहेत.

**चेविनपातशाही**–येथें शीख लोकांचें गुरुद्वार लागतें. शीख लोकांचा ६ वा गुरु हरगोविंदसिंग याच्या स्मरणार्थ हें बांधलें आहे. याची आख्यायिका अशी आहे कीं,सेवादास नांवाचा एक काश्मीरी पंडित हा शीख लोकांचा५वा गुरु अर्जुनदेव यांचा मोठा भक्त होता.त्याच्या आईचीहि ह्या गुरूवर मोठी भक्ति होती.पण ती आंधळी होती.तिला आपल्या गुरूला पाहण्याची इच्छा होती, पण तें घडावें कसें? तिनें हातानें सूत काढून त्याचा एक चोथा आपल्या गुरूला वाहण्याकरितां बनविला. पुढें अर्जुनदेव वारल्यानंतर त्याचा मुलगा हर-गोविंद शिकंदर बादशहाबरोबर जेव्हां श्रीनगरला आला, तेव्हां त्यानें या साध्वीस भेट देऊन तिला दृष्टि दिली. तेथें त्यावेळीं पाण्याची मोठी पंचाईत होती. तेंव्हां गुरु गोविंदानें जमिनीत भाला खुपसला, त्याबरोबर पाण्याची चिळकांडी वर उडाली. तेथें विहीर बांधून काढली व गुरुद्वार बांधलें. येथें दर रविवारीं शीख लोक प्रार्थनेसाठीं जमतात. दर वर्षी गुरु गोविंदाच्या वाढदिवशीं मोठा मेळा भरतो, त्यावेळी येथें धर्मावर व्याख्यानें होतात. तीं ऐकण्याकरितां कांही इतर धर्मांचेहि हजारों लोक येतात.

**हजरतबल** — रणवारीपासून पुढें एक मैलावर हजरतबल नांवाचें खेडें आहे. येथें मुसलमानांची मशीद आहे. व नमाज पढण्याकरितां मोठें पटांगण आहे. दर शुक्रवारीं बरेच मुसलमान लोक दर्शनासाठीं येथें येतात व वर्षांतून २।३ वेळां येथें जत्रा भरते.

या नाल्यांत तिन्हीं धर्मांचीं पवित्र स्थानें आहेत.रणवारी येथें हिंदून्चीं देवळें, चेविनपातशाही येथें शिखांचें गुरुद्वार व हजरमल येथें मुसलमानांची मशीद.

**निःसीम बाग** —पुढें एक मैलावर मोठ्या दल सरोवराचे कांठी निःसीम बाग आहे. हींत शेकडों मोठमोठाले चिनार वृक्ष अगदीं रांगेनें लाविले आहेत. त्यांखाली तंबू ठोकून लोक त्यांत राहतात. नाहींतर निदान येथें पाण्यांत चिनार वृक्षाच्या सावलीखालीं आपली हाऊसबोट आणून लावतात.

**तेलबल**— या बागेजवळच तेलबल नांवाचा झरा आहे. तेथें मासे पक-डण्याकरितां लोक जातात.हे मासे मोठे असून फार रुचकर आहेत असें म्हणतात.

**रूपलंका**— या सरोवरांत एक लहानसें बेट आहे. त्याला रूपलंका असें म्हणतात. येथें जहांगिर बादशहानें आपली राणी नूरजहान इजकरतां एक बंगला बांधला होता. आतां त्याचा कांहींहि भाग शिल्लक राहिला नाहीं. फक्त २।४ चिनारचीं झाडें आहेत. शिकाऱ्यांतून लोक येथें येऊन झाडाखालीं थोडा विसांवा घेतात व फराळ करतात.

# भाग ७ वा

# काश्मीरच्या पूर्वेतर भागांतील प्रेक्षणीय स्थळें

**गांधरबल** —हें लहान गांव श्रीनगरापासून रस्त्यानें १४ मैल आहे. तेथें जाण्याला दोन मार्ग आहेत. एक सडकेचा व २ रा पाण्यांतून. सडकेनें गेल्यास मोटारी, टांगे मिळतात. पाण्यांतून जावयाचें झालें तर शिकाऱ्यानें किंवा डुंग्यानें जातां येतें. हवें तर आपली हाऊसबोट घेऊन तेथें जावें. व ४।८ दिवस सवडीप्रमाणें रहावें. पुष्कळ साहेब लोक व इतर श्रीमान लोक हें हवेचें चांगलें ठिकाण असल्यामुळें तेथें जाऊन बरेच दिवस राहतात. येथील पाणी मात्र पिऊं नये. कारण येथें जी सिंध नदी आहे तिच्यांतून चुना फार वहात येत असल्यामुळें तें पाणी पिण्याला लायक नाहीं. पाणी पिण्याकरितां व स्वयंपाकाकरितां आसपासच्या झऱ्याचें पाणी आणावें. गांधरबल येथें नदीच्या कांठीं अगदीं नदीला लागून पुष्कळ चिनारचीं झाडें आहेत. त्यामुळें येथील हवा शुद्ध आहे. म्हणून कोणी कोणी ह्या किनारच्या झाडांखालीं तंबू ठोकूनहि राहतात. पाण्यांतून जावयाचें झालें म्हणजे प्रथम जेहलम नदींतून सादीपूरपर्यंत जातात. येथें जेहलम नदीला सिंध नदी येऊन मिळाली आहे. सादीपुरला येईपर्यंत नदीच्या ओघानें येत असल्यामुळें बोट लवकर येते. पण मग सिंध नदींत शिरल्यानंतर प्रवाहाच्या उलट जावें लागतें म्हणून वेळ लागतो. वाटेनें कोठें कोठें तर पाणी अगदीं उथळ असल्यामुळें बोट हांकणारे खालीं कांठावर उतरून दोरीनें बोट ओढीत नेत असतात. गान्धरबल येथें पोष्ट व तार ऑफिस आहे व येथेंच सिंध दरी संपते.

**बिहामा** —गान्धरबल येथून क्षीरभवानी नांवाचें देवीचें स्थान ३ मैलांवर आहे, तेथें जातांना वाटेंत १॥ मैलावर हें खेडें लागतें. येथें एक सुंदर झरा आहे व येथें जकातीचें नाकें आहे. मध्यआशियांतून यारकंद वगैरेकडून श्रीनगराकडे जाणाऱ्या मालावर येथें जकात घेतात.

**क्षीरभवानी** —या नांवाचें मंदिर व पुष्करणी आहे. देवळासभोंवतीं नदीचा प्रवाह आहे. त्याचे आंत एक पटांगण असून त्यावर ३ धर्मशाळा बांधलेल्या आहेत. या पटांगणाचे आंत पुष्करणी बांधलेली आहे व त्या पुष्करणीमध्यें देवीचें देऊळ आहे. उन्हाळ्यांत जम्मूहून महाराज श्रीनगरास राहावयास येतात तेव्हां प्रथम क्षीरभवानीच्या दर्शनास येतात. या पुष्करणीच्या पाण्याचा रंग वारंवार बदलतो. तो पाहण्यासारखा असतो. याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं,या पाण्यांत नैवेद्य, दूध वगैरे जे भाविक लोक टाकतात

त्यामुळें हा रंग येतो. येथें दर महिन्याच्या शुद्ध अष्टमीस मोठी जत्रा भरते. त्यावेळीं पुष्कळ हिंदू लोक देवीच्या दर्शनास जातात.

**सिंधदरी**:— ही दरी गांधरबल येथें संपते असें वर सांगितलें आहेच. येथून तिच्या मुखापर्यंत ५० मैल त्या दरीची लांबी आहे. हिच्या डाव्या किनाऱ्यानें मध्य आशियांत जाण्याची वाट आहे. सिंधदरीच्या मुखापर्यंत जातांना वाटेंत खालील गांवें लागतात.

**कंगण**–गान्धरबलपासून ११ मैल –येथें एक डाक बंगला आहे.येथून हरिमुख पर्वताची शोभा फार सुंदर दिसते. येथें अक्रोडाचीं झाडें पुष्कळ आहेत. त्याच्याखालीं तंबू देऊन राहिलेले लोक क्वचित् दृष्टीस पडतात.

**गुंड**:— १५ मैल. येथें सरई आहे. येथील शोभा अपूर्व आहे.

**सोनमार्ग**:–१३ मैल–उंची ८५०० फूट—हें हवेचें उत्तम ठिकाण आहे. येथें मोटारीनें, टांग्यानें कांहीं येतां येत नाहीं. चालतच यावें लागतें. म्हणून ज्यांना कष्ट सहन करण्याची ताकद आहे तेच लोक येथें येऊन राहतात. येथें एक डाक बंगला आहे. येथें पोष्ट व तार ऑफिस आहे. येथून ५ मैलांवर सिरवल खेडें येतें व पुढें दोन मैलांवर रंगा मशीद लागते.


**बलटल**– ९ मैल. उंची–११५०० फूट— हें झोंजिला पर्वताच्या पायथ्याशीं आहे. येथें सिंध खोऱ्याचा प्रारंभ होतो. व येथून ले,लडाक व मध्य एशियाला रस्ता जातो.

**मानसबल** —हें गान्धरबलहून ६ मैलांवर आहे. म्हणून कोणी गान्धरबलहून परस्पर मानसबलला जातात किंवा कोणी गांधरबलहून परत श्रीनगरला येऊन पुढें सवडीप्रमाणें मानसबलला जातात. मानसबलला हाऊसबोटीनें जाणें सोईचें नसतें, कारण ती फार सावकाश जाते, व तिला हाकारण्याला माणसें फार लागतात. त्यापेक्षां डुंगा करून जावें, हें फार चांगलें. डुंगा हा बोटवाला, त्याची बायको, एखादे दुसरें मोठें मूल अगर दुसरा मनुष्य येवढेंच हाकारून नेऊं शकतात. हा फॅशनेबल नसतो पण यावर चार पांच माणसें राहूं, निजूं शकतात. शिवाय स्वयंपाकाला जागा स्वतंत्र असते. येथें शौचालघवीची मात्र सोय नसते. विधी करावयाचा झाला म्हणजे डुंगा कांठाला लावून कांठावर उतरून करावा लागतो. हाऊसबोटीवर आपला भंगी बरोबर घ्यावा लागतो. नाहींतर बोट कांठाला लावून विधीला जावें लागतें. रात्रींच्या वेळीं एखाद्या गांवाशेजारीं डुंगा उभा करून ठेवतात व दिवस उजाडला म्हणजे तो चालू होतो. गांधरबलहून जा किंवा श्रीनगरहून जा कसें गेलें तरी सादीपुराला जावें लागतें. तेथून जेहलम नदीनें संबळला यावें लागतें व मग एका नाल्यानें मानसबलला जावयाचें.


मानसबल अटक टेकडीच्या पायथ्याशीं आहे. हें सरोवर वाटोळें आहे व त्याचा व्यास १॥ मैल आहे. याचें पाणी इतकें स्वच्छ आहे कीं, त्याचा तळ दिसतो. यांत कमळाचीं झाडें पुष्कळ आहेत. याचे कांठीं लालारूख नांवाची बाग प्रसिद्ध आहे. या सरोवराला पाण्याचा पुरवठा सिंध नदींतून एका नाल्यानें होतो, व हाच नाला सरोवरांतून बाहेर पडून जेहलम नदीला संबळपाशीं मिळतो. व याच नाल्यानें आपण मानसबल सरोवरांत जातो व याच रस्त्यानें परत येऊन दुसऱ्या एका नाल्यानें अंडकुटावरून उरल सरोवरांत जातो. संबळच्या खालीं नदीला एक पूल आहे. त्यावरून बंडीदुरीला जातात व तेथून गिळगिच प्रांतांत जातात.

**उरल सरोवर** — संबळहून नाल्यानें उरल सरोवरांत शिरावें लागतें. हें सरोवर हिंदुस्थानांत सर्वांत मोठें सरोवर आहे. त्यांत वादळें होतात व पुष्कळ लोक प्राणास मुकतात. वादळें बहुतकरून तिसरे प्रहरानंतर होतात. याकरितां यावेळी उरल सरोवरांत कधींहि शिरूं नये. वारा नसला तरीहि जाऊं नये. कारण केव्हां वारा सुटेल व प्राणघात होईल याचा नेम नसतो. पहांटेस वादळ नसतें. याकरितां यावेळीं उरल सरोवरांत शिरावें. जेहलम नदी या सरोवराला येऊन मिळते व यांतूनच ती बाहेर पडते व पुढें वहात जाते. आणखीहि पुष्कळ नद्यानाले याला येऊन मिळाले आहेत. या सरोवराचा व्यास उन्हाळ्यांत १४ मैल असतो व हिंवाळ्यांत ७ मैल होतो. सरोवरांत शिरल्यावर विलायतेला जातांना समुद्रांत गेल्यावर जसें वाटतें तसें येथें वाटतें. जिकडे तिकडे पाणीच पाणी, कोठें कोठें कमळें वगैरे उगवलेलीं दृष्टीस पडतात. यांत एक **सोनलंका** नांवाचें बेट आहे. सरोवरांत जर तुफान झालें व त्यांत बोटी सांपडल्या तर त्यांनी या बेटाचा आश्रय करावा म्हणून जैनुल्लाभदीन बादशहानें कांही सोयी केल्या आहेत. त्याचें येथें थडगें आहे. शिवाय पूर्वीच्या हिंदू राजांच्या वाड्यांचे कांहीं अवशेष आहेत.

सरोवराचे एका बाजूला **हरणकप** नांवाचा पर्वत आहे. याची उंची १६००० फूट आहे. त्याच्यावर सदोदित बर्फ असतें. एका लहान टेकडीच्या पायथ्याशी शुकरुद्दिनची झिरामत आहे. हें मुसलमानांचें पवित्र स्थान आहे. असें हें उलर सरोवर, विस्तीर्ण आहे. त्याच्या एका काठीं उंच पर्वत, एका टेकडीच्या पायथ्याशीं मुसलमानांचें पवित्र स्थान, जेहलम नदी एका अंगानें आंत शिरतें व दुसऱ्या अंगानें बाहेर पडतें. जागोजागी कमळें वगैरे फुलझाडें, केळीं, सरोवरांत एक बेट असा हा सुंदर देखावा शब्दानें वर्णन करतां येणार नाही. जे काश्मीरला जातील त्यांनी प्रत्यक्ष उरल सरोवर पाहिल्याशिवाय राहूं नये. उलर सरोवरांतून पुन्हां परत न जातां एका



अचावल-बाग



जम्मू शहर

नाल्यानें सोपूर गांवाला यावें. येथून हवें तर मोटारीनें श्रीनगरला जावें, किंवा गुलमर्गला जावें.

**गुलमर्ग** — मर्ग = मैदान, गुल = फुलें. फुलांचें मैदान. हें श्रीनगरपासून २५ मैलांवर आहे व सोपूरपासून १७ मैलांवर आहे. श्रीनगरपासून रावळपिंडी रस्त्यानें ९ मैल गेल्यावर मग गुलमर्गला रस्ता फुटतो. सोपूरहून आलें तरी याच ९ व्या मैलापासून गुलमर्गला जावें लागतें. श्रीनगरहून मोटारीनें माणसीं २।।–३ रु. पडतात. मोटार टंग मार्गपर्यंत जाते. तेथून पुढें चढाव ४ मैल आहे. टंग मर्गहून वर पायीं जावें किंवा घोड्यानें जावें. घोड्याला माणशीं १२ आणे पडतात व सामान नेण्याकरितां माणशीं ४ आणे हमाली पडते. वर जाण्याला दांड्या ( डोल्या ) मिळतात. येथें पाऊस सारखा पडत असतो. त्यामुळें वाट निसरडी होते, म्हणून पायीं जाणें त्रासाचें होतें. श्रीनगरला उन्हाळा सुरू झाला म्हणजे साहेब लोक गुलमर्गला येऊन राहतात. गुलमर्ग हें श्रीनगरचें महाबळेश्वर आहे. महाबळेश्वर हें समुद्रसपाटीपासून ४००० फूट उंच आहे पण गुलमर्ग हें ८५०० फूट उंच आहे. वर गेल्यावर सपाटी लागते. तिचा आकार अर्धचंद्राकृति आहे. लांबी २ मैल व रुंदी अर्धा मैल आहे. येथील हवा फार थंड आहे, ती इतकीं कीं, भर उन्हाळ्यांत ३० अंशांवर पारा असतो. त्यामुळें उन्हाळ्यांतसुद्धां जिकडे तिकडे बर्फ पडलेलें असतें. हें बर्फ पिठीसारखें असतें व त्यावरून चालू लागलें म्हणजे पाय आंत रुततात, व गारठून जातात. कांहीं दिवसांनीं या बर्फाच्या कठीण शिळा बनतात. या बर्फावरून घसरगुंडीचा खेळ खेळणें किंवा त्यांचे गोळे करून एकमेकांस मारणें हे खेळ खेळण्यांत मोठी मौज वाटते. येथें आल्यावर लोक हॉटेलमध्यें राहतात किंवा तंबू ठोकून राहतात. हिंदू लोकांकरितां खालसा हॉटेलची येथें शाखा आहे. पण तिचा दर दररोज दर माणशीं १० रु. आहे. नेडोझ हॉटेलचीहि येथें एक शाखा आहे. अर्धचंद्राकृति जें मैदान आहे त्याच्या सभोंवर सडक काढिलेली आहे. या सडकेनें फिरावयास गेलें म्हणजे सभोंवतालची वनश्रीची शोभा फारच रमणीय दिसते. सिमला, मसुरी वगैरे हिमालयांतील उंच हवेचीं ठिकाणें या सर्वांपेक्षां येथील सृष्टिसौंदर्य फारच मनोहर आहे. येथें चित्रविचित्र रंगांचीं अनंत फुलझाडें, पाईनसारखे मोठे वृक्ष आहेत. उरल सरोवराचा देखावा येथून दिसतो. नंगा पर्वत, ज्याची उंची २०००० फूट आहे तो येथून चांगला दृष्टीच्या टप्प्यांत येतो. शिवाय येथील सपाटी चांगली असल्यामुळें पोलो, टेनिस, हॉकी वगैरे खेळ येथें खेळतात. व त्याच्या मॅचेस उन्हा-

ळ्यांत सारख्या चाललेल्या असतात. त्यामुळें इंग्लिश लोकांना इंग्लंडपेक्षांहि येथें जास्त मजा वाटत असावी. येथें विजेचे दिवेहि आलेले आहेत. येथें बाजार बरा आहे. पण सर्व जिनसा फार महाग मिळतात. दूध, दही मात्र स्वस्त मिळतें. लांकडें तर फुकट मिळतात. त्यामुळें येथील सर्व घरें लांकडी आहेत. अति थंड प्रदेशांत दगडी घरें असतील तर जास्तच थंडी वाजेल. लाकूड मंदवाहक असल्यामुळें त्याचीं घरें करतात हें बरें आहे. तंबूंत-सुद्धां खालीं लाकडांची बैठक करतात. जमिनीवर वावरलें तर पाय धरतात व निजलें तर अंग धरतें. भर उन्हाळ्यांत सुद्धां लोक कागरी वापरतात. इतकी थंडी आपल्या लोकांना सहन होत नाहीं म्हणून ते येथें एकादा दुसरा दिवस राहून श्रीनगरला जातात. थंडीच्या दिवसांत येथें बर्फ इतकें पडतें कीं, तें घराच्या आढ्याला लागतें. त्यामुळें येथें, येथील रहिवाशीसुद्धां हिवाळ्यांत राहूं शकत नाहीं.

**किलनमर्ग**— किलनमर्गला बहुतकरून चालत जातात. कोणी घोड्यावरूनहि जातात. चढाव बराच आहे. पण वर गेल्यावर एक मोठें मैदान लागतें व तेथें चित्र विचित्र रंगांचा गालिचाच पसरला आहे असा येथील देखावा पाहून भास होतो, व चढून आल्याचें सार्थक वाटतें. या मैदानाच्या मधोमध दोन अति थंड पाण्याचे झरे आहेत. तेथें फराळाचें घेऊन जाऊन लोक खातात.

**अलापथर**—किलनमार्गहून येथें येण्यास २ तास लागतात. चढणहि बरीच आहे व वाट कठीण आहे. ही एका नाल्याच्या बाजूनें आहे. हा नाला बर्फानें भरलेला असतो. मधून मधून बर्फावरून चालत जावें लागतें. अलापथर हें १४॥ हजार फूट उंच आहे. हें ठिकाण दोन पर्वतांच्या दऱ्यांत आहे. त्यांत दोन तलाव आहेत. त्यांतील पाणी स्वच्छ असून अतिशय थंड असतें. उन्हाळ्यांत सुद्धां सकाळीं पाणी गोठून पाण्यावर बर्फ तरंगतांना दृष्टीस पडतें. पाण्यांत सभोंवतालच्या पर्वतांच्या शिखरांचें प्रतिबिंब पडून देखावा फारच सुंदर दिसतो.

---

# भाग ८ वा
# पूर्व भागांतील प्रेक्षणीय स्थळें

श्रीनगरापासून पूर्वेच्या अंगानें जम्मूला सडक जाते. तेव्हां या रस्त्यानें जर स्वदेशीं परत यावयाचें असेल तर श्रीनगरचा मुक्काम हलवून पूर्वेकडचीं स्थळें बघत बघत जम्मूला जावें. नाहींतर पूर्वेकडचीं स्थळें पाहून परत श्री-

नगरला येऊन कांहीं दिवस राहून मग जम्मू रस्त्यानें अगर रावळपिंडी रस्त्यानें स्वदेशीं जावें. दोन्ही रस्ते लांबीनें साधारण तितकेच आहेत. रावळपिंडी रस्ता १९८ मैल आहे. पण जम्मूचा रस्ता २०३ मैल आहे. पण जम्मूचा रस्ता अवघड आहे व वाटेंत वळणें फार आहेत तरी हा रस्ता पाहण्यासारखा आहे. शिवाय जम्मू शहर या रस्त्यानें पाहावयाला सांपडतें म्हणून एका रस्त्यानें यावें व दुसऱ्या रस्त्यानें जावें.

**सोनावर बाग**—श्रीनगर सोडून पूर्व रस्त्यानें जाऊं लागलें म्हणजे १ ल्या पुलापासून २॥ मैलांवर सोनावर बाग लागते. यांतूनच जम्मूचा रस्ता जातो.

**कॅन्टोन्मेंट**—पुढें एक मैलावर कॅन्टोन्मेंट लागतें.

**पाद्रीतनचें देऊळ**—येथून एक मैलावर पाद्रीतनचें देऊळ लागतें. काश्मीरची राजधानी पूर्वी येथें होती. १० व्या शतकांत त्या वेळच्या राजानें येथें महादेवाचें देऊळ बांधलें. पुढें येथें ९६० त फार मोठा अग्निप्रलय झाला व सर्व शहर खाक झालें, पण देऊळ तलावांत असल्यामुळें तें बचावलें. येथील राजधानी मग श्रीनगर येथें नेण्यांत आली. हें देऊळ दगडी आहे व त्याचा आकार मनोऱ्यासारखा आहे. याचें छतहि दगडी आहे. त्यांत अप्सरांचीं चित्रें, त्यांच्या हातांत फुलांचे गुच्छ दिले आहेत अशीं तीं चित्रें खोदलेलीं आहेत. या देवळाचा चौथरा ६ वार चौरस आहे. देवळांत महादेवाची मूर्ति होती पण ती कोणी लांबविली.

**पामपूर**—श्रीनगरापासून ८ मैलांवर पामपूर गांव आहे. तें केशराच्या बागेसंबंधानें प्रसिद्ध आहे. आक्टोबर महिन्यांत केशराच्या फुलांना बहार येतो व त्यावेळीं जिकडे तिकडे केशराचा परिमल सुटलेला असतो. त्यामुळें मनाला मोठा आनंद होतो.

**अवंतीपूर**—पुढें ८ मैलांवर म्हणजे श्रीनगरापासून १६ मैलांवर अवंतीपूर लागतें. येथें पुष्कळ देवळें होतीं. ती सर्व अवंतीवर्मा राजानें ९ व्या शतकांत बांधिलीं होतीं, व त्यांवर सुंदर नक्षीकाम केलें होतें. पण ती आतां अगदीं नामशेष झालीं आहेत. त्यांतील मुख्य दोन देवळांचे अवशेष मात्र राहिले आहेत. हीं देऊळें महादेवाचीं होतीं. एकाचें नांव अवंतीश्वर व दुसऱ्याचें नांव अवंतीस्वामी

**बिजबिहार**—पुढें जवळच बिज–बहार गांव येतें. हें बीज नांवाच्या राजानें इ. स. पूर्वी १०० व्या वर्षी वसविलें म्हणून त्याचें नांव विजयपुरा पडलें, त्याचा अपभ्रंश होऊन बिजबहार झालें. पूर्वकाळीं येथें मोठें विद्या-विहार (विद्यापीठ) होतें त्याचा अपभ्रंश होऊन बिजबहार झालें असेंहि सांग-

तात. येथील चिनार वृक्ष फार मोठे आहेत. एका चिनार वृक्षाचा घेर ५४ फूट आहे. नदीला सुंदर घाट बांधलेले आहेत.

**संगम**—अवंतिपुरापासून ९ मैलांवर म्हणजे श्रीनगरपासून २५ मैलावर संगम येथें विश्व व रामबिहार या नद्यांचा संगम झाला आहे म्हणून हें नांव पडलें आहे. या संगमावर एक लाकडी पूल आहे.

**खणबल**—संगमपासून ४ थ्या मैलांवर खणबल लागतें. तें लागण्याचे अगोदर अर्ध्या मैलावर जम्मूला जाणारा रस्ता फुटतो. येथें जेहलम नदीवर लाकडी पूल आहे. कोणी श्रीनगरपासून खणबलपर्यंत पाण्यांतून डुंग्यानें येतात. पण पाण्यांतील मार्ग ४६ मैलाचा आहे व वेळहि फार लागतो म्हणून कंटाळा येतो. लोक बहुतकरून सडकेनें मोटारीनें जातात.

श्रीनगरापासून **खणबल** ३३मैल; पुढें **अनंतनाग** १ मैल; **मटण** ४ मैल; **ईशमुख** ११ मैल; **पेहलगांव** (धनगरनगर) १२ मैल; **चंदनवाडी** ९ मैल; **शेषनाग तलाव** ४ मैल; **वायडाल** ५ मैल; **पंशतरणी** ८ मैल; **अमरनाथ** ५ मैल.

**अनंतनाग** (इस्लामबाद)–खणबलपासून एक मैलावर अनंतनाग नांवाचें शहर लागते. मुसलमान लोक याला इस्लामबाद म्हणतात. हें एका सुळकेदार टेकडीच्या पायथ्याशीं वसलें आहे. हें हिंदू लोकांचें पवित्र स्थान आहे. येथें कोणी गेलें म्हणजे तीर्थोपाध्याय चोपडया घेऊन भेटतात. येथील पवित्र ठिकाण म्हणजे पाण्याचें कुंड होय. या कुंडांत एक झरा शेजारच्या डोंगरांतून वहात येऊन पडतो. नाग म्हणजे झरा . हें कुंड ४० फूट औरस चौरस आहे व त्याची खोली ३।४ फूट आहे. पाणी निर्मळ असल्यामुळें तळ दिसतो व त्यांत पुष्कळ निळया रंगाचे मासे आहेत. या कुंडांतील झरा एवढा मोठा आहे कीं, कुंडांतून सारखें पाणी बाहेर वहात असतें. श्रीविष्णूनें येथें लाथ मारली व तेथून हा झरा निघाला म्हणून त्याला तीर्थ मानतात. येथें दुसरें एक लहान कुंड आहे, पण त्यांतील पाण्याला गंधकाचा वास येतो. आपल्याकडील गंधकाच्या झऱ्याचें पाणी ऊन असतें. पण याचें पाणी थंड आहे. आणखी येथें पुष्कळ झरे आहेत म्हणूनच या गांवाला अनंतनाग म्हणतात. गांव भरवस्तीचा आहे. श्रीनगरा खालोखाल येथें वस्ती आहे, पण गांव गलिच्छ आहे. येथें हलके गालिचे तयार करितात त्यांना गबे म्हणतात. ते तयार करण्याचे कारखाने आहेत. तसेंच शाली, लोंकरीच्या दुलया, छिटें वगैरे माल येथें तयार होतो. येथें कांहीं केशराच्या बागाहि आहेत. येथें लाकडावर खोदीव नक्षीकाम चांगलें होतें.

अनंतनागाहून मटण, मार्तंड, पेंहलगांव, कुकटनाग, वेरीनाग वगैरे ठिकाणीं जाण्याकरितां मोटारी मिळतात.

**मटण** :— अनंतनागाहून ४ मैलांवर मटण नांवाचें खेडें आहे. येथें पाण्याचे झरे व कुंड आहे. व हें तीर्थ आहे म्हणून येथें तीर्थोपाध्याय आपल्या चोपड्या घेऊन येतात. येथील एका कुंडांत निळे मासे आहेत. येथें चिनार झाडांचें मैदान आहे.

**गुहा** :— येथून जवळच एक बुमझू नांवाची गुहा आहे. ती २०० फूट लांब आहे. ती तोंडाशीं बरीच रुंद असल्यामुळें त्यांतून उभें राहून चालत जातां येतें. पण ती पुढें चिंचोळी झाल्यामुळें रांगत जावें लागतें. रस्त्यानें थोडें पुढें गेलें म्हणजे आणखी एक गुहा लागते. पण ती अशी खोल नाहीं. तींत एक देऊळ आहे.

**मार्तंड देवालय**:— मटण पासून १॥ मैलावर डोंगरावर हें देऊळ आहे. त्याचा दरवाजा फार भव्य आहे. व त्यावर नक्षीचें काम फार सुबक केलें आहे. आंत गेलें म्हणजे एक पटांगण लागतें. त्याच्या मधोमध देऊळ आहे. हें देऊळ फार जुनें-म्हणजे इसवी सन ३०००—वर्षांपूर्वीचें रामदेव राजानें बांधलें. त्याचा आकार दीर्घवर्तुळ आहे. हें काळ्या संगमरवरी दगडाचें बांधलेलें आहे. त्यावरील कोरीव काम जरी झिजून गेलें आहे तरी कामगिरी उत्तम दिसून येते. या देवळाचे कांहीं दगड ६ ते ९ फूट लांबीचे आहेत. एवढे मोठे दगड आणले कसे व एकावर एक रचले तरी कसे हें मोठें आश्चर्य आहे. देऊळ २४०—१४०—४० फूट आहे. ह्या देवळाची स्थापना ललितादित्य राजानें केली म्हणून येथें एक लेख आहे. शिकंदर बादशहानें या देवळाचा नाश केला. हें देऊळ सूर्याचें आहे. सूर्याचें व ब्रह्मदेवाचें देऊळ कोठें फारसें आढळत नाहीं. कोल्हटकरांचें कोंकणांतील गांव जें नेवरें तेथें एक आदित्याचें देऊळ आहे. तसेंच झांशीपासून ६ मैलांवर बरज्यू गांवीं सूर्यनारायणाचें प्रसिद्ध देऊळ आहे.

**ईषमुख** :— मटणपासून ७ मैलांवर हें गांव लागतें. हें अनंतनागाचे खालोखाल मोठें गांव आहे. हें एका डोंगरावर वसलें आहे. येथें आक्रोडचीं झाडें पुष्कळ आहेत. झेनउल जैनुल्लाभदीन बादशहाची येथें कबर आहे.

**पेहलगांव**:— ईषमुखाहून १२ मैलांवर पेंहेलगांव हें उत्तम हवेचें ठिकाण आहे. हें समुद्रसपाटीपासून ७२०० फूट उंच आहे. हें शेषनाग व कौलाहिया या दोन नाल्यांच्या संगमावर आहे. येथें एक लहान पटांगण आहे, त्यावर रहाण्याकरितां येणारे लोक तंबू ठोकून रहातात. येथें क्षयरोगी बरे होतात अशी येथील हवेची आख्यायिका आहे. येथें पाईनचीं झाडें पुष्कळ आहेत,

पण हे पाईन निळ्या रंगाचे आहेत. जेथें म्हणून निळे पाईन असतात तेथील हवा चांगली असते. देवदाराच्या झाडाप्रमाणें ह्या झाडापासून टरपेंटाईन काढतात. येथें देवदाराचीं झाडें पुष्कळ आहेत.सभोंवार उंच उंच पर्वतांचीं बर्फमय शिखरें, मोठमोठीं झाडें, जिकडे तिकडे पाण्याचे पाटच पाट असा हा देखावा अपूर्व आहे. येथून सोनसार, शेषनाग, हरनाग वगैरे ठिकाणीं घाडशी लोक सफरी करतात. येथें वाटेचे दोन फाटे होतात. एक आरनला जातो व दुसरा अमरनाथाला जातो.

**अमरनाथ**:–हें फैलगांवापासून ३१ मैलांवर आहे व श्री नगरापासून ९२ मैलांवर आहे.काशी, रामेश्वर, बद्रिकेदार व अमरनाथ हीं हिंदूंची अत्यंत पवित्र स्थानें आहेत. काशी, रामेश्वर येथें आगगाडीनें जातां येतें. पण बद्रिकेदार व अमरनाथ हीं हिमालयांत अति उंच असल्यामुळें व तेथें सदोदित बर्फ असल्यामुळें तेथें जाणें फार धोक्याचें आहे.पण येथें मरण आल्यास मुक्ति मिळते या भावानेनें यात्रेकरू लोक येथें जातात. येथें श्रावण शुद्ध पौर्णिमेस मोठी जत्रा भरते. श्रावण शुद्ध १।२ येस श्रीनगर येथें हजारो यात्रेकरू व साधूलोक जमतात. कोणी मटणपर्यंत, कोणी पेहेलगांवापर्यंत मोटारीनें जातात, पण पुष्कळ लोक पायींच जातात, कारण पायीं जाणें जास्त पुण्यकारक आहे असें समजतात. पायीं जाणारे श्रीनगराहून श्रावण शु।। ४ थीला निघतात.वाटेंत अनंतनाग येथें तीर्थयात्रा करून मटण येथें षष्ठी सप्तमीला येतात.व मटणहून सगळे नवमीला निघतात. बरोबर सरकारी धर्मखातें असतें. शिवाय सरकारी डॉक्टर, पोलीस, अनंतनागचे तहशीलदार, सेवासमीती स्काऊटस्,एक लहानसा बाजार, अशी ही यात्रा नवमीला मटणहून निघते. मटण येथें साधू लोकांना संस्थानांतून कांबळी व दक्षणा वाटतात. जे साधू लुच्चे असतात ते कांबळी दक्षणा मिळाली म्हणजे परत निघून जातात. पण भाविक लोक पुढें चालूं लागतात.

पंढरपूरची यात्रा जशी मुक्काम करीत करीत पंढरपूरला जाते व त्यांचीं मुक्कामांचीं ठिकाणें, व दिवस ठरलेले आहेत त्याप्रमाणें हीहि यात्रा ठराविक दिवशीं ठराविक ठिकाणीं जाते. अमरनाथाचा झेंडा पुढें चालतो व त्याच्या मागें पोलीस असतात. त्या झेंडयाच्या पुढें कोणी चालायचें नाहीं असा कायदा आहे. पोलिसाच्या मागें साधू व वारकरी असतात. थोडे लोक तट्टावरून व डोलींतून जातात. सर्वांचे मागें धर्मखात्याचे व दवाखान्याचे कामगार असतात. वारकरी अमरनाथाच्या भजनाचीं पद्यें म्हणत वाटेनें चाललेले असतात. वाटेंत **इंषमुख, पेहेलगांव, चंदनबरी, शेषनाग, वावजन, पंचतरणी,** येथें मुक्काम करीत करीत श्रावण शु. १४ ला पंचतरणी येथें

येतात. पेहेलगांवापासून पुढें मनुष्यवस्ति किंवा झाडझुडूप दृष्टीस पडत नाहीं कारण पुढील सर्व भाग बर्फमय असतो. पंचतरणी येथ तंबू, पाले वगैरे बाजार बसतो, व वारकरी वगैरे पौर्णिमेला अमरनाथाचे दर्शनाला जातात. हें ठिकाण एका गुहेंत आहे. या गुहेला जाण्याचा रस्ता बैंराटी घाटावरून आहे व तो घाट १४५०० फूट समुद्रसपाटीपासून उंच आहे. तेथून पुढें जरा खालीं उतरावें लागतें व मग अमरावती ओढा लागतो व येथून अमरनाथाला जावें. अमरनाथाची गुहा १३००० फूट उंच आहे या गुहेची लांबी व खोली १५० फूट आहे. वरच्या बाजूनें जें पाणी ठिपकत खालीं पडतें तें गोठून त्याचें शिवलिंग बनतें. याप्रमाणेंच पार्वती व गणपती यांच्याही मूर्ती बनतात. शुद्ध पक्षांत चंद्राप्रमाणें या मूर्ती वृद्धि पावतात व कृष्ण पक्षांत यांचा क्षय होतो असा समज आहे. यात्रेकरू मोठमोठ्यानें ओरडून देवाची प्रार्थना करतात. त्या ओरडण्याच्या आवाजानें गुहेंतून पारवे जर बाहेर आले तर देव आपणांस पावला असें समजतात. येथून जवळच एक विष्णूचें स्थान आहे.

श्रीनगराहून बालटलवरून दुसरा एक रस्ता आहे, तो ७१ मैल पडतो. बालटलपर्यंत ५९ मैल चांगली सडक आहे कारण या सडकेनें लडाक व मध्य एशियांत जाण्याचा मार्ग आहे. पुढें अमरनाथ बारा मैल राहातें, पकीं अमरनाथापासून अलीकडे संगमापर्यंत ३ मैल सडक आहे. फक्त ९ मैल सडक करावयाची राहिली आहे. या ९ मैलांत सारखें बर्फ पडलेलें असतें व त्यावरून लोक जातात. पण जुलईमध्यें हें जेव्हां वितळूं लागतें तेव्हां मोठी पंचाईत पडते. बाजूनें डोंगर आहेत त्यांतून जंगल वगैरे तोडून जर रस्ता केला तर यात्रेकरूवर मोठे उपकार होतील. असें झालें म्हणजे एक दिवसाचा प्रवास निर्जन व निरवृक्ष भागांतून करावा लागेल. बाकी बालघाटपर्यंत मोठमोठीं झाडें आहेत व त्यामुळें छाया व जाळण्यास लाकूड भरपूर मिळूं शकतें. याच काय त्या दोन मुख्य जिनसाची जरूरी वाटेंत लागते. सोनमार्गाच्या अलीकडे ६ मैलपर्यंत नीलग्रार पर्यंत वस्ती आहे. तेव्हां हा रस्ता केला तर यात्रेकरूंची मोठी सोय होईल.

अचवल, वेरीनाग वगैरे पहाण्याकरितां पेहेलगांवाहून अनंतनागाला यावें लागतें अनंदनागावाहून **अछावल**–६ मैल. पुढें **कोकटनाग**–७ मैल. व पुढें **वेरीनाग**–८ मैल.

**अछावलबाग** (बेगमबाग)–अनंतनागापासून ६ मैलांवर आहे. **अक्ष**-राजानें इ. स. पूर्वीं ३०० वर्षे येथें मोठें अक्षबल नांवाचें शहर बसविलें. त्याचा अपभ्रंश होऊन अच्छाबल झालें आहे. येथें एक सुंदर बाग आहे. या बागेला पाण्याचा पुरवठा या बागेच्या मागच्या अंगाला एक डोंगर आहे, त्यांतून पुष्कळ

झरे निघतात, त्यांनीं होतो. त्या झऱ्यांपैकीं एक झरा फार मोठा आहे, तो एक फूट जाड आहे व तो कारंज्यासारखा वर उडतो. ब्रिन्धी नांवाची नदी दिवलगांवाजवळ गुप्त होऊन अछाबल येथें या झऱ्याच्या रूपानें बाहेर पडतें असें सांगतात. या डोंगरावर देवदाराचे मोठमोठे वृक्ष आहेत. मागें डोंगर, त्यावर उंच उंच वृक्ष व डोंगरातून उडणारा मोठा झरा व या झऱ्याच्या पाटानें पाणी सर्व बागभर खेळविलेलें व तें तीन धबधब्याच्या रूपानें बाहेर पडतें यामुळें या बागेला फारच शोभा आली आहे. हा बाग शहाजहान बादशहाच्या मुलीनें बांधविला म्हणून याला बेगमबाग असें म्हणतात. या मुलीचें नांव बेगमजहान-अरा–होतें. हीच १६४४ त भाजून फार आजारी झाली असतां तिला गॅबिएल ब्राऊटन या नांवाच्या एका इंग्रज डॉक्टरानें बरी केली. तेव्हां बादशहानें त्याला जहागिरी देऊं केली ती त्यानें नाकारली. तेव्हां तुला काय पाहिजे म्हणून बादशहानें विचारलें. तेव्हां तो उत्तरला कीं, "ब्रिटिश मालावर जकात माफ करावी." केवढा हा त्याचा स्वदेशाभिमान ! या बागेची लांबी ४६७ फूट आहे व रुंदी २४५ फूट आहे. चोहोंबार दगडी-भित आहे. झऱ्याचें पाणी बागेंत खेळवून त्याचे तीन पाट काढले आहेत. मधला पाट १६ फूट रुंदीचा आहे. बाजूचे दोन्ही याच्या निम्म्याहूनही लहान आहेत. या पाटांचें पाणी धबधब्याच्या रूपानें भितीच्या बाहेरच्या अंगाला पडतें. बागेंत शिरण्यापूर्वी हें तिन्ही धबधबे नजरेस येतात. त्यांचें तें शुभ्र स्फटिकाप्रमाणें पाणी १२ फूट उंचीवरून उड्या घेतांना पाहून आनंद होतो, व आगाऊं या बागेबद्दल अनुकूल ग्रह होतो. बागेंत शिरल्यावर ही एवढी विस्तीर्ण सुंदर बाग पाहून तो दुणावतो.

बागेंत पाटांमधून पायवाटा बांधून काढल्या आहेत, मधला पाट रुंदावून त्यांत दोन पुष्करणी बांधल्या आहेत. एक फार विस्तीर्ण म्हणजे १८८X७४: आहे व तींत पुष्कळ कारंजीं आहेत. लहान पुष्करणीवर एक मंडप घातला आहे. तिन्ही पाटांत हीं कारंजीं बसविलीं आहेत. हीं सर्व उडूं लागलीं म्हणजे मौज वाटते. हे तिन्ही पाट धों धों वहात जाऊन पुढील भितीच्या बाहेर १२ फूट उंचीच्या उड्या घेतात. बागेंत चिनार वृक्ष पुष्कळ आहेत, व त्यांच्या बुंध्यांशीं दगडी चौथारे बांधून काढले आहेत. इतर फुलझाडें व हिरवळ राखून बागेंत चोहोंकडे पाणी खेळविलें आहे. निपात, शाली-मार बागाप्रमाणें येथेंही चढतीं पटांगणें आहेत, पण तीं थोडीं आहेत व कारंज्यांची संख्याहि थोडी आहे तरी पण त्या दोन बागांप्रमाणें हीहि बाग उत्तम बाग म्हणून गणली जाते. काश्मीरांतील सर्व बागांत याच तीन बागा फार नामी आहेत. येथें लोखंडाची खाण आहे. अच्छाबलच्या



काश्मिरी पंडित



अमरनाथ गुहा

एका कोपऱ्याच्या मागें ट्राऊट माशांची बाग आहे. ट्राऊट मासे फार स्वादिष्ट असतात व ते फार दुर्मिळ असतात, ते इतके कीं, १२ रु. शेर मिळतात. तेव्हां ते राजेरजवाड्यांच्याच खाण्यांत येतात. यांची जोपासना मोठ्या व्यवस्थेनें केली आहे. अशीच आणखी एक बाग श्रीगनर जवळ आहे. या बागेंत दोन दोन फूट रुंदीचे सात पाट काढले आहेत व त्यांत पाणी खेळविलें आहे. त्यांत निरनिराळ्या वयोमानाप्रमाणें मासे सोडले आहेत. एका पाटाचा दुसऱ्या पाटाशीं संबंध नाहीं. हे मासे आपल्या पाटांत इतस्ततः हिंडत असतात. त्यांना चुरमूरे किंवा बिस्कीटाचे तुकडे घातले म्हणजे खाण्याकरितां ते धरपडत असतात, तेव्हां मौज दिसते.

**कोकटनाग**:— आच्छाबलपासून ७ मैलांवर हा झरा वीरनागाच्या वाटेवर लागतो. हा फार मोठा झरा आहे व त्याचें पाणी अति गार असतें. ह्या झऱ्यास ६ मुखें आहेत. या झऱ्याचें पाणी बेरंग नांवाचे नदीस जाऊन मिळतें. चष्मानशाही झऱ्याप्रमाणें या झऱ्याचें पाणी पाचक आहे असें म्हणतात.

कुकटनागाहून **सोफालेन** व **सुंदरबन** येथें जाण्याला वाटा आहेत. सुंदरबन हें पवित्र ठिकाण आहे. येथें सुंदर झरे आहेत. सोफालेन येथें लोखंडाची खाण आहे.

**जेहलम नदीचा उगम**:–जेहलम नदी प्रथम आपण जेहलम स्टेशनवर पाहतों. रावळपिंडी रस्त्यानें जरा पुढें आल्यावर प्रथम ती आपल्या उजव्या हातास लागते व कोहल्यापासून डाव्या हातास लागते. मग बारामुल्लापासून ती आपणांस सोडते. पुन्हा तिचें दर्शन आपणांस श्रीनगरास होतें. श्रीनगरपासून वुलर सरोवरास जातांना तींतूनच जावें लागतें. श्रीगनरपासून खाणबलपर्यंत जर बोटीनें गेलों तर याच नदीनें जावें लागते. अशी ही नदी काश्मीरांत आपण शिरल्यापासून आपणास तिचा समागम सारखा असतो. अशा यानदीचें उगम स्थान पाहण्याची कोणास इच्छा होणार नाहीं? नाशकास जाणारा मनुष्य गोदेचें उगमस्थान जें त्र्यंबक तें पाहिल्याशिवाय रहात नाहीं. त्याचप्रमाणें वांई, कऱ्हाड, सांगली, मिरज, हारीपूर, कुडची, जमखिडी, शूरपाल वगैरें कृष्णानदीकांठचीं गांवें कामाच्या निमित्तानें अगर यात्रेच्या निमित्तानें पाहाणारांस जसें कृष्णेचें उगमस्थान क्षेत्र महाबळेश्वर पाहिल्या शिवाय चैन पडत नाहीं. त्याचप्रमाणें ज्यानें काश्मीरांत इतका प्रवास केला व त्यापैकीं बराचसा जेहलम नदीच्या काठाकाठानें केला त्याला या नदीचें उगमस्थान पाहिल्याविना रहाणें शक्य नाहीं. हें उगमस्थान रम्य असून शिवाय काश्मीरांत जीं प्रेक्षणीय स्थळें आहेत त्यांपैकीं एक आहे आणि हें क्षेत्र आहे. येथेंही क्षेत्रोपाध्याय आहेत.

**वेरीनाग**:— हें कुकटनागाहून ८ मैल आहे व अनंतनागाहून १६ मैल आहे. जम्मू रस्त्यानें गेलें तर १९मैल पडतें.श्रीनगरापासून ५० मैल लांब आहे वाटेनें आक्रोडचीं पुष्कळ झाडें लागतात व वेरिनाग येथेंहि तीं बरींच आहेत. वेरीनाग हा झरा बनीहालचा मार्ग याच्या पायथ्याशीं आहे. हा झरा धों धों करीत वहात असतो. हा एका अष्टपैलू तलावांत आणून सोडला आहे. या तलावाची चौफेर लांबी १०० फूट आहे. मध्यें खोली ५० फूट आहे. पण कडांशीं खोली १८ फूट आहे. हा तलाव जहांगिर बादशहानें १६१२ त बांधला. या तलावाचें पाणी हिरवट दिसतें, पण स्वच्छ आहे. यांत बरेच मासे आहेत. तलावाच्या भोंवतीं ओवऱ्या बांधल्या आहेत. त्यांत प्रवासी उतरतात. एका ओवरी-मध्यें देवीची मूर्ति आहे. तलावाच्या मागें डोंगर आहे व त्यावर एकामागून एक अशा पुष्कळ देवदार झाडांच्या रांगा आहेत. ह्या तलावांतून जें पाणी बाहेर पडतें तें एका पाटानें पुढील बागेंत नेऊन सोडलें आहे. या बागेंतहि कारंजीं आहेत. या बागेच्या एका आंगाला ऊन पाण्याचा गंधकाचा एक झरा आहे. पाटाचें पाणी बागेंत खेळल्यानंतर सर्व पाणी एका पाटांत एकत्र होऊन तें धबधब्याच्या रूपानें बाहेर पडतें व तें नदीच्या रूपानें वहात जातें. त्याला पुढें दुसरे ओढे मिळतात. अशा रीतीनें तिचें पात्र फुगत फुगत २२ मैलांवर खणबल येथें इतकें मोठें होतें कीं, तिच्यांतून नावा चालूं लागतात. पुढें तें पात्र बारामुल्ला येथें ३०० फूट रुंद होतें. खणबलपासून बारामुल्लापर्यंत म्हणजे ६० मैल नावा चालू शकतात. पुढें ही नदी दऱ्याखोऱ्यांतून उड्या घेत जाते म्हणून नावा चालविणें अशक्य होतें. पण लांकडांचे ओंडे वाहून नेण्याचें काम पुढें २००मैल ती करते. अशा रीतीनें ही नदी फारच उपयोगी पडते.

---

## भाग ९ वा
## श्रीनगर ते जम्मू रस्ता

| नंबर | गांव | मागील गां.अंतर | उंची | सोयी |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीनगर | ० | ५२५० | सर्व सोयी |
| २ | अवंतीपूर | १० | ५२७५ | पो. रे. हा. |
| ३ | खणबल | १४ | ५३०० | " " ता. |
| ४ | मुंडा (खाल्ला) | २१ | ७००० | " डा.बंगला |
| ५ | बनिहाल बोगदा | १९ | ८००० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | वनिहाल | ११ | ५७०० | पो. ता. प्र डा. बं. |
| ७ | रामसू | ११ | ४१०० | " " |
| ८ | रामबन | १६ | ३५०० | " " " |
| ९ | बटोट | १७ | ३८०० | " " " |
| १० | कूड | ९ | ५२०० | " " |
| ११ | धैर्मथल | १३ | ३७०० | " " |
| १२ | उदामपूर | १३ | २५०० | " " " |
| १३ | झाजर | २१ | २००० | " " |
| १४ | जम्मू | १९ | १२०० | सर्व सोयी |

कोणी श्रीनगरला मुक्काम ठेवून वरील स्थळें पाहतात व वेरीनागाहून परत श्रीनगरला येतात, व तेथें कांहीं दिवस राहून मग जम्मू रस्त्यानें किंवा रावळपिंडी रस्त्यानें परत स्वदेशीं जातात. कोणी दुबार खर्च पडूं नये म्हणून स्वदेशीं परत जातांना वरील स्थळें पहात पहात वेरीनागाहून जम्मू रस्त्याला मिळून मग बनीहाल बोगद्याला येऊन पुढें खालीं उतरून जम्मूला जातात.

पूर्वी मोंगल राजे श्रीनगरला जम्मूहूनच येत असत. ह्या रस्त्याला वळणें फार व रस्ता धोक्याचा आहे, म्हणून रावळपिंडीहून दुसरा रस्ता काढला. जम्मू रस्त्यानें एकदां औरंगजेब जात असतां त्याची ४००।५०० माणसें मेलीं.

या रस्त्यानें खणबलपर्यंत आल्यावर अनंतनागाला एक रस्ता फुटतो व खणबलच्या जरा अलीकडे जम्मू रस्ता फुटतो. त्यानें जाऊं लागलें म्हणजे मुंडा–प्रथम खालचा व मग वरचा लागतात. वरच्या मुंड्याला लहानशी पेठ आहे व तेथें डाक बंगला आहे. येथून ३० मैलांवर **बनिहाल** बोगदा लागतो. हा बोगदा फार मोठा आहे, त्याची लांबी ६६० फूट आहे. हा नुकताच १० वर्षांखालीं म्हणजे १९२० सालीं बांधला. याला जात असतांना वाटेंत जकडे तिकडे बर्फ पडलेलें दृष्टीस पडतें. या बोगद्याची उंची ८००० फूट आहे. बोगद्याजवळ आल्यावर या बोगद्याला लागून बर्फाचा एक बोगदा होतो. असा हा देखावा दुसरीकडे क्वचित्‌च दृष्टीस पडतो. कारण दगडाचा जसा बोगदा बांधला आहे, तसा बर्फाचा सुद्धां बोगदा बांधला आहे कीं काय असा भास होतो. बोगद्यांतून चालून पलीकडे गेलें म्हणजे जो देखावा दिसतो तो तर फारच रमणीय आहे. महाबळेश्वराहून एल्फिन्स्टन पाइंट-वरून किंवा आर्थर पाइंटवरून जशी शोभा आहे तशी शोभा तेथें दिसते. शिवाय मसुरीवरून जशी रस्त्याचीं पुष्कळ वळणें वळणेंच दिसतात तशी येथूनहि पुष्कळ वळणें दिसतात. येथून आपण खालीं जाऊं लागलों म्हणजे पुढें ११ मैलांवर रामसू येतें.

**रामसू**—हें एका धबधब्याच्या कांठीं वसलें आहे. रामसू येथें रस्त्याला लागून पीशलडी नदी आहे. येथून वाटेवर ५ मैलांवर एक मोठा धबधबा आहे. या धबधब्यापासून ११ मैलांवर म्हणजे रामसूपासून १६ मैलांवर रामबन लागतें. **रामबन**—येथें चिनाव नदी आहे व तीवर एक लोंबता पूल आहे. येथें लांकडाचे पुष्कळ कारखाने आहेत. नदींत सोडलेले लांकडाचे तक्ते बिनखर्ची चिनाब नदी खालीं वहात नेते. ते वजिराबाद येथें काढून घेतात व तेथून रेल्वेनें जिकडे पाठवावयाचे तिकडे पाठविले जातात.

**बटोट**— पुढें २५ मैलांवर बटोट येतें. वाटेंत एक मोठा धबधबा लागतो.

**कुड**— पुढें चढत चढत गेलें म्हणजे कुड येतें. हें अगदीं माथ्यावर आहे. येथून टवी नदी आपल्या डाव्या हाताला लागते व ती जम्मूपर्यंत आपली सोबती असते. येथून किस्तवाड व पाडर या प्रांतांना जाण्याला साधा रस्ता आहे. किस्तवाड ६३ मैल आहे व तेथून पाडर ४८ मैल आहे. येथील स्त्रिया सर्व काश्मीरांत अत्यंत रूपवान् आहेत, असें म्हणतात. त्या ५० पासून ५०० रु. पर्यंत विकत मिळतात. पाडर भागांत नीलमच्या खाणी आहेत. कूडपासून जम्मूपर्यंत सारखी उतरण आहे. पुढें **धरमथल, उदामपूर, झाजर** ही खेडी लागतात व मग **जम्मू** येतें.

**जम्मू**—– हें मोठें राजधानीचें शहर असून येथें टवी नदीचे कांठीं एक वाडा आहे.त्यांत काश्मीरचे महाराज थंडीच्या दिवसांत येऊन राहातात.हें शहर उंच टेकड्यावर बांधलें आहे. येथें एक रेशमाचा कारखाना आहे.येथें पूर्ण आर्टस् व सायन्स कॉलेज अशी दोन कॉलेजें आहेत. पुरुषांकरितां निराळा व बायकांकरितां निराळा असे दोन दवाखाने आहेत. येथें शीख लोकांचें गुरुद्वार आहे व त्यांत उतारूंकरितां धर्मशाळा आहे. स्टेशनच्या अलीकडे पुलाजवळ दुसरी एक विनायक मिश्र नांवाची धर्मशाळा आहे. तेथें यात्रेकरूंस उतरूं देतात. व शिदाही फुकट देतात. गुरूद्वाराच्या मागच्या आळीला एक मोठें रघुनाथ मंदिर आहे. त्यांत अनंत शिवलिंगें आहेत. सभोंवार २।३ प्राकार आहेत त्यांतूनही देवळें आहेत. दोन देवळांत स्वच्छ शुभ्र स्फटिकाच्या पिंडी आहेत. एक लहान आहे पण दुसरी वीतभर उंच आहे. मद्रासेकडील चिदंबराचे देवळांतील पिंडी स्फटिकाचीच आहे पण ती एवढी उंच नाहीं. जम्मूच्या मागच्या बाजूस चिकुटी नांवाची टेकडी आहे तेथें एक देवस्थान आहे. येथें श्रावण महिन्यांत मोठी जत्रा भरते. तेव्हां देंवदर्शनास हजारों लोक येतात. येथून जम्मू स्टेशन जवळच आहे. स्टेशनला जातांना वाटेंत एक लोंबता तारेचा पूल लागतो.

जम्मू ते वझिराबाद स्टेशनापर्यंत रेल्वेचा फाटा आहे. पेशावराहून, रावळपिंडी वरून लाहोर, अमृतसरकडे जाणाऱ्या लाईनीवर वझिराबाद स्टेशन आहे. तेथें गाडी बदलावी लागते.. त्यांत बसून आपल्या देशांत येतां येते. सेकंड क्लासचें रिटर्न तिकिट नसणाऱ्यांनीं व थर्डक्लासच्या लोकांनीं परत लाहोरावरून सिंधमध्यें शिरून वाटेनें त्या त्या प्रांतांतील प्रेक्षणीय स्थळें पाहत पाहत हैद्राबादेवरून क्वेटाला जाऊन येऊन सक्कर बॅरेज पाहून कराचीस जावें व तेथील प्रेक्षणीय स्थळें पाहून आगबोटीनें मुंबईस यावें. द्वारका पाहिली नसल्यास वाटेंत द्वारका बंदरांत उतरून दोन्ही द्वारका पाहून काठेवाडांतील इतर स्थळें पाहून वेरूळ येथील सोमनाथाचें ज्योतिर्लिंग पाहून तेथें बोटींत बसून मुंबईला जावें अगर अहमदाबादेवरून आगगाडीनें मुंबईस यावें. आगबोटींत बसावयाचें नसेल तर कराचीहून परत हैद्राबादेला येऊन मारवाडावरून बी. बी. सी. आय. रेल्वेनें मुंबईस जावें. येतांना वाटेंतील वर नमूद केलेलीं स्थळें जातांना पाहिलीं नसल्यास तीं पाहात यावें.

---

# भाग १० वा
# काश्मिरी लोकांचे आचारविचार

काश्मीरी लोक आर्यवंशी आहेत, हें त्यांचा गोरा रंग, सरळ चाफेकळी सारखें नाक व आर्यांसारखी शरीरयष्टि यांवरून सहज ताडतां येतें.येथील हवापाणी अति उत्तम असल्यामुळें येथील लोक फारच सुंदर आहेत. स्त्रिया तर स्वर्गांतून अप्सरा सरित सरोवरांत विहार करण्याकरितां आल्या आहेत कीं काय असा भास होतो. इंद्राच्या शापानें गंधर्व व अप्सरा या भूलोकी काश्मिरांत आलीं होतीं. त्यांचे येथील लोक वंशज आहेत अशी आख्यायिका आहे. जे ब्राह्मण बाटून मुसलमान झाले त्यांची मुळचींच नांवें अद्याप चालू आहेत. फक्त आपल्या नांवापुढें ते खान लावतात. त्यावरून ते मुसलमान आहेत हें ओळखावयाचें. हे जरी मुसलमान झाले आहेत तरी जात्या स्वभावानें गरीब, पापभिरू व अंतःकरणानें हिंदूच आहेत. एकाच वाड्यांत किंवा आवारांत हिंदू–मुसलमानांचीं बिऱ्हाडें असतात व ते गुण्यागोविंदानें वागतात. थोडे दिवसांमागे परप्रांतांतील मुसलमानांच्या चिथावणीनें येथील मुसलमानांनीं हिंदूवर अनेक अत्याचार केले व सारीच बंडाळी माजविली होती, पण आतां ती मोडून शांतता प्रस्थापित झाली आहे.

मसूरकरबुवानीं गोव्यामध्यें जसें शुद्धि करणाचें कार्य केलें तसें काश्मिरांत जाऊन जर कोणी शुद्धीकरणाचें कार्य करील तर त्याला पुष्कळ यश येण्याचा संभव आहे.

काश्मिरी लोकांचा पाहुणचार, आदरातिथ्य करणें हा विशेष गुण आहे. पाहुणा आला कीं त्याला कांगरी, गुडगुडी, चहा व जेवण देतात,

**कांगरी**:— फुलाच्या परडीसारखी ही असते. हींत गाडगें बसवितात व त्यांत निखारा घालतात, याला कांगरी म्हणतात.

**गुडगुडी**:— ओढण्याची चाल इकडे फार आहे. विडी, सिगारेट्स फारशी ओढीत नाहींत पण गुडगुडीची एकच नळी सर्वजण आळीपाळीनें तोंडांत घालून गुडगुडी ओढतात.

**चहा**:— इकडे चहा करण्याकरितां लहान बंब असतात.त्याला समावार म्हणतात. त्यांत निखारे घालतात, बाजूच्या पोकळींत पाणी साखर व चहाचीं पानें घालितात. १०।१५ मिनिटांत चहा तयार होतो. गाळून पीत नाहींत तर तसाच पितळेच्या पेल्यांत घेऊन पितात. दूध घालीत नाहींत.

**जेवण**:—भात व थोडीशी, भाजी. भाताला बत्ता व भाजीला साग म्हणतात. पालेभाजी चिरण्याची पद्धत नाहीं. सगळ्या पानांची भाजी करतात. हे दोनच पदार्थ गरीबाच्या घरीं मिळतात. व ते एकदांच वाढावयाचे व ते पुन्हां वाढण्याची चाल नाहीं. दूध, तूप, दही ताक कांहीं मिळत नाहीं. पण साधारण बऱ्या स्थितींतल्या पंडितांकडे पोळी डाळ करितात. हे बहुतेक लोक मांसाहारी आहेत. आपणास मांस नको असल्यास वाढीत नाहींत. यांत वैष्णव म्हणून एक पंथ आहे. ते लोक मांस खात नाहींत. इकडे जें भात पिकतें त्याला कुसळ असतें. त्याला देवभात म्हणतात. स्वर्गांतली देवमाणसेंच म्हणून देवभात खातात. हे तांदूळ रंगून तांदुळासारखें बेचव लागतात. हे रुपयास ८।९ शेर मिळतात. डेराडूनी तांदूळ रुपयास २ शेर मिळतात. बाहेरून येणाऱ्या मालावर शेंकडा ५० टक्के कर असल्यामुळें सर्व जिन्नस महाग मिळतात. रॉकेल तेलाच्या बाटलीस ५।६ आणे पडतात. काश्मिरांत होणारा जिन्नस मात्र स्वस्त मिळतो. दूध येथें रुपयास ५ शेर मिळतें. पण त्याला कस बिलकूल नसतो. कस कोठून असणार? नुसतें गवत व भाताचा पेंडा यांशिवाय जनावरांस कांहींच खावयास मिळत नाहीं. येथील गाई फार लहान म्हणजे वासरा एवढ्या असतात.

मुसलमान लोक मांस खातात, पण ते सुद्धां गोमांस खात नाहींत. इकडे गोमांस खाण्याला कायद्यानें मनाई आहे.

**स्वयंपाकाची भांडीं**:— हीं सर्व मातीचीं असतात. जेवणास मात्र पितळेची थाळी घेतात.

**पोषाख**:— ब्राह्मण असो वा मुसलमान असो पोषाख सारखाच म्हणजे एक पायघोळ कफनी असते, तिला चोळा म्हणतात. त्याला हात असतात पण त्यांत हात घालीत नाहींत मोकळेच सोडतात. पुरुष लंगोटी घालतो पण बायका क्वचित् चड्डया घालतात. बायका डोक्यावर एक फडकें घेतात व तें पाठीवर सोडतात. पंडितांच्या बायका त्या फडक्याचा कांहीं भाग गळ्याखालीं घेऊन त्याला टांचणी लावितात. पंडित पुरुष व स्त्रीहि तांबड्या गंधाचा टिळा लावितात. त्यावरून ही मुसलमानांपासून निराळी ओळखतां येतात. मुसलमानांत पडदा नाहीं. पण ब्राह्मणांत थोडासा आहे. पंडित स्त्री सहसा बाहेर पडत नाहीं. पण लग्नकार्यांत अगर कांहीं कामानिमित्त बाहेर पडल्यास बुरखा घेत नाहीं. इकडे थंडी फार म्हणून रोज आंघोळ करण्याची चाल नाहीं. मुसलमान तर ८।१० दिवस आंघोळ करीत नाहींत. ह्यांची कफनी तिला वरचेवर धुणे नसल्यामुळें घाण असते.

पंजाबांत व काश्मिरांत बायका नदीवर आंघोळीस गेल्या म्हणजे आपले कपडे कांठावर ठेवून खुशाल नग्न स्थितींत नदींत शिरतात. बायका वेणी चार पांच पेडांची घालतात. एकदां वेणी घातली म्हणजे महिना महिना ती सोडीत नाहींत.

**दागिने**:— मुसलमानांच्या बायका कानाच्या पाळींत २०।२५ रुपयांची वळी घालतात. पंडितांच्या बायका सोन्याचें एक मोठें वळें एक च कानांत घालतात. नथा घालण्याची चाल नाहीं.

**घरें**:— काश्मिरांत २–३ मजली घरें असतात. निदान २ मजली तरी असतात. जिकडे तिकडे पाणीच पाणी असतें, म्हणून खलच्या मजल्याला ओल येतें. म्हणून दुसऱ्या तिसऱ्या मजल्यावर लोक राहतात. घरें बहुतेक लाकडाचीं असतात.

---

## भाग ११ वा

# काश्मिरांतील उद्योगधंदे व कारखाने

काश्मीर हा प्रांत उत्तम हवा, पाणी व सृष्टीसौंदर्य यांनींच तेवढा परिपूर्ण आहे असें नाहीं तर येथील लोक कुसरी कामांतही प्रसिद्ध आहेत.

काश्मिरमध्यें अनेक कारखाने आहेत. त्यांपैकीं मुख्य व महत्त्वाचे म्हटले म्हणजे शाली, गालिचे, पेपर मॅची, कागद, रेशीम, कापडावर

लाकडावर, धातूवर, दगडावर नक्षीक.म, सुतारकाम, केशराची लागवड हे होत.


**१ शाली**—काश्मिरच्या पाहाडी भागांत राहणाऱ्या मेंढ्यांच्या लोंकरीपासून शाली करितात. हा प्रदेश फार उंचीवर असल्यामुळें तेथील हवा अति थंड आहे. व थंडीपासून रक्षण करण्याकरितां निसर्गतः मेंढ्यांच्या अंगावर लांब व मऊ लोंकर येते. त्यांतल्या त्यांत काश्मिरांत लडाक प्रांत जो आहे त्यांतील चंगथांग ठिकाणच्या मेंढ्यांची लोंकर फार नामी असते. या जातीच्या मेंढ्यांना पशम म्हणतात. व त्यांच्या लोंकरीपासून केलेल्या शालींना पश्मीना म्हणतात. १८१७ मध्यें ही लोंकर २॥ रु. शेर होती. व काश्मिरांत या वर्षी लडाक वगैरे प्रांतांतून ६०००० मण लोंकर आली. लोंकर विकणारे लोक या लोंकरीच्या मोबदला पश्मीना घेतात. आणि ते रशियांत जाऊन तेथें पुष्कळ नफा घेऊन विकतात.

शालींत दोन प्रकार आहेत. एक मागावर विणलेली व दुसरी हातानें विणलेली. १ ल्या प्रकाराला तिलीका व दुसऱ्या प्रकाराला अम्लिका म्हणतात. १ ल्या प्रकाराच्या शाली तयार करण्यास दुसऱ्या प्रकारापेक्षां ७।८ पट, श्रम घ्यावे लागतात. ती दोन शेवटांकडून विणीत जाऊन मधलें काम शेवटीं तयार करतात. तिला किंमत ज्यास्त पडते. व ती फार वर्षे टिकते. दोन दोन हजार रुपये चांगल्या शालीलीं पडतात. यापेक्षांही भारी किंमतीच्या शाली पाहिजे असल्यास कारखानदार काढून देतात. हव्या तेवढ्या मोठ्या आकाराच्या शाली काढून मिळतात. प्रथम एक एक चौरस फुटाचे तुकडे तयार करतात व जितक्या लांबी रुंदीची शाल हवी असेल तितके तुकडे एकमेकांस जोडून शाल तयार करितात. पण हे सांधे इतके बेमालूम असतात कीं, ते आपणाला उमगत नाहींत. शाली विणून तयार झाल्यावर थोडे दिवस त्या वापरून मग त्या काश्मिरांत कांहीं प्रसिद्ध झरे आहेत त्यांत धुतात. त्यामुळें त्या अधिक मृदु होऊन त्यांचा रंग खुलतो. शाली धुण्यांत कौशल्य आहे. तें सर्वांना साधत नाहीं.

शालीच्या पदरावर व किनारीवर नक्षीच्या वेलबुटीचीं कामें करितात. त्याचे नमुने जेहलम नदीला जीं वळणें आहेत तिचा आकार किंवा काश्मिरांतील निरनिराळे सुंदर वेलीचे आकार हे नमुन्याला घेतात. शाली तयार करण्याचा कारखाना फार पुरातन काळचा आहे. महाभारतांत याचा उल्लेख आहे. श्रीकृष्ण जेव्हां शिष्टाई करण्याकरितां धृतराष्ट्राकडे गेले तेव्हां त्यांनीं श्रीकृष्णास काश्मीरी शालीचा आहेर केला. डाकाची मलमल व काश्मीरी शाल ही सीझर दरबारचे वेळीं वापरीत असे.



श्रीनगर शहर



निषाद बाग

मोंगल कारकीर्दींत या धंद्याला फार तेजी होती. तेव्हां काश्मीरांत ४० हजार माग चालू होते व त्यांत शाली इतक्या सुबक निघत की, १॥ चौरस वाराची शाल हातांतील अंगठींतून जात असे. पुढें अफगाण राजाच्या कारकीर्दीत मागाची संख्या १६ हजारांवर आली व एकोणिसाव्या शतकांत ती तीन हजारांवर आली व त्या काळांत फक्त २५ लाख किमतीच्या शाली परदेशांत खपल्या. यांचा खप फ्रान्स देशांत फार होत असे. पण १८७० मध्यें फ्रान्स–जर्मन युद्धापासून या धंद्याला धक्का बसला. पुढें १८८७–७९चा दुष्काळ तर या धंद्याला चांगलाच जाणवला. या वेळीं युरोप खंडांत शाली तयार करूं लागले. या जरी हलक्या असत तरी पण त्या भपकेदार दिसत. त्यामुळें त्या काश्मीर शालीच्या एकविसांश किमतींत मिळत, म्हणून इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांतील कुणबीनीसुद्धां रविवारीं देवळांत जातांना या पांघरून जात व त्यांच्या धनीनीच्या २० पट किमतीच्या शाली या शालीपुढें निःस्तेज दिसूं लागल्या. म्हणून त्या कोणी घेईनासें झाले. अशा रीतीनें या धंद्याला फारच उतरती कळा लागली.

अमृतसर, लुधियाना, रामपूर, गुरुदासपूर इत्यादि ठिकाणीं शालीचे कारखान निघाले आहेत. पण काश्मिरी शालीची कांहीं सर येत नाहीं. कारण काश्मीरच्या पाण्याचा गुण म्हणतात. काश्मीरीपाण्यानें शालींना मृदुपणा येतो, व रंग चांगला खुलतो. यांमुळें सीझनमध्यें जेव्हां बाहेरचे लोक हवा खाण्याकरतां काश्मीरांत येतात तेव्हां हजारों रुपयांचा माल तेथें खपतो.

२ **पट्टु**— हलक्या लोंकरीपासून लोकरीचें कापड करतात. त्याला पट्टु म्हणतात. त्याचे कोट, पायमोजे, जाकिटें वगैरे कपडे करितात.

३ **गालीचे**:—**जैनुल्लाभदीन** बादशहा यानें काश्मीरवर १४२३ ते १४७४ पर्यंत राज्य केलें. हा राजा फार उदार, दयाळु, नीतिमान, कर्तव्यदक्ष होता. विद्येचा व कलाकौशल्याचा तो पुरस्कर्ता होता. म्हणून याला बादशहा म्हणत. समरकंद येथें गालीच्याचें काम चांगलें होत असे म्हणून त्यानें तेथून कांहीं विणकरी काश्मीरांत आणून काश्मिरी लोकांना हा धंदा शिकविला. याचेच कारकीर्दींत इतर पुष्कळ कामाचेहि कारखाने निघाले. याच्याच वेळीं अर्धा कोट रुपयांची शाल परदेशीं जात असे. पुढें गालिच्याच्या कारखान्यास उतरती कळा आली पण पुन्हां जहांगीर बादशहाचे कारकीर्दींत त्याचें पुनरज्जीवन झालें. पण पुढें पुन्हां हा धंदा बसला व आतां तर तो युरोपियन कंपनीच्या हातांत गेला आहे. याचे नमुनें युरोपियन पद्धतीचे व रंग अनलाईन (डांबरापासून निघालेलें) वापरतात. ते काश्मीरी

रंगासारखें टिकाऊ नसतात. पण असले गालीचे स्वस्त पडतात म्हणून जुन्या तऱ्हेच्या देशी गालिचांना कोणी विचारीत नाहीं.

**४ पेपर मॅची**:— हाही धंदा **जैनुल्लाभदीन** बादशहानें काश्मीरांत सुरू केला. रद्दी कागद, चिंध्या ह्या पाण्यांत भिजत ठेवतात, हा रद्दा चांगला मऊ झाला म्हणजे हातानें कुसकरून कुसकरून आणखी मऊ करतात, मग त्यांत तांदूळाचें पीठ मिसळतात. असा रंधा तयार झाला म्हणजे कुंभार मातीचीं जशीं निरनिराळ्या आकृतींचीं भांडीं तयार करतो त्याप्रमाणें जो आकार हवा असेल तशा आकाराचा नमुना करून त्यावर काश्मिरी पुष्कळ कागद चिकटवितात, मग त्यावर ह्या रांध्याची पुटें देतात व पुन्हा त्यावर काश्मीरी कागद लावतात. मग चांगले वाळल्यावर नमुना काढून घेतात, व कानशीनें घासून साफ करितात. त्यावर वेलबुटी काढून निरनिराळे रंग देऊन त्यावरून रोगण फिरवितात. त्याप्रमाणें कलमदानें, पेट्या, तबकड्या-डवे, हवे ते पदार्थ तयार करतां येतात. मऊ लाकडावर सुद्धां हें काम करि, तात. असलीं फळें श्रीमंत लोकांच्या छतास किंवा भिंतीस लावितात.

**रेशीम**—श्रीनगर येथील रेशमाच्या कारखान्याएवढा रेशमाचा कारखाना जगांत कोठेंहि नाहीं. याचें मुख्य कारण रेशमाच्या किड्यांच्या वाढीला जशी हवा लागते तशी हवा काश्मीरांत आहे. शिवाय तुतीचीं झाडेंहि इकडे पुष्कळ होतात. श्रीनगर येथील कारखाना सरकारी आहे. रेशमाचें निदान निम्मे तरी बीं परदेशांतून येतें. बाकीचें बीं येथें तयार होतें. दरसाल ४४००० रुपयांचें बीं लागतें. तें काश्मीरांतील लोकांत वाटतात. या बियांपासून कोश तयार होईपर्यंतचें काम करण्यांत १॥ लाख लोक खेड्यापाड्यांतून गुंतले आहेत. शिवाय कारखान्यांत ४ हजार माणसें काम करीत आहेत, तीं निराळींच. खेड्यापाड्यांतील माणसास दर माणशीं १० रुपये पडतात. लोकांना खर्च वगैरे कांहीं पडत नाहीं. बियाणें फुकट, तुतीच्या झाडांचीं पानें फुकट, फक्त मेहनत करावी लागते, त्याबद्दल १०रु. मिळतात. सरकारला या कारखान्यापासून दरसाल २५ लाख रु. उत्पन्न येतें. जम्मूलाहि दुसरा सरकारी रेशमाचा कारखाना आहे. श्रीनगर येथें एक खाजगी रेशमाचा कारखाना नुकतांच निघाला आहे.

**कागद**— कागदाच्या उत्पत्तिपूर्वी लोक ताडपत्रावर लिहीत असत व काश्मीरांत भूर्जकूल (Birch) झाडाच्या सालीवर लिहीत असत. हे असले लेख जर्मन विद्वानांनीं काश्मीरांतून नेऊन जर्मनींत राखून ठेवले आहेत, व कागदावर ते लेख उतरून घेतले आहेत. अजूनहि श्रीनगर येथें असले लेख क्वचित् बघावयास मिळतात. कागद तयार करण्याची

कल्पना प्रथम पहिल्या शतकांत चिनी लोकांनीं काढली. तेथून ती समरकंद येथें गेली व तेथून जैनुल्लाभदीन या बादशहानें इतर धंद्यांबरोबर काश्मीरांत आणली. त्यानें समरकंदाहून कारागीर गांधरबल येथ नेले व तेथें पाणचक्कीवर चिंध्यांचा रांधा तयार होऊं लागला. व त्या रांध्याचे कागद नऊशरा येथें मोठ्या डोणीकरून त्यांत तो रांधा घालून तयार करूं लागले. कागद तयार करण्यांत चिंध्या, सन, साजिखार, फटकी, तांदुळाची पिठी असे पदार्थ घालतात. काश्मीरांत नाना प्रकारचीं झाडें आहेत, तर यांपैकीं कोणत्या झाडापासून कागद होईल याची सरकारनें चौकशी करून चांगल्या कागदाचा कारखाना काढण्याची तजवीज करावी.

**कातडींकाम**— १९२३ सालीं काश्मीरांत ३ लक्ष रुपयांचें कमावलेलें कातडें व त्याचे जिन्नस परदेशांतून आले. व त्याच वर्षीं ४ लक्ष रु. किंमतीचें कच्चें कातडें बाहेर देशीं रवाना झालें. हेंच जर सगळें येथेंच कमावलें गेलें तर त्या धंद्याला कितीतरी उत्तेजन येईल. येथें थोड्या प्रमाणावर जुन्या पद्धतीनें कातडें कमावून त्याचे व बाहेरून आलेल्या कातड्याचे जीन, ट्रंक्स, पेट्या, बूट, चढाव वगैरे करितात.

**वेलबुट्टी व नक्षीकाम**— हाहि धंदा येथें मोठ्या प्रमाणावर चालतो. उंची वेलबुटी ही शाली व रेशमी साड्या यांवर काढितात. आणि हातरुमाल, टेबलावरील कापड, गिरद्यांचे अभ्रे वगैरेवर जी वेलबुटी काढितात ती साधी असते. चांदीच्या भांड्यावर नकशीकाम फार सुरेख खोदतात,व त्यावर सोन्याचा मुलामा देतात. तांब्याच्या भांड्यावरहि रूपें चढवून नकशीकाम करितात. तबकें, सुरया, पेले, वाट्या, फुलपात्रें, चहादाण्या, अत्तरदाण्या वगैरे चांदीचें नकशीदार सामान काश्मीरांत तयार करितात.

**मीना**— पितळ व तांब्यावर लाख चढवून मिन्याचें काम करितात.

**एनॅमल**— हेंहि काम येथें थोडेंबहुत होतें.

**बंदुका व पिस्तुलें**— हीं देखील येथें चांगलीं तयार होतात व त्यांतील नळ्या तर फारच चांगल्या असतात.

**लाकूड**— खोदून नकशीचें काम येथें पुष्कळ तयार होतें. शहाहमदनची इमारत सर्व लांकडी आहे. व तींत लांकडी नक्षीकाम पाहावयास सांपडतें. तसेंच लालमंडित जें पदार्थसंग्रहालय आहे, त्यांतहि पुष्कळ लांकडावर नक्षीचे केलेल्या कामाचे नमुने ठेवलेले आहेत. देवदार व दुसरें नरम लाकूड घेऊन त्यांवर कोरींव व जाळीदार काम फार सुरेख करितात.

**दगड**— खोदून नक्षीचें केलेलें काम मार्तंड येथील देवालयांत पुष्कळ पहावयास मिळतें.

कास्मीर येथील भूगर्भांत मौल्यवान् दगडाच्या खाणी कोठें कोठें सांपडतात.

---

# भाग १२ वा

# भूगोल

या संस्थानचा आकार लांबोडा (Oblong) आहे. लांबी ३५० मैल व रुंदी २७० मैल आहे. क्षेत्रफळ ९००० चौरस मैल आहे. सीमा— पूर्वेस चिनई तिबेट, पश्चिमेस यागिस्तान, उत्तरेस यारकंद व पामीर, आक्षांश— ३२°–१९' ते ३६°–५८'; रेखांश ७३°–२६' ते ८०°–३०'; हें संस्थान आकारानें दक्षिण हैद्राबाद संस्थानाएवढें आहे. पण प्रदेश फार डोंगराळ असल्यामुळें वस्ती कमी आहे.

**लोकसंख्या**— ३२ लाख आहे. पैकीं हिंदू ७ लाख, मुसलमान २४ लाख. बुद्ध व शीख अर्धा अर्धा लाख अशी आहे. पूर्वी बरीच वस्ती ब्राह्मणांची होती. पण पुढें बुद्ध कालांत पुष्कळ ब्राह्मणांनीं बौद्धधर्म स्वीकारला पण पुढें शंकराचार्यांनीं मंडनमिश्राबरोबर वाद करून वाद जिंकला. तेव्हां पुन्हां पुष्कळ बुद्ध ब्राह्मण धर्मांत आले. पण पुढें मुसलमानी कारकीर्दींत पुष्कळ ब्राह्मण बलात्कारें बाटविले गेले, म्हणून या संस्थानांत मुसलमानांची संख्या जास्त आहे.

**पर्वत**:–या संस्थानांत पीरपिंजाल नांवाचा पर्वत मोठा आहे, तो चिनाबच्या आग्नेयीस सुरू होतो व जेहलमच्या वायव्येस संपतो. हा जम्मू शहराजवळ सखल आहे. जमीनीपासून सारा १००।२०० फूट उंच आहे. पण उत्तरेकडे तो इतका उंच होत गेला आहे कीं, त्याचीं शिखरें नेहमीं बर्फानें आच्छादित असतात. या पर्वताची रांग जम्मू व कास्मीरप्रांत यांच्यामध्यें आहे. याची लांबी ४०० मैल भरेल. याचीं शिखरें— बनिहाल उंची ९२०० फूट, वेरीनाग जवळ; विष्णूपद उंची १५,५००, वेरीनागचे पश्चिमेस; अलपथर १४,५००, गुलमर्गजवळ; तातकुटी १५,५२५. हें सर्वांत मोठें शिखर आहे. हें लाहोरहून सुद्धां निरभ्र दिवशीं दिसतें.

कास्मीरप्रांत व लहान तिबेट यांच्यामध्यें अनेक उंच पर्वतांच्या रांगा आहेत. त्यांत नंगापर्वत फारच उंच आहे. त्याची उंची २६६३० फूट

आहे. शिवाय हरिमुख पर्वत हा लाड प्रांतांत आहे. याची उंची १६८९० फूट आहे. या पर्वताची अशी आख्यायिका आहे कीं, याच्या आसपास साप चावला असतां बाधा होत नाहीं. अमरनाथ पर्वताची उंची १७८९० फूट आहे. महादेव पर्वत—उंची १२००० फूट; हरजकप पर्वत—उंची १६००० फूट आहे. हा उरल सरोवराचे कांठीं आहे. झोझिला पर्वत—उंची ११५०० फूट; ह्याच्या पायथ्याशीं बाल्टल आहे. येथूनच सिंध दरी सुरू होते. कोलाहोई पर्वत—उंची १७८०० फूट; हा पर्वत उंचीला २ ऱ्या नंबरचा आहे. हे सर्व पर्वत म्हणजे हिमालयाच्या रांगा होत. हे जेहलम नदी व सिंधू नदी यांच्या दरम्यान आहेत. काराकोरम पर्वत—ही काश्मीर संस्थानच्या उत्तरेस मोठी पर्वताची रांग आहे. याचाच एक फाटा गिलजीत प्रांतांत आला आहे. त्यांची उंची २४३०० फूट आहे.

**नद्या**—पीरपिंजाल पर्वतांत उगम पावून काश्मीर प्रांतांत वाहात जाणाऱ्या नद्या :—(१) जेहलम नदी —हिचा उगम वेरीनाग येथें होतो. तिला ओढे नाले मिळून २२ मैलांवर तिचें पात्र बरेंच रुंद होतें. खनबलपासून बारामुल्लापर्यंत ६०।७० मल तिच्यांतून नावा चालतात. श्रीनगरापासून २५ मैलांवर ती उलर सरोवरांत शिरून पुढें ती त्यांतून सोपूरच्या अलीकडे बाहेर पडून बारामुल्लाला जाते. तेथें तिचें पात्र ३०० फूट आहे. पुढें ती दऱ्याखोऱ्यांतून उडया घेत असल्यामुळें तींत नावा चालत नाहींत. पण तिच्यांतून लांकडी तुळया वाहून नेण्याचें काम चालतें. ही नदी रावळपिंडीच्या रस्त्यानें खालीं जातांना प्रथम ती आपल्या उजव्या हातास व पुढें कोहला येथें पूल ओलांडल्यावर ती डाव्या हातास होते व पुढें कांहीं अंतरावर गेल्यावर ती सुटते. पण तिचें पुनर्दर्शन आपण रावळपिंडी येथें आगगाडींत बसून जेहलम स्टेशनवर आलों म्हणजे होतें. काश्मीर भागांतील तिची लांबी १७० मैल आहे, पण एकंदर तिची लांबी ४२० मैल आहे. ही नदी चिनावला तिमूजवळ मिळते.

हिच्यावर काश्मीर प्रांतांत एकंदर १७ पूल आहेत, (१) खणबल, (२) बिजबिहारा, (३) संगम, (४) पूडगामपूर, (५) पामपूर, पुढें श्रीनगर येथें ह्या नदीवर ७ पूल आहेत त्यांचीं नांवें—१ अमराकदल, २ हब्बाकदल, ३ फत्तहकदल, ४ जैनकदल, ५ अल्लीकदल, ६ सफाकदल, ७ नवाकदल. पुढें उलर सरोवराला जातांना संबळ येथें १३ वा पूल लागतो. ती नदी उलर सरोवरांतून बाहेर पडल्यावर १४ वा पूल सोपूर येथें आहे, १५ वा बारामुल्ला, १६ वा डोमेल व १७ वा कोहला येथें आहे.

**विश्वनदी**–ही नदी संगमाजवळ जेहलमला मिळते. दूधगंगा–ही छटबल-जवळ जेहलमला मिळते.

पिरपिजालांत उगम पावून दक्षिणेकडे जम्मू वगैरे प्रांतांत वहात जाणाऱ्या नद्या—रावी, तवी, चिनाव, मनावर, पंच. नंगापर्वतांत उगम पावून काश्मीर प्रांतांत येणाऱ्या नद्या–सिंध–ही साधी-पुराजवळ, लिडर–खनबलजवळ, किसनगंगा–डोमेलजवळ, अरीन–बदरी-पुराजवळ जेहलमला मिळतात.

**सरोवरें**–उलर,मानसबल, दल, अनचार, तासर, हाकूरसर, (श्रीनगरापासून बारामुल्लाच्या रस्त्यावर ६ मैलांवर आहे), खुशालसर (झाजीवालजवळ) पांबसट (सादीपुराजवळ). पूर्व लीडर प्रांतांत अमरनाथाचे वाटेंत शेषनाग सरोवर , हरिमुख पर्वताच्या पायथ्याशीं गंगाबल सरोवर–यांत भाविक हिंदू लोक मृताच्या अस्थि आणून टाकतात म्हणजे त्याला चांगला पुनर्जन्म मिळतो असा भाव आहे. कासारनाग सरोवर–याचें पाणी आच्छाबलला येतें. तासरमासर–या दोन तलावांच्यामध्यें एक टेकडी आहे. तासरचें पाणी लीडारकडे जाऊन लीडर नदींत जाऊन पडतें, व मासरचे पाण्यानें श्रीनगरचीं वॉटर वर्क्स चालतात. हरिमुख पर्वतांत १५।१६ सरोवरें आहेत.

**झरे**–वेरीनाग हा झरा जेहलम नदीचें उगमस्थान होय.याचे आसपास रुद्र-संध्या, वासूकनाग, पवनसंध्या, सप्तऋषि, कुक्कटनाग असे झरे आहेत. अनंतनाग या गांवांत तर पुष्कळ झरे आहेत. गांधारबलजवळ क्षीरभवानी झरा आहे. लडाक प्रांतांत तूलमूल झरा आहे. उत्तरमचीपुरांत टाकरजवळ एक झरा आहे.त्या झऱ्याच्या पाण्याचा रंग वरच्यावर बदलतो असें म्हणतात. गुप्तगंगा–शालीमार बागेच्या दक्षिणेस १॥ मैलावर गुप्तगंगा नांवाचा झरा आहे. येथें दरवर्षी जत्रा भरते. असे एकंदर ४०।५० झरे आहेत.

**मर्ग**—पठार–गुलमर्ग, टंगमर्ग, खेलनमर्ग, सोनमर्ग, असे ३० एक मर्ग म्हणजे पठारें आहेत.हीं उत्तम हवेचीं ठिकाणें आहेत.

**मैदानें**–मटणसारखीं ३०।४० मैदानें आहेत.

## प्राणी

**पशु**:–सिंह,वाघ वगैरे हिंस्र पशु येथें आढळत नाहीत.पण अस्वलें मात्र सिंध, लिदार वगैरे दऱ्यांतून पुष्कळ आढळतात. इकडील घोडे लहान पण कणखर असतात. गाई तर इतक्या लहान असतात कीं, त्या आपल्याकडील वासरां-एधढ्या दिसतात व त्या दूधही फार थोडें देतात.

**मृग**–मृगाच्या दोन चार जाती इकडे आहेत. कस्तुरी मृग येथें आढळतो. त्याचा रंग करडा–तांबडा असतो, शिगें लांब असतात, कान नेहमीं उभार-

लेले असतात. याच्या पोटांत बेंबीजवळ एक पिशवी असते, तींत कस्तुरी सांपडते.

**मेंढरें**—बकऱ्याच्या जाती इकडे पुष्कळ आहेत पण पश्मिना (उंची शाली) ज्या मेंढ्याच्या केसाच्या करितात ते मेंढे (पशम) लडाक प्रांत व तिबेट यांत आहेत. त्यांचे केंस फार लांब व तलम असतात. काश्मिरांतील इतर प्रांतांतील मढ्याचे केस इतके लांब व मऊ नसतात, म्हणून त्या केसाचे पट्टू होतें. याचे हातमोजे, पायमोजे कोट धाबळ्या वगैरे करितात.

**पक्षी**—मोर, कोकिळा, राघु, कावळा, कोंबडा, वगैरे पक्षी असून शिवाय आपलेकडे न दिसणारे हंस वगैरे पक्षीही इकडे आढळतात.

**मासे**—अनंतनाग, मटण येथील तीर्थकुंडांत निळ्या रंगाचे मासे आढळतात. आच्छाबल बागेंत व श्रीनगर येथील एका बागेंत ट्राऊट माशांची पैदास करतात. कारण हे मासे फार रुचकर असतात.

रेशमाचे किडे या प्रांतांत पुष्कळ आहेत. कारण त्यांच्या वाढीला हवी तशी हवा इकडे आहे, व तुतीचीं झाडेंही पुष्कळ आहेत. इकडे मधमाशाही पुष्कळ असून येथें उत्तम मध तयार होतो.

## वनस्पति

काश्मीर जसें हवापाणी, सृष्टिसौंदर्य यांनीं भरलेलें आहे तसेंच तें झाडें, फुलें, फळें यांनींहि नटलेलें आहे.

**झाडें**—चिनार हें काश्मीरांत प्रमुख झाड आहे. यावर काश्मीरी लोकांची मोठी भक्ति आहे. ती इतकी कीं, नक्षीकामांत चिनार पानाच्या आकाराचा नमुना काढतात. यानें हवा शुद्ध होते असें म्हणतात. सफेदा –(पापलर) हें झाड सुबक दिसतें व सरळ वाढतें म्हणूनं रस्त्याच्या बाजूंना हीं झाडें जवळ जवळ लावून रस्त्याला शोभा आणतात. याप्रमाणें श्रीनगर ते बारामुल्ला रस्त्यावर व श्रीनगर ते अनंतनागाचे रस्त्यावर मैलच्या मैल हीं झाडें लावलेलीं आहेत. फर–हीं झाडें उंच पर्वतावर फार मोठीं होतात. तीं इतकीं कीं, १५०।२०० फूट उंच होतात व त्यांचा घेर ३०।४० फूट असतो. देवदारचीं झाडें काश्मीरचे डोंगरांत पुष्कळ आहेत. निळा देवदार–याचीं झाडें काश्मीरांत आहेत. यापासून टरपेंटाईन निघतें. भूर्जकूल नांवाचा वृक्ष. उंच प्रदेशांत होतो. ह्याच्या सालीवर (भूर्जपत्रावर) पूर्वीं लिहीत असत असे लिहिलेले लेख अजूनहि क्वचित् काश्मीरांत दृष्टीस पडतात. टील–हा वृक्ष सुरूसारखा दिसतो. वॉलनट, विलो, अशा तऱ्हेचीं पुष्कळ झाडें इकडे आहेत.

**फळझाडें**:—आक्रोड–याचीं झाडें वेरीनाग भागांत फार आहेत. बदाम–याच्या तर बागाच गोपूर येथें आहेत. शिवाय इतरत्रहि पुष्कळ झाडें आहेत. द्राक्ष, नारळ, सपरचंद, आळू (पीज), नासापाती (पीयर्स) सफरदल, अनार, ग्लास, अप्रिकॉट, लिंबू अशीं अनेक फळें इकडे उत्पन्न होतात. ऑगस्ट–सप्टेंबरमध्यें जे लोक येथें जातात त्यांना हीं फळें पुष्कळ खाण्यास मिळतात पण मे, जूनमध्यें जाणाऱ्यांस कांहीं मिळत नाहींत.

**फुलें**:—काश्मीरांत फुलझाडेंहि अनंत आहेत. त्यांत कमळें, गुलाब, चाफा, मोतिया, मोगरा, जाई, गवलाकचरा, पाच, शेवंती, झेंडू, सूर्यकमळ, तेरडा, पिंक, डालिया वगैरे इंग्रजी तऱ्हेचीं फुलझाडें पुष्कळ होतात.

**केशर**:— पांपूरजवळ व अनंतनागजवळ केशराच्या बागा आहेत. त्यांना बहार आलेले सप्टेंबर–ऑक्टोबरमध्यें पहावयास सांपडतात.

**पिकें**—येथें उन्हाळ्यांत बर्फ वितळून जें पाणी खालीं येतें तें पाटापाटानें घेऊन त्याचा पिकें काढण्याकडे उपयोग करितात. येथें बाराहि महिने पाऊस पडत असतो म्हणून भातशेती फार होते. तीनचतुर्थांश जमीनींत हें पीक काढतात. बाकीच्या जमिनींत मका, वगैरे खरीप पिकें होतात. इकडे थंडी फार व पाणी जागोजाग गोठून जातें म्हणून रबी पीक नाहींच म्हटलें तरी चालेल. क्वचित् गहूं, जवस, वाटाणा, उडीद, मूग हीं पिकें काढतात.

## खनिजद्रव्यें

**सोनें**– लदाकच्या पश्चिमेस काश्मीरचे उत्तर भागांत सोन्याच्या खाणी सांपडतात. सिंधू, जेहलम नदींतहि सोन्याचे कण कोठें कोठें सांपडतात. गिलजित, स्काई येथेंहि वाळूंत सोनें सांपडतें. जम्मूजवळ नील रत्नाच्या खाणी आहेत. लदाक, चित्रळ, अनंतनाग येथें लोखंडाच्या खाणी आहेत व सोपूर आणि अनंतनाग येथें लोखंडाचे कार. खाने आहेत. सोपूर गांवाजवळील डोंगरांत शिसें, तांबें, रुपें सांपडतें. कुतिहार प्रांताच्या उत्तरेस हरपटनर गांवाजवळ तांब्याची खाण आहे. लदाक प्रांतांत गंधक, टांकणखार व मीठ यांच्या खाणी आहेत. पिपरजाल पर्वतांत प्लंबेगो व जम्मू डोंगरांत सुरमा सांपडतो. रामपूर, मानसवल, सिंधू नदीच्या दरींत चुनखडी सांपडते. जम्मू प्रांतांत चिनी मातीहि मिळते.

## संस्थानचे विभाग

१ **जम्मू**, २ **काश्मीर**, ३ **लहान तिबेट**, ४ **गिलजित**, असे याचे चार विभाग आहेत. नदीच्या घाटांचीं जशीं चढतीं पटांगणें असतात तसे हे प्रांत एकावर एक चढत गेलेले आहेत. चौथा प्रांत मात्र पलीकडील उतरणीवर आहे

पहिल्या तीन प्रांतांत तीन नद्यांचीं खोरीं आहेत. जम्मू प्रांतांत तवी व चिनाबचें खोरें, काश्मीर प्रांतांत जहलमचें खोरें व लहान तिबेटांत सिंधू नदीचें खोरें आहे. या तिन्ही नद्या पूर्व भागांत उगम पावून उत्तरेकडे वाहात जाऊन नंतर वळसा घेऊन दक्षिणेकडे वळतात व मग पश्चिमेकडून खालीं पंजाबांत उतरतात.

**जम्मू प्रांत**— राजधानी जम्मू. हा प्रांत पंजाबला लागून आहे म्हणून याचें हवापाणी सर्व पंजाबसारखें आहे. उंची–सरासरी १२०० फूट. पाऊस सरासरी ४० इंच. लोक–या प्रांतांत डोंगरी जातीचे लोक राहतात. हा प्रांत जरी पंजाबला लागून आहे तरी येथील लोक पंजाबी लोकांप्रमाणें उंच, धिप्पाड, गोरे असे नाहींत. तर काळे, ठेंगणे आहेत पण मजबूत बांध्याचे आहेत. हे शूर, इमानी, स्वाभिमानी आहेत. त्यांची भाषा डोंगरी व पंजाबी आहे. लोकसंख्या १६ लाख.

**काश्मीर प्रांत**–राजधानी श्रीनगर. ह्या प्रांताची लांबी ८५×८१ मैल. जम्मू प्रांताच्या वरल्या पटांगणावर काश्मीर प्रांत येतो.जम्मू प्रांतांतून काश्मीर प्रांतांत-जावयाचें झालें म्हणजे पीरपिंजाल पर्वत चढून जावें लागतें व हा रस्ता बनिहाल मार्गांतून आहे. या बनिहालची उंची ८००० फूट आहे. एवढी चढण चढून गेल्यावर थोडी उतरण लागते. कारण काश्मीर प्रांताची उंची ५–५॥ हजार फूट आहे. पूर्वी काश्मीरप्रांत हा एक मोठा सतिसरनांवाचा तलाव होता. त्यांत जलदेव नांवाचा मोठा राक्षस राहात असे. तो तलावांतील सर्व मच्छ भक्षण करून शिवाय भोंवतालच्या टेकड्यांवर राहणाऱ्या लोकांचा अपहार करूं लागला. तेव्हां तेथील लोकांस मोठी चिंता पडली. हिमालय पर्वतावर काश्यप ऋषि राहात असत. त्यांजकडे हे लोक गेले व त्यांची राक्षसाचे जांचांतून सोडविण्यावद्दल प्रार्थना केली. तेव्हां काश्यप ऋषि खालीं बारा-मुल्ला येथें आले. व तेथें त्यांनीं आपला त्रिशूळ जमिनींत मारल्याबरोबर त्या तलावाला वाट फुटून पाणी सर्व ओसरून गेलें व त्या सतिसर तलावाच्या जागीं कश्यपूर नांवाचें शहर उदयाला आलें. कश्यपूरचा अपभ्रंश काश्मीर झाला. उंची सरासरी ५००० फूट आहे. हवापाणी—उत्तम. यासारखें हवापाणी सर्व हिंदुस्थानांत किंबहुना सर्व जगांत कोठें नाहीं. लोकसंख्या–१३ लाख आहे. पैकीं हिंदू सारे १ लाख. बाकीचे मुसलमान. भाषा–काश्मीरी. ही संस्कृत व पर्शियन यांच्या मिश्रणापासून झाली आहे. पाऊस सरासरी २७ इंच. पण बाराहि महिनें थोडा थोडा पडत असतो.

**लहान तिबेट** :—हा तिसरा प्रांत होय. ह्याचे दोन विभाग आहेत. १ लदाक, २ बाल्टीशस्थान. लदाक काश्मीरचे पूर्वेस व बाल्टीशस्थान उत्तरेस

आहे. लदाक प्रांताचें मुख्य शहर लेह आहे. बाल्टीशस्थानचें मुख्य शहर स्कार्डू आहे. लहान तिबेटचें क्षेत्रफळ काश्मीर व जम्मू या दोन्ही प्रांताच्या बेरजेच्या दुप्पट आहे. पण हा सर्व मुलूख डोंगराळ असल्यामुळें येथील लोकसंख्या १॥ लाख आहे. उंची १२००० फूट. येथें बाराहि महिने बर्फ असतें, म्हणून झाडझुडूप फारसें होत नाहीं. धर्म—लडाक प्रांताचे लोक बौद्धधर्मी आहेत व ते मंगोलियन वंशापैकीं आहेत.यांच्यात स्त्रिया कमी म्हणून बहुपतित्वाची चाल आहे.लडाक प्रांताचें मुख्य शहर लेह श्रीनगरापासून २५० मैल लांब आहे. त्याला रस्ता सिंध नदीच्या खोऱ्यांतून आहे. लेह व्यापाराचें मोठ ठिकाण आहे.येथें हिंदुस्थानचे व्यापारी व मध्य आशियांतील व्यापारी यांच्यांत देवघेव होते.बाल्टीशस्थानचें मुख्य शहर स्कार्डू हे श्रीनगरपासून २३५ मैल लांब आहे. श्रीनगराहून १०० मैलपर्यंत लेहचा व स्कार्डूचा रस्ता एकच आहे. पुढें लडाकचा रस्ता उत्तरेकडे जातो व बाल्टीशस्थानचा पूर्वेकडे जातो. स्कार्डूच्या सभोंवतालचा भाग सखल व जमीन सपाट असल्यामुळें बरींच पिकें होतात.

**गिलजित प्रांत** — हा चवथा प्रांत होय. हा प्रांत सिंधू नदीचे उत्तरेला आहे. ही नदी हिमालय पर्वतांत २८००० फूट उंचीवर उगम पावून खालीं उतरत उतरत गिलजित प्रांतांत येते व दक्षिणेकडे वळून नंगा पर्वताच्या पायथ्यानें पश्चिमेकडे जाते व पुन्हां दक्षिण वाहिनी होऊन पंजाब व सिंध प्रांतांतून अरबी समुद्रास जाऊन मिळते. हिला वाटेंत ४ नद्या मिळतात. चिनाब, रावी, सतलज, जेहलम. उंची ४८०० फूट म्हणजे काश्मीर प्रांतापेक्षांहि कमी आहे. काश्मीर प्रांतांत होणारी बहुतेक सर्व पिकें येथें होतात. पाऊस—सरासरी ४॥ इंच.

---

# भाग १३ वा

# इतिहास

या संस्थानचा पूर्वीचा इतिहास राजतरंगिणी नांवाच्या संस्कृत ग्रंथांत दिला आहे. तो हा देश अकबर बादशहानें काबीज केला तोंपर्यंतचा म्हणजे १५८६ पर्यंतचा आहे.

कृष्ण व जरासंध यांच्यामध्यें जेव्हां युद्ध झालें, तेव्हां काश्मीरचा १ ला **गोनंद** (गोनर्द) हा जरासंधाचे मदतीस गेला व त्यानें मथुरेस वेढा दिला. हा राजा महा पराक्रमी होता. पुढें याचें व बलिरामाचें युद्ध झालें. त्यांत तो मारला गेला. त्यानें ३५ वर्षें राज्य केलें.

पुढें त्याचा मुलगा **दामोदर** गादीवर बसला. तोही बापाप्रमाणें पराक्रमी होता, त्याची व यादवांची लढाई झाली. तींत तो पडला. त्यानंतर त्याचा पुत्र **गोनर्द (दुसरा)** हा गादीवर आला. याच वेळीं भारतीय युद्ध झालें. या नंतर अनेक राजे झाले. त्यांचीं नांवें राजतरंगिणींत दिलीं आहेत.

पुढें हिंदुस्थानावर मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या. त्या वेळीं १३३४ सालीं **झुलकादरखान** हा साठ हजार सैन्य घेऊन काश्मीरवर आला व त्यानें तें जिंकून घेतलें, व आपलें राज्य स्थापिलें. त्यानें पुष्कळ ब्राह्मणांना मुसलमान केलें. त्याचे वंशज **अजदरखान** व **मदादखान** यांनीं तर कहर जुलूम केला. पंडित दिसला कीं, त्याला मुसलमान होण्यास भाग पाडावें, तो नाकबूलच गेला तर त्यास पोत्यांत घालून नदींत बुडवावें, अशा रीतीनें हजारों पंडित मारले गेले, व पुष्कळांनीं त्या जाचाला त्रासून मुसलमानी धर्म स्वीकारला. त्यांची सुता केली व जानवीं काढून टाकलीं. त्या जानव्यांचें वजन पांच मण भरलें असें सांगतात. या पंडितांपैकी आकरा कुटुंबें रानांत जाऊन दडून बसलीं. हजारों देवळांचा नाश केला. अशी मोडतोड झालेलीं पुष्कळ देवळें अद्याप दृष्टीस पडतात. कांहीं देवळांचें मशिदींत रूपांतर केलें. असा जिकडे तिकडे मुसलमानांनीं हाहाःकार उडवून दिला.

पुढें त्याच वंशांत **जैनुल्लाभदीन** नांवाचा राजा झाला. त्यानें १४२३ ते १४७३ पर्यंत राज्य केलें. हा परधर्म सहिष्णु,न्यायी व सत्वशील राजा होता. त्यानें रानांत गेलेल्या पंडितांस परत बोलावून त्यांच्या जमिनी व इनामें त्यांचीं त्यांस परत दिलीं. व त्यांना मोठ्या ममतेनें व मायेनें वागविलें. त्यांचेच वंशज आज काश्मीरांत जे पंडित दृष्टीस पडतात ते होत. हा राजा अत्यंत दयाळू व गुणी होता. व तो परधर्मीय लोकांनाही मोठ्या ममतेनें वागवीत असे. यांनीं अनेक सुधारणा केल्या. यानें कालवे बांधले, मठ बांधले, अग्राह करून दिले, अन्नछत्रें घातलीं. तो योगी लोकांचा सत्कार करीत असे. तो विद्वानांचा व कारागिरांचा पुरस्कर्ता होता. यानें आपल्या राज्यांत अनेक कलाकौशल्याचे धंदे सुरू केले व विद्वान् लोकांकडून ग्रंथ लिहविले. याला गाण्याचा मोठा शोक होता. यानें बकसू नांवाचा प्रसिद्ध गवई आपल्या दरबारीं आणून ठेविला होता. याच्या कारकीर्दीत एक मोठा दुष्काळ पडला होता,तेव्हां त्यानें आपलीं धान्याचीं कोठारें खुलीं करून धान्य वाटलें. याप्रमाणें त्यानें ५० वर्षे राज्य केलें.

याचेमागून **हैदरशहा** गादीवर आला. हा फार जुलमी होता. यानें लोकाचे कान, नाक, वगैरे अवयव कापून छिन्न विछिन्न केले. याच्या दुराचरणानें लोक अगदीं त्रस्त झाले पण हा लवकरच म्हणजेदोन वर्षे राज्य करून

मरण पावला. पुढें त्याचा मुलगा **हसनशहा** गादीवर बसला. त्याला धनलोभ फार असे. त्यानें एका श्रीमान् सावकारास लुटून त्यापासून एक कोट रुपये काढले, व त्यास कैदेंत टाकले. तो सावकार कैदेंतच मरण पावला. हा राजा बारा वर्षे राज्य करून वारला. याचे मागन पांच राजे एकामागून एक गादीवर बसले. पण त्या सर्वांच्या कारकीर्दीत राज्यांत दंगे धोपे असा सारखा धुमाकूळ चालला होता. ही संधि पाहून **अकबर** बादशहानें आपला सरदार कासीमखान यांजबरोबर सैन्य देऊन काश्मीरवर पाठविलें. त्यानें १५८७ मध्यें हा देश काबीज केला. तो १७५३ पर्यंत म्हणजे जवळ जवळ दोन शतकें मोंगलांचे ताब्यांत होता.

अकबर काश्मीरला तीन वेळां गेला होता, पण त्याला फार दिवस राहतां आलें नाहीं. म्हणून तेथील हवापाण्याचें व सृष्टिसौंदर्याचें सुख त्याला भोगतां आलें नाहीं. पण त्याचा पुत्र **जहांगीर** व त्याची राणी **नूरजहान** यांनीं येथें बंगले व बगीचे बांधून चैन केली. पुढें याचा मुलगा **शहाजहान** हाही केव्हां केव्हां येथें येऊन रहात असे. पण त्याचा मुलगा **औरंगजेब** हा एकदांच आला होता. त्यावर मोठा प्रसंग येऊन तो पराकाष्ठेनें वांचला.

पुढें मोंगल घराण्याचा जसा ऱ्हास झाला, तसा हा देश **अहमदशहा** अबदालीनें १७५३ त जिंकला. १७५३ ते १८१८ पर्यंत म्हणजे ५५ वर्षें दुराणी बादशहाचे ताब्यांत होता. याप्रमाणें या प्रांतावर ५०० वर्षें मुसलमानांनीं राज्य केलें.

पुढें जसे शीख लोक प्रबळ होत चालले, तेव्हां त्यांचा पुढारी **रणजितसिंग** यानें आपला सेनापति मिसरदिवाण चंद यास काश्मीरवर स्वारी करण्यास पाठविलें ( त्यावेळीं त्याच्याबरोबर गुलाबसिंग हाही होता ) त्यानें १८१९ मध्यें हा प्रांत काबीज केला.

**गुलाबसिंग** हा डोंगरी जातीचा रजपूत.याच्या ताब्यांत जम्मूचा लहान प्रांत होता. तो आपल्या शौर्यादि गुणानें रणजितसिंगास पसंत पडला म्हणून त्यानें जम्मूचा राजा असा किताब त्यास १८२० मध्यें दिला. पुढें त्यानें एकामागें एक असे आसपासचे प्रांत काबीज केले. पुढें लडक प्रांतहि घेतला. १८४० मध्यें बाल्टीश प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. १८४५ मध्यें शीख व इंग्रज यांच्यामध्यें युद्ध सुरू झालें. या युद्धांत गुलाबसिंग शीखाला मिळाला नाहीं. त्यामुळ इंग्रजाना जय आला व याच वेळीं रणजितसिंग वारला. त्यावेळीं त्याचा मुलगा **धुलिपसिंग** हा अल्पवयी होता. तव्हां इंग्रजांनीं गुलाबसिंगानें आपल्यास शीख लोकांशीं लढाईत अप्रत्यक्ष मदत केली म्हणून त्यांनीं काश्मीर

प्रांत गुलाबसिंगास देऊन टाकला. ह्याबद्दल त्यानीं गुलाबसिंगाकडून नांवाला ७ लक्ष रु. देणगी दाखल घेतले.

गिलजित प्रांत अजूनहि शीखांचे ताब्यांत होता. गुलाबसिंग वारल्यावर त्याचा मुलगा **रणवीरसिंग** हा गादीवर आला. त्यानें १८५७ सालच्या शिपायांच्या बंडाच्या वेळीं इंग्रजांस चांगलेंच सहाय्य दिलें. त्यानें १८६० मध्य गिलजित प्रांतावर स्वारी करून तो प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. ह्याप्रमाणें आतांचा सर्व काश्मीर प्रांत याच्या ताब्यांत आला.

**रणवीरसिंग** १८८५ त वारला. त्याचा मुलगा **प्रतापसिंग** गादीवर आला. याचे कारकीर्दींत रावळपिंडी ते श्रीनगर व जम्मू ते श्रीनगर हे रस्ते झाले. विजेचे दिवे, कॉलेजें, वगैरे बऱ्याच सुधारणा याच्या कारकीर्दींत झाल्या. १९२६ सालीं हा वारला.

महाराज **हरिसिंगः—** प्रतापसिंग महाराजांचा दत्तक पुत्र हरिसिंग हे मग गादीवर आले. व तेच हल्लीं काश्मीरचे व जम्मूचे महाराज आहेत.

हे फार प्रजादक्ष आहेत. श्रीनगर येथें त्यांच्या प्रोत्साहनानें एक खाजगी रेशमाचा कारखाना निघाला आहे. त्याला महाराजांनीं दयाळूपणानें पुष्कळ सवलती देऊन मदत केली आहे. राजेरजवाड्यांची जी दिल्लीस सभा भरते (चेंबर ऑफ प्रिंसेस) तिचे प्रो. चान्सेलर होण्याचा मान त्याना मिळाला. यावरून राजेरजवाड्यांत त्यांना किती मान आहे हें दिसून येईल. राऊंड टेबल कॉन्फरन्सला जें थोडे राजेरजवाडे बोलावले त्यांत त्यांना आमंत्रण होतें. त्यावरून यांची इंग्रजसरकार किती योग्यता जाणतें हें दिसून येतें.

---

# भाग १५ वा

# राज्यव्यवस्था

हिज हायनेस जनरल महाराजा **सर हरिसिंग बहादूर** के. सी. आय. ई., के. सी. व्ही. ओ. हे जम्मू व काश्मीर प्रांताचे अधिपति आहेत व आपल्या १००० सैन्याचे सेनापति हेच आहेत. हे आपल्या राज्याचा राज्यकारभार कौन्सिल नेमून कौन्सिलच्या मार्फत चालवितात.

कौन्सिलचे मेंबरः—

१ वसुलीखातें.
२ हिशेब व पोलिसखातें.
३ पब्लिक वर्क्स खातें.
४ होम व कायदा खातें.

५ व्यापार व उद्योग खातें.

संस्थानांतील सर्व खातीं या मेंबर्समध्यें वाटून दिलीं आहेत.

उत्पन्न— या संस्थानचें उत्पन्न २॥ कोट रुपये आहे. संस्थानचे चार प्रांत केले आहेत. १ जम्मू, २ काश्मीर, ३ लहान तिबेट, ४ गिलजित.

पहिल्या दोन प्रांतांच्या अधिकाऱ्यांना गव्हर्नर म्हणतात. व बाकीच्या दोन प्रांतांच्या अधिकाऱ्यांना वजिर वझारत म्हणतात.ते वसूली खात्यांच्या मेंबरांच्या हाताखालीं काम करितात. पण गव्हर्नर स्वतंत्र आहेत. ते फक्त कौन्सिलला जबाबदार आहेत. गव्हर्नरचे हाताखालीं कलेक्टर, तहशीलदार, नायब तहशीलदार अशी मालिका आहे.

न्यायखात्यावर मुख्य हायकोर्ट जज्ज आहेत. व त्याचे हाताखाली दोन चीफ जज्ज आहेत. १ काश्मीर प्रांताकरितां २ रा जम्मू करितां. लहान तिबेट व गिलजित प्रांतांचे मुख्य अधिकारी जे वजिर वझारत आहेत तेच सेशन जज्जाचें काम पहातात. चीफ जज्जाचे खालीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, सिटी मॅजिस्ट्रेट, सबजज्ज, मुनसफ अशी मालिका आहे.

पोलीस, विद्या, वैद्य, पब्लिकवर्क्स, जंगल, हिशेब, कस्टम, अबकारी, को–ऑपरेटिव्ह, सेटलमेंट वगैरे खातीं निरनिराळचा अधिकाऱ्यांच्याताब्यांत आहेत.

---

## भाग १५ वा
## आपत्ति

**१ परचक्र**:—जेथील जमीन सुपीक, हवापाणी चांगलें, तेथें लढवय्ये लोक निपजणें कठीण. संयुक्तप्रांत व बंगालप्रांत येथील जमीन इतकी सुपीक व एकसारखी लागून गेली आहे कीं, तेथें एकादी टेकडी मिळणें दुर्मिळ. त्या देशांतील लोक बलहीन असल्यामुळें मुसलमानांनीं येथें बहुतकाळपर्यंत अंमल गाजविला. पंजाब प्रांताची स्थिति निराळी आहे. तेथें बराच मुलूख डोंगराळ असल्यामुळे धान्य पिकविण्याला लोकांना बरेच कष्ट करावे लागतात. शिवाय खैबर घाटांतून लुटारूंच्या झुंडीच्या झुंडी येत असल्यामुळें त्यांचा प्रतिकार करावा लागे. त्यामुळें येथील लोक कणखर, बळकट धिप्पाड, लढवय्ये असे निपजले. आपला महाराष्ट्रच घ्याना! येथील मावळ भाग व देशावरील भाग यांतील लोकांत कितीतरी अंतर आहे. शिवाजीचें सैन्य बहुतेक मावळे प्रांतांतलेंच, होतें.

काश्मीर प्रांताची स्थिति तरी अत्यंत सुखसोयीची व चोहोंकडून त्याचें डोंगरांनीं रक्षण केल्यानें व इ. स. १३०० पर्यंत हिंदुस्थानांत जिकडे तिकडे

७०००
म.ग्र ७३८
६-४-३४

कामधंदा करूं शकत नाहींत. हा सर्व काळ ते घरांतच बसून उराशीं–उशाशीं कांग्री (शेगडी) घेऊन बसतात. शेतीभाती कांहीं करूं शकत नाहींत. कारण त्यावेळीं रानांतसुद्धां बर्फ पडलेलें असतें.

एप्रिल उजाडला म्हणजे बर्फ वितळूं लागतें व थंडीचें मान कमी होऊं लागतें. काश्मीर पाहण्याकरितां येणारे गुलहौशी लोक मे महिन्यापासून येऊं लागतात. कोणी निव्वळ सृष्टिसौंदर्य पाहण्याकरितां येणारे लोक ८।१५ दिवस येतात आणि जातात, पण श्रीमंत लोक ज्यांना काळ व पैसा विपुल आहे ते मे ते आक्टोबर सहा महिने राहतात.

८।१५ दिवसांत साधारणपणें पाहणें होतें, पण येथील उत्कृष्ट जें हवा-पाणी त्याचा लाभ घेण्याकरितां महिना दोन महिने तरी राहिलें पाहिजे.

मे व जून हे महिने चांगले, पण थोडा थोडा पाऊस पडत असतो, व थंडीहि थोडी जास्त असते. साहेब लोकांना या वेळची हवा फारच प्रियकर वाटते, कारण ती इग्लंडासारखी असते. तेथेंही बारा महिने थोडाथोडा पाऊस असतो, व थंडी असते. जुलै व आगष्टमध्यें ऊष्मा होऊं लागतो,तो आपल्या इकडील लोकांना सुखावह असतो. पण साहेब लोकांना तो जरा दुःसह होत असल्या-मुळें ते गुलमर्ग वगैरे टेकड्यांवर जाऊन राहतात. जुलै–ऑगष्टमध्यें तेथें पाऊस जरा जास्त पडतो. सप्टेंबर आक्टोबरमध्ये पाऊस नसतो म्हटलें तरी चालेल. पण थंडी पडूं लागते. फळफळावळ मे–जूनमध्यें फारशी नसते पण जुलै ऑगष्टमध्यें ती बरीच मिळूं लागते आणि सप्टेंबर आक्टोबरमध्यें तर याची रेलचेल होते. तेव्हां ज्याच्या त्याच्या प्रकृतिमानाप्रमाणें, हौसेप्रमाणें व सवडीनुसार येथें केव्हां यावें हें ज्याचें त्यानेंच ठरवावें. निदान महिना दोन महिने तरी राहणें इष्ट आहे. सहा महिने राहतां आलें तर उत्तमच.

इकडे केव्हांही आलें तरी आपल्यापेक्षां थंडी जास्त असल्याकारणानें गरम कपडे आणण्यास विसरूं नये. येथें बाराहि महिने थोडा थोडा पाऊस पडत असल्यामुळें आपला थोडासा विरस होतो पण पाऊस पडण्यानेंच हवा नेहमीं थंड राहते. खुद्द श्रीनगराची पावसाची सरासरी २७।२८ इंच आहे.

येथें हवा खाण्याकरितां जे लोक येतात त्यांच्या राहण्याचे प्रकार—(१) हौसबोटींत राहणें, (२) चिनार बागांतून तंबू ठोकून राहणें, (३) हॉटेलमध्यें राहणें. (४) बंगल्यांत रहाणे.

१ हाऊसबोट—या चारीत हौसबोटमध्यें राहण्याची मजा और आहे. श्रीनगर हें हिंदुस्थानचें व्हेनिस शहर आहे. तेथें ज्याप्रमाणें राहणे वगैरे सर्व व्यवहार बोटींतून करितात, त्याप्रमाणें येथेंहि जेहलम नदींत किंवा तिच्या कालव्यांत, किंवा दल सरोवरांत किंवा सिंध नदींत गांधरबल येथें करितात.

हौसबोटीला दरमहा १०० पासून २०० पर्यंत भाडें पडतें. यांत पांच महा खोल्या असतात. १ ली खोली व्हिजिटींग रूम, २ ड्रॉइंगरूम– बसण्याची खोली; ३ जेवणाचा हॉल; ४ निजण्याकरितां दोन खोल्या. ५ अंघोळीची जागा; ६ संडास.

हाऊसबोटीमध्यें खालील सामान असतें. चमचे, जेवणाचे कांटे, चहाचें वगैरे सामान, कप–बशा, ठेवण्याकरितां कपाटें, आंघोळीला टब, टेबललँप, ओगले लँप, टेबलें, खुर्च्या वगैरे बरेंच सामान असतें. बोटीला दुसरा मजला असतो. पण तो गच्चीवजा असतो. तेथें रात्रींच्या वेळीं चांदण्यांत जाऊन बसण्याची मौज असते. मोठी हौसबोट असेल तर आणखी १।२ खोल्या व जास्त सोयी असतात.

या हौसबोटीला लागून दुसरी एक बोट असते. तिला डुंगा म्हणतात. यांतला एक भाग आपणाला स्वतंत्र स्वयंपाक करण्याकरितां राखलेला असतो, व दुसऱ्या भागांत बोटीवाले आपलीं बायका मुलें घेऊन राहतात. आणखी एक लहान बोट असते. तिला शिकारा म्हणतात. तीतून कोठें सहल करावयास जावयाचें असेल तर करतां येतें किंवा बाजारहाटहि तेथून जाऊन करतां येतो. भंगी मात्र निराळा माणूस असतो. बाकी पाणी आणून देणें,झाडझूड करणें,दिवे लावणें,शिकाऱ्यांतून फिरवून आणणें हीं सर्व कामें बोटवालेच करतात. स्वयंपाकाचीं भांडीसुद्धां ते घासतात पण त्याबद्दल त्यांना कांहीं निराळें द्यावें लागतें. धोतरें, लुगडीं धुण्याचें काम मात्र ते करीत नाहीत. उत्तर हिंदुस्थानांत धुणें धुवायला मनुष्यच मिळत नाही. चार आठ दिवसांनी परटाकडे कपडे टाकण्याची सर्वत्र चाल आहे, नाही तर आपले कपडे आपण स्वतः धुतले पाहिजेत.

व्यापारी लोक आपल्या बोटींतून सर्व प्रकारचा माल विक्रीकरितां घेऊन पाण्यांतून फिरत असतात. शालीवाले शाली घेऊन येतात. कापडवाले कापड आणतात, फळें, भाज्या वगैरे सर्व माल आपल्या दाराशीं येतो. कोणताहि हौसेचा जिन्नस आणण्याकरितां सहसा आपल्याला हाऊसबोट सोडून बाजारांत जावें लागत नाही.

२. तंबू—तिकडे चिनार वृक्षांच्या बागा पुष्कळ आहेत. त्यांच्या खालीं लोक तंबू ठोकून राहतात. चिनार वृक्ष दिसण्यांत सुंदर असतो. त्याचा आकार डेऱ्यासारखा असतो व वृक्ष मोठा असल्यामुळें छाया चांगली पडते. त्यामुळें त्याच्या खालीं तंबू ठोकण्याला वाव सांपडतो. त्याची पानें, फुलेंही फार नाजूक दिसतात. आपण जसें वड, पिंपळाला पूज्य मानतो त्याप्रमाणें काश्मिरी लोक चिनार झाडाला पूज्य मानतात. तुळशीच्या झाडानें

जशी हवा शुद्ध होते तशीच चिनार वृक्षांनींही हवा शुद्ध होते. तुळशीचें झाड झुडूप असल्यामुळें त्याखालीं बसतांसुद्धां येत नाहीं पण चिनार वृक्ष वड-पिंपळासारखा मोठा असल्यामुळें त्याखालीं तंबू ठोकून राहतां येतें. हा चिनार वृक्ष प्रथम नूरजहाननें काश्मीरांत आणून लावला व त्याची पुढें पुष्कळ लागवड झाली. काश्मीरांत त्याच्या मोठमोठ्या विस्तीर्ण बागा आहेत. या बागांतून वृक्षांखालीं तंबू ठोकून पुष्कळ लोक राहतात. श्रीनगरांत दल सरोवरांत निःसीम बाग, गोफूर रस्त्याचे खालील रस्त्यावर मुनशीबाग. चिनार नाला–जो डल सरोवर व जेहलम नदी जोडतो–त्याचे कांठीं चिनार बाग. अशा अनेक बागा आहेत. निःसीम किंवा मुनशी बागेसारखा हा चिनार बाग नसून या चिनार नाल्याच्या कांठीं पुष्कळ चिनारचीं झाडें आहेत इतकेंच. त्यालाच चिनारबाग म्हणतात. जेहलम नदींत किंवा डलसरोवरांत हाऊस-बोटींतून जितके लोक राहतात त्यापेक्षां या लहानशा नाल्यांत हाऊस बोटींतून लोक जास्त राहतात. कारण त्या ठिकाणी हाऊस बोटींत राहण्याचें सौख्य मिळून शिवाय चिनार झाडाच्या सावलीतहि राहण्याचें श्रेय मिळतें, म्हणजे शुद्ध हवेचा फायदा होतो.रावळपिंडीहून येतांना किंवा दुसरीकडे एकट्या दुकट्या चिनार झाडाखालींसुद्धां तंबू ठोकून लोक राहिलेले आढळतात. इतकें ह्या झाडाचें महत्त्व आहे.

३ हॉटेलें—कोणी हॉटेलमध्यें राहतात. युरोपियन पद्धतीनें राहावयाचें असल्यास निओडचें हॉटेल फार प्रसिद्ध आहे. येथें २०० लोक राहण्याची व्यवस्था आहे. सर्व बादशाही थाट आहे. खर्चहि बादशाहीच पडतो.

हिंदु तऱ्हेनें राहणाऱ्यास (१) पहिल्या पुलाजवळ नदींत काश्मीरी हाऊसबोट हॉटेल आहे. स्वतंत्र हाऊस बोट करून जेवणाखाण्याची दगदग नको असल्यास ह्या बोटींत रहावें म्हणजे हाऊस बोटीमध्यें राहणें होऊन दगदग टळते. (२) पुलाच्या पलीकडे पण जवळच खालसा हॉटेल आहे. येथें राहण्या–जेवणाची चांगली व्यवस्था असते. अन्न मात्र तिकडील पद्धतीचें असतें. (३) पंजाब हॉटेल–हें हॉटेलहि जवळच आहे. येथें दर थोडे हलके आहेत. (४) लाल मंडईत विष्णु भोजन शाळा आहे. तींत फक्त जेवणाचीच सोय आहे.

हाऊस बोटींत राहण्याचें असेल तर २।४ दिवस हॉटेलमध्ये काढून हाऊस बोट ठरवून तींत राहावयास जावें हें चांगलें. नाही तर धर्मशाळेंत राहावें व नंतर २।४ दिवसांनी हाऊस बोट ठरवून तींत जावें.

४ बंगले—गोपकर रस्त्यावर अलीकडे कांहीं बंगले बांधले आहेत. ज्यांना कांहीं महिने काश्मीरात हवेकरितां राहावयाचें आहे ते बंगला भाड्यानें घेऊन त्यांत राहतात.

REFBK-0005209

५ धर्मशाळा—(१) शीखलोकांचें गुरुद्वार पहिल्या पुलाजवळ आहे,तींत धर्मशाळा आहे. त्यांत खोल्या आहेत. त्यांतली एक खोली राहण्यास देतात. व तींत सात दिवसपर्यंत फुकट राहतां येतें. (२) सनातन धर्मभुवन धर्मशाळा—तीतहि वरीलप्रमाणेंच व्यवस्था आहे. (३) दश नामी खरा धर्मशाळा. या सर्व धर्मशाळांतून स्वयंपाकाकरितां खालच्या मजल्यावर एक खोली असते. तींतच सर्वांनीं स्वयंपाक करावयाचा. त्यामुळें ही जागा फार अस्वच्छ राहते. तेथें जेवावेंसेंसुद्धां वाटत नाहीं. त्यापेक्षां आपल्या खोलींतच स्टोव्ह-वर स्वयंपाक करावा, किंवा जेवावयापुरतें हॉटेलमध्यें जावें हें बरें. (४) आर्यसमाजाच्याहि दोन धर्मशाळा आहेत. पण त्या १ ल्या पुलापासून जरा दूर हजारी बागेंत आहेत. तेथेंहि उतरूं देतात.

६ मठ—साधू लोकांकरितां—(१) नारायण मठ, (२) दुर्गानाद मंदिर, (३) रामबाग अशीं ठिकाणें आहेत त्यांत साधू लोकांना फुकट राहूं देतात.

१ हाऊसबोट, २ तंबू, ३ हॉटेल, ४ बंगला. पुष्कळ दिवस राहावयाचें असेल तर असे हे चार प्रकार राहण्याचे आहेत. तात्पुरतें राहणाऱ्याला एकच आठवडा राहावयाचें असेल तर धर्मशाळा,नाहींतर हॉटेल.

चांगले श्रीमंत असतात ते बंगल्यांत राहूं शकतात, कारण बंगल्याला भाडें २०० रु. पडतें. शिवाय आचारी, गडी वगैरे बरीच चाकर माणसें लागतात. शिवाय बंगले गांवापासून दूर गोपूर रस्त्यावर असल्यामुळें सामान आणण्या-करितां वहान मोटारच पाहिजे.

तंबूंत राहणेंहि बरेंच खर्चाचें आहे. कारण त्यालाहि गडी माणसें लागतात.

बोटींत राहणें मात्र सामान्य माणसाच्या आवाक्यांत असतें. स्वयंपाक करण्याकरितां बरोबर आचारी असला म्हणजे झालें. दुसरा गडी माणूस कांहीं लागत नाहीं. आपलीं वायकामाणसें बरोबर असली व त्यांना स्वयंपाक करण्याची फारशी अडचण भासत नसली म्हणजे मग आचारीसुद्धां नको. गड्या माणसाची सर्व कामें बोटीवाले करितात. बाजारहाटसुद्धा ते करितात पण रुपयाच्या मागे २ आणे तरी ते खातात. या आशेवरच ते बाजारहाट मोठ्या आनंदानें करितात. दारावर माल येतो म्हणून वर सांगितलें, पण ते सर्व चैनीचे जिन्नस. दूध, तांदूळ, आटा, तेल, मीठ मिरची असे नित्य लागणारे पदार्थ फेरीवाले मुळींच विकावयास आणीत नाहींत. ते आपल्याला स्वत:च जाऊन आणावे लागतात किंवा बोटवाल्यावर सोपवावें लागतें. तेथें ब्राह्मण आचारी मिळतो. १०।१५ रु. पगार घेतो पण त्याचा स्वयंपाक आपणास पसंत पडत नाहीं.